

श्री साईबाबा कला महाविद्यालय, वडनेर
ज्ञानियाने उजळु या ग्राम ग्राम
वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था, हिंगणघाट
श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय
वडनेर, त. हिंगणघाट, जि. वर्धा
शेतकऱ्यांचा आसुड
वार्षिकांक
२०१७-१८

# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर

## युवा स्फुर्ती महोत्सव ४ फेब्रुवारी २०१८
## ‘‘शेतकऱ्यांचा आसुड’’ वार्षिकांक
## प्रकाशन सोहळा

कार्यक्रमाचे अध्यक्ष



**मा.प्रा.डॉ. विवेक देशमुख**
सिनेट सदस्य
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ

शुभ हस्ते



**मा.प्रा.डॉ.आर.बी.भांडवलकर**
अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ



मार्गदर्शक



**मा.प्रा.डॉ. उत्तमराव पारेकर**
यशवंत महाविद्यालय, वर्धा

प्रमुख अतिथी



**मा. प्रा.दिवाकर गमे**
संस्थापक सचिव, श्री साईबाबा लोक
प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर



सत्कारमूर्ती



**मा. प्रांतिक देशमुख, यवतमाळ**
‘मातीतील कुस्ती’ या चित्रपटास
६४ वा नॅशनल फिल्मफेअर अवार्ड २०१७
व फिल्म फेअर अवार्ड २०१७
महामहिम राष्ट्रपती कडून पुरस्कार प्राप्त

प्रमुख उपस्थिती



**मा. प्राचार्य विनोद मुडे**
श्री साईबाबा कला महा. वडनेर

# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर

## युवा स्फुर्ती महोत्सव ४ फेब्रुवारी २०१८
## व शेतकऱ्यांचा आसुड वार्षिकांक प्रकाशन सोहळा



**मा. सौ. हेमलता दिवाकर गमे**
संस्थापक अध्यक्षा,
वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था, हिंगणघाट



श्री. विनोद राऊत
उपाध्यक्ष
वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था



श्री. अविनाश गमे
सदस्य
वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था



श्री. प्रदिप महल्ले
सदस्य
महाविद्यालयीन विकास समिती



दि. ८ मार्च जागतिक महिला दिना निमित्य नवनिर्वाचित जि.प. व पं.स. महिला लोक प्रतिनिर्धी सत्कार सन्मान कार्यक्रमात सौ. ज्योत्सना सुनिलभाऊ सरोदे, वडनेर सदस्या,जि.प. वर्धा यांना क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले सत्कार सन्मान प्रदान करतांना सौ. हेमलता गमे, संस्थाध्यक्षा, प्रा. दिवाकर गमे



हिंगणघाट तालुक्यातील नवनिर्वाचित जि.प. व पं.स. महिला सदस्यांचा क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले सन्मान सत्कार सोहळ्यात मार्गदर्शन करतांना मा. प्रा. माधव पिंपळखुटे, मंचावर मा.प्रा. सोभागमलजी डुंगरवाल, हिंगणघाट, मा.प्रा. अरूण धनवटे माजी सिनेट सदस्य, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती



महाविद्यालयीन विकास समितीच्या सभेमध्ये मार्गदर्शन करतांना सौ. हेमलता गमे संस्थापक अध्यक्षा श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर, उपाध्यक्ष श्री. विनोद राऊत सचिव, प्रा. दिवाकर गमे, प्रदिप महल्ले व सदस्यगण



दि. २६ नोव्हेंबर संविधान दिन निमित्य संविधान जनजागृती रॅलीला मार्गदर्शन करतांना मा. प्रा. दिवाकर गमे संस्थापक,श्री साईबाबा कला महाविद्यालय वडनेर, श्री अविनाश गमे, प्राचार्य विनोद मुडे, प्रा. सारीका चौधरी



महाविद्यालयात आयोजित राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, बहि:शाला व्याख्यानमालेत मुलाखतीचे तंत्रे व कौशल्य विकास या कार्यक्रमात सहभागी डॉ. जयमाला डुंबरे, प्रा.दिवाकर गमे



रो.से.यो., पर्यावरण समिती व मानवाधिकार समिती द्वारे वृक्ष संवर्धनाच्या निमित्याने रक्षाबंधनाचा आयोजित कार्यक्रमात सहभागी प्रा.डॉ. गणेश बहादे, प्रा. आरती देशमुख प्रा.डॉ. विठ्ठल घिनमिने, कु. प्रिती सायंकार व विद्यार्थी.

# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर

## युवा स्फुर्ती महोत्सव ४ फेब्रुवारी २०१८
## व शेतकऱ्यांचा आसुड वार्षिकांक प्रकाशन सोहळा

### महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद




प्रा. अभय दांडेकर, प्रा. संजय दिवेकर, प्रा. नितेश तेलहांडे, प्रा. पंकज मुन, प्रा. आरती देशमुख
प्रा. रूणाली ठाकरे, प्रा.डॉ. शालीनी हटवार, प्रा.डॉ. विठ्ठल घिनमिने, प्रा.डॉ. गणेश बहादे,
प्राचार्य विनोद मुडे, डॉ. प्रविण कारंजकर, प्रा. सारीका चौधरी, प्रा. नरेश भोयर, प्रा. सुरज खोडे
प्रा. महेश झोटींग, प्रा. चंद्रकांत राडे, प्रा. प्रियंका गुडधे, प्रा. तारकेश्वरी देवतळे, प्रा. छाया मोहिजे.

### महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद




संजय पर्बत, शंकर कापसे, प्राचार्य विनोद मुडे, नरेश कातडे, सारीका चौधरी,
प्रिती सायंकार, सुरेश तेलतुंबडे, अंकुश वैद्य, अरूण तिमांडे, विजयालक्ष्मी जारोंडे



२६ जानेवारी २०१८ ला प्रजासत्ताक दिनानिमित्य काढलेल्या रॅलीचा समारोप डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक वडनेर येथे करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी




गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना प्रा.डॉ. शुभांगी डांगे, (गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख) हिंगणघाट मंचावर प्राचार्य विनोद मुडे, प्रा.डॉ. गणेश बहादे, प्रा. आरती देशमुख, गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख




जागतिक महिला दिना निमित्य महिला विषयक कायदे व संरक्षण या विषयावर मार्गदर्शन करतांना ॲड. प्रतिभा भानखेडे (बोरीकर) हिंगणघाट मंचावर प्रा.दिवाकर गमे संस्थासचिव, प्रा. विनोद मुडे प्रा. डॉ. नरेश भोयर, प्रा.डॉ. गणेश बहादे



महाविद्यालयातील आयोजीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब्रिलीयंसी अवार्ड स्पर्धा परिक्षेकरीता मार्गदर्शन करतांना मा. श्री. नितेश कराळे, वर्धा श्री. दशरथजी ढोकपांडे हिंगणघाट, पत्रकार-सकाळ, सौ. मिनाक्षी रामटेके, समन्वयिका 'यिन' सकाळ, वर्धा




मराठी अभ्यास मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शक श्री. गिरी महाराज (गुरूदेव सेवा मंडळ) मंचावर उपस्थित प्रा.डॉ. प्रविण कारंजकर व मान्यवर




समाजशास्त्र विभागा तर्फे आदीवासी समाजाचे डोंगराळ टेकडीवरील अनुपोड या वस्तीच्या अभ्यास दौऱ्यात सहभागी प्रा.डॉ. गणेश बहादे व महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाचे सर्व विद्यार्थीनी

# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर




दि. १० फेब्रुवारी २०१५, युवा स्फुर्ती महोत्सवाप्रसंगी 'लेक सावित्रीची' वार्षिकांकाचे प्रकाशन सोहळ्याला उपस्थितीत मा. सौ. हेमलता गमे, संस्थाध्यक्षा, मा. प्रा. दिवाकर गमे, सचिव, मा. ॲड. श्री. बाबुराव बेलसरे, अमरावती, मा. डॉ. विनायक देशपांडे, कुलगुरू (प्रभारी), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, मा. श्री. समीरभाऊ कुणावार, आमदार, हिंगणघाट, मा. श्री. सुनिलभाऊ राऊत, अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, वर्धा.




श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर येथील प्राचार्य, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी-विद्यार्थीनी.

# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर

श्री साईबाबा कला महाविद्यालय, वडनेर
ज्ञानियाने उजळु या ग्राम ग्राम

# शेतकऱ्यांचा आसूड

वार्षिकांक

## संपादक मंडळ


**प्रकाशक**

प्राचार्य विनोद मुडे

**कार्यकारी संपादक**

प्रा.डॉ. विठ्ठल घिनमिने

**अहवाल संकलन व संपादन**

प्रा.डॉ. प्रवीण कारंजकर

**सहसंपादक**

प्रा.डॉ. गणेश बहादे
प्रा.डॉ. नरेश भोयर
प्रा. पंकज मुन
प्रा. आरती देशमुख
प्रा. नितेश तेलहांडे
प्रा. संजय दिवेकर

**विद्यार्थी संपादक**

| | |
|---|---|
| कु. पल्लवी झाडे | बी.ए. भाग-३ |
| सचिन सोगे | बी.ए. भाग-३ |
| कु. प्रिती वांदिले | बी.ए. भाग-२ |
| कु. मनिषा ताकसांडे | बी.ए. भाग-२ |
| कु. पुजा कलोडे | बी.ए. भाग-१ |
| मयुर भोयर | बी.ए. भाग-१ |



**प्रा.डॉ.आर.बी. भांडवलकर**
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ


# शुभेच्छा संदेश

श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर, जि. वर्धा ग्रामीण भागातील खऱ्या समस्येची जाणीव व शेतकऱ्यांच्या व्यथा महात्मा ज्योतिबा फुले यांनी शेतकऱ्यांचा आसुड या ग्रंथातून व्यक्त केल्यात. त्याच नावाने आपण सत्र २०१७-१८ सत्राचा 'शेतकऱ्यांचा आसुड' वार्षिकांक प्रकाशित करीत आहात हे ऐकून मन:स्वी आनंद झाला.

महाविद्यालयाचा वार्षिकांक नवोदित लेखकांना उद्याचा साहित्यिक बनविण्याच्या मार्गातील एक पाऊल असते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या विदर्भातील एक समस्या हे नवोदित लेखक आपल्या प्रतिभासंपन्न विचारातून लेख, कविता, कथा व इतर लेखनातून व्यक्त करतील असा मला विश्वास आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीतील या महत्वपूर्ण उपक्रमाबद्दल महाविद्यालयाचे व्यवस्थापन मंडळ, प्राचार्य व संपादक मंडळाचे मी अभिनंदन करतो.

वार्षिकांकास मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा !

यवतमाळ
दि. १७.१.१८






**प्रा. विवेक श्री. देशमुख**
अधिसभा सदस्य
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ
अमरावती


# शुभेच्छा संदेश


*जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहावयास लावणाऱ्या जाणिवा, मूल्ये व संस्कार रूजविणारी निरंतर प्रक्रिया म्हणजे 'शिक्षण' होय. आपल्या महाविद्यालयाने शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी सतत प्रयत्न केलेले आहेत. आपण यावर्षी 'शेतकऱ्यांचा आसुड' हा वार्षिकांक काढत आहे ही आनंदाची बाब आहे. विद्यार्थ्यांना व शिक्षकांना आपले विचार, कल्पना व अनुभव बेधडकपणे मांडण्यासाठी या माध्यमातून एक संधी मिळते. त्यांच्या त्या उत्साहाला मुर्त रूप मिळवून देण्यासाठी तसेच त्यांच्या सुप्त प्रतिभेला फुलविण्यासाठी वार्षिकांक एक सुंदर माध्यम ठरत.*

*सदर उपक्रमासाठी प्राचार्य व संपादक मंडळाचे अभिनंदन करीतो.*

*हार्दिक शुभेच्छा !*

*यवतमाळ*

*दि. १८.०१.१८*





**Dr. Uttam B. Parekar**
Head, Dept. of English
Principal Investigator for UGC's
Major Research Project,
Yeshwant Mahavidyalaya,
Wardha.

# *Best Wishes !!*

*It gives me immense pleasure to learn that 'Shri Saibaba Lok Prabodhan Kala Mahavidyalaya, Wadner' is going to publish its annual magazine entitled.*

*Every senior college is a grass-root level functionary of the UGC carrying out the objectives of Higher Education i.e. to disseminate Knowledge, hold Research Activities, and render Extension Services in society. Under the able guidance of Prof. Diwakarraoji Game, this college is leading the movement of Higher Education in Wadner and its vicinity, prominently in rural area, in the sense of the term. This Annual Magazine shall be a precious document of the college testifying its distinguished works undertaken in the academic session 2017-2018. I express my best wishes for the overwhelming success to their endeavours.*

*Place : Wardha*
*Date : 14th January 2018*
*(Makar Sankranti)*

# वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था,
# हिंगणघाट

## -: कार्यकारी मंडळ :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सौ. हेमलता दिवाकर गमे | – | अध्यक्ष |
| २. | श्री. विनोद वामनराव राऊत | – | उपाध्यक्ष |
| ३. | प्रा. दिवाकर नानाजी गमे | – | सचिव |
| ४. | सौ. गितादेवी पंजाबराव ठाकरे | – | सहसचिव |
| ५. | श्री. संतोष महादेवराव महल्ले | – | कोषाध्यक्ष |
| ६. | सौ. लता देवरावजी इंगोले | – | सदस्या |
| ७. | श्री. अविनाश दिवाकर गमे | – | सदस्य |

वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था हिंगणघाट द्वारा संचालित
श्री. साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर
ता. हिंगणघाट, जि. वर्धा.
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ९७ (१) अनुसार

# महाविद्यालय विकास समिती

दिनांक ०३ जुलै २०१७ पासुन

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सौ. हेमलता दिवाकर गमे | (संस्था अध्यक्ष) | अध्यक्ष |
| २) | प्रा. दिवाकर नानाजी गमे | (संस्था सचिव) | सदस्य |
| ३) | श्री. विनोद वामनराव राऊत | (शिक्षण क्षेत्रातील प्रतिनिधी) | सदस्य |
| ४) | श्री. प्रदिप माधवराव महल्ले | (उद्योग व संशोधन क्षेत्रातील) | सदस्य |
| ५) | श्री. अविनाश दिवाकर गमे | (सामाजिक क्षेत्रातील) | सदस्य |
| ६) | प्रा. विनोद मारोतराव मुडे | (कार्यकारी प्राचार्य) | सदस्य सचिव |
| ७) | प्रा. डॉ. प्रविण धनेश्वरराव कारंजकर | (विभाग प्रमुख) | सदस्य |
| ८) | प्रा. डॉ. नरेश अंबादासजी भोयर | (अंतर्गत गुणवत्ता हमी समिती) | सदस्य |
| ९) | प्रा. डॉ. गणेश नथ्थुजी बहादे | (शिक्षक प्रतिनिधी) | सदस्य |
| १०) | प्रा. डॉ. विठ्ठल माणिकराव घिनमिने | (शिक्षक प्रतिनिधी) | सदस्य |
| ११) | प्रा. आरती मुरारी देशमुख | (महिला शिक्षक प्रतिनिधी) | सदस्य |
| १२) | श्री. नरेश मोतीरामजी कातडे | (शिक्षकेत्तर प्रतिनिधी) | सदस्य |
| १३) | श्री. राहुल अशोकराव दुरतकर | (माजी विद्यार्थी) | सदस्य |
| १४) | विद्यार्थी परिषदेचे सभापती | (प्रतिनिधी) | सदस्य |
| १५) | विद्यार्थी परिषदेचे सचिव | (प्रतिनिधी) | सदस्य |

## प्राचार्यांचे मनोगत

श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर हे ग्रामिण भागातील जवळपास १०० खेड्यातील मुला-मुलींना सावित्रीबाईच्या पुण्याईने उच्च शिक्षण देणारे ग्रामिण भागातील महाविद्यालय असुन श्री. संत भोजाजी महाराज, आजनसरा, श्री. भगवान शिव मंदिर, पोहणा यांच्या सहवासात निसर्गरम्य वडनेर परिसरात आहे.

स्वत: जीवन जगत असतांना इतरांनाही जीवन प्राप्त करून देण्यासाठी विद्यार्थ्यांचा चतुरस्त्र विकास व्हावा, यासाठी महाविद्यालयात नियमित विविध उपक्रमाचे आयोजन करीत असते. याकरीता शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाला सहकार्य, दत्तक ग्राम योजना, श्रमसंस्कार, रक्तदान, रोगनिदान शिबिर, संविधान रॅली, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन, विविध विषयावर सेमिनार, दिनविशेष, पर्यावरण, गृहउद्योग, स्वयंरोजगार, कृषी सेवा, सांस्कृतिक व क्रिडा सम्मेलन, दिनविशेष इत्यादी सामाजिक विकासाबाबतच्या विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकास साधला जातो.

दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा महाविद्यालयामध्ये ''शेतकऱ्यांचा आसुड'' या शिर्षकांतर्गत वार्षिकांक काढला जात असल्यामुळे शेतकरी, शेतमजुर व विद्यार्थी यांच्या विकासाबाबत सद्यस्थितीत जीवनमुल्यांची जाणीव व अडथळ्यांची ओळख होईल. यात विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सहभागामुळे महाविद्यालयातील अनेक उपक्रमांचे, अंर्तमुल्यांचे, विचारांच्या जाणीवतेचे प्रगटीकरण या वार्षिक अंकातून होत असल्यामुळे सर्वांचे मनपूर्वक अभिनंदन.

भारताच्या स्वातंत्र्याची ७० वर्ष शेतकरी यांच्या समस्या सोडविणे केवळ शासनाचे स्वप्न आहे. वडनेर परिसरातील जमीन फारशी सुपिक नसून कोरडवाहु आहे. त्यामुळे मृगाचं नक्षत्र आलं की शेतकऱ्यांचे डोळे आकाशाकडे लागतात. शेतकऱ्यांच्या मुलांनाही प्रगतीशिल शेतकरी, व्यावसायिक, कलेक्टर, तहसिलदार, वकील, शिक्षक, अधिकारी व्हावेसे वाटते. उच्चभ्रु राहणीमानाचे माजोरी दर्शन घडवण्याऱ्या प्रत्येक शहरी गोष्टींचे त्यांनाही आकर्षण आहे. उद्योगांनी देशाची अर्थव्यवस्था खरेदी करता येईल इतकी संपत्ती उद्योगपतींनी कमवावी, उद्योगांनी चार पाच एकराची शेतजमीनही हिसकावून घ्यावी, सततची नापिकी आणि शेतमालाच्या पडत्या भावाने व कर्जाच्या यमाने तृप्तीचा ढेकर द्यावा, यामुळे शेतकऱ्यांचे अंतकरणे जळत नाही का ?

''साऱ्या जनतेचा भार हाये तुया पाठीवर,<br>
माझ्या शेतकरी राजा जीव नको लावु फासावर''

''मरूनही काहीच फायदा होत नाही'' हे कळल्यामुळे जेव्हा आत्महत्या थांबतील तो दिवस मात्र कळस असेल सरकारच्या आणि आपल्याही ...... निष्क्रीयपणाचा आणि निर्लज्जपणाचाही.

ग्रामिण भागातील शेतकरी, शेतमजुर व विद्यार्थी यांच्या अनेक ज्वलंत प्रश्नांना या वार्षिकांकाच्या माध्यमातून लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. अशा अनेक लेखातून त्यांनी शेतकऱ्यांच्या मनातील वेदना बोलून दाखविल्या आहेत. कविता, चारोळी, ज्वलंत व दैनंदिन घडामोडी यावरही काव्य रचले आहे. यातून शेतकऱ्यांप्रती शासनाचा बदललेला दृष्टीकोन जाणवतो. ''शेतकऱ्यांचा आसुड'' हा वार्षिकांक महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवेल व सर्वांसाठी निश्चितच आशादायी ठरेल.

महाविद्यालयाच्या सर्वांगीन विकासासाठी मोलाचे मार्गदर्शक आणि सहकार्य महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. दिवाकरजी गमे साहेब व सर्व संचालक मंडळाचे, पालकांचे सहकार्य आहेतच, या सर्वांचा मी आभारी आहो.

जय जवान ..... जय किसान ......!

✍ प्रा. विनोद मुडे<br>
प्राचार्य

# संपादकाच्या लेखनीतून

प्रिय विद्यार्थी मित्रानों,

आपल्या महाविद्यालयामध्ये सन २०१७-१८ चा 'शेतकऱ्यांचा आसुड' वार्षिकांक प्रकाशित होत असल्यामुळे मला मनस्वी आनंद होत आहे. महाविद्यालयामध्ये अनेक उपक्रमाचे व कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन यशस्वी करून महाविद्यालयाची सेवा व कर्तव्य मला पार पाडता आले. आपले महाविद्यालय ग्रामीण भागात असून सुद्धा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी यशाची दालने खुली केलेली आहे.

१७ वर्षाच्या महाविद्यालयाच्या काळात विद्यार्थ्यांसाठी परिपूर्ण सोई सुविधा देण्याचा प्रयत्न केलेला आहे. यावर्षी संपादकीय लिहण्याचा मला योग आलेला आहे. यासाठी सतत मार्गदर्शन व सहकार्य मला महाविद्यालयाचे संस्थापक सचिव प्रा. दिवाकरजी गमे साहेब, संचालक मंडळ आणि प्राचार्य विनोद मुडे यांचे विशेष सहकार्य लाभत आहे. त्यांचे मनापासून आभार मानून सदा त्यांच्या ऋणी राहू इच्छितो !

भारत हा कृषी प्रधान देश म्हणून ओळखला जातो. आज ६२% भारतातील लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पुर्वी उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी असे म्हटल्या जात होते परंतु आता उत्तम नोकरी, मध्यम व्यापार व कनिष्ठ शेती झाल्याचे दिसून येते. शेतकऱ्यांची परिस्थिती ही दीन झालेली आहे. याशिवाय जागतिकीकरण, बदलती वर्तमान परिस्थिती शेतमालाला कवडीमोल भाव या व इतर कारणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येची समस्या निर्माण झालेली आहे. वरील शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा ऊहापोह व्हावा म्हणून शेतकऱ्यांच्या आसुड या वार्षिकांकाच्या मदतीने सोडविण्याचा लहानसा प्रयत्न.

आपल्या महाविद्यालयातील बहुतांश विद्यार्थी हे शेतकऱ्याचे मुले असल्यामुळे शेती व शेतीच्या प्रश्नांची त्यांना जाण आहे. शेतकऱ्याच्या प्रश्नांवर वाचा फोडण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या शेती विषयक साहित्य व सुप्त गुणांना वाव मिळवून देण्याचे वार्षिकांक हे उत्तम साधन असते. तसेच महाविद्यालयातील इतर घडामोडींचा त्यात समावेश असतो. या वार्षिकांकाला परिपूर्ण करण्याचे ज्यांनी ज्यांनी केले ते अभिनंदनास पात्र आहेत असे मी समजतो.

मित्रांनो,

शेतकऱ्याच्या प्रश्नांवर एकत्र येणे ही काळाची गरज आहे. म्हणूनच म्हणतो शेतकरी सुखी तर देश सुखी.

**※ प्रा.डॉ. विठ्ठल घिनमिने**
कार्यकारी संपादक

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| महात्मा फुलेंचा शेती विषयक विचार | कु. अश्विनी राखडे | १ |
| म. फुले कृत शेतकरी उन्नतीचे उपाय | डॉ. प्रवीण कारंजकर | ५ |
| गृहअर्थशास्त्र स्वयंरोजगाराच्या संधी | प्रा. आरती देशमुख | ७ |
| दुष्काळ व सततची नापिकी | कु. वैजयंती मांडेकर | ११ |
| संघर्ष करण्याची कविता | कु. अंकिशा ताजणे | १३ |
| करार शेती | कु. मोनाली पोहाने | १४ |
| राष्ट्रसंताचे शेतीविषयक विचार | प्राचार्य विनोद मुडे | १६ |
| शेतकरी आत्महत्या | कु. बौद्धश्री गावंडे | १८ |
| फक्त तुझ्यासाठी | कु. प्रिया इखार | २० |
| वनसंरक्षण | कु. काजल महाजन | २१ |
| जगाचा पोशिंदा | लहू मोहिते | २२ |
| कृषी प्रधान देश : भारत | मयुर घोडमारे | २३ |
| शेतकरी | कु. राखी कुळसंगे | २४ |
| कॉलेज लाईफ | कु. रूपम सुपारे | २४ |
| वडिलांबद्दल माझे विचार | मयुर भोयर | २५ |
| आई | कु. संगीता दांडेकर | २६ |
| बळीराजा | कु. निशा कडवे | २६ |
| शेती क्षेत्रातील कर्जबाजारीपणा | कु. प्रणाली शेन्डे | २७ |
| गणेशा बाप तू बळीराजाचा | कु. दिपाली पारिसे | २९ |
| शेती संबंधित जोडधंदा | कु. प्रणाली इंगोले | ३० |
| देशाचा आधारस्तंभ शेतकरी | कु. रूपाली चरडे | ३२ |
| कविता | कु. जया दाते | ३३ |
| तुं ये रे बा विठ्ठला | कु. मोनाली सं. लोहकरे | ३३ |
| पाणी अडवा पाणी जीरवा | कु. रश्मी विनोदराव बुटे | ३४ |
| शेतमाल प्रक्रिया उद्योगाचा अभाव | कु. सीमा शेन्डे | ३७ |
| जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम | प्रा. डॉ. विठ्ठल घिनमिने | ३८ |
| माती परिक्षण | कु. मनिषा ताकसांडे | ४० |
| वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांची आत्महत्या | कु. चंचल ठोसरे | ४२ |
| कोरडवाहु शेतीच्या समस्या व उपाययोजना | कु. भक्ती घरझोडे | ४५ |
| शेती समस्या | कु. ललिता शेलवटकर | ४७ |

| | | |
|---|---|---|
| वृक्ष संवर्धन काळाची गरज | कु. लिखिता कुंभारे | ४९ |
| पशुपक्ष्यांच्या हालचालीवर बळीराजाचे लक्ष | प्रकाश चिडाम | ५२ |
| सहकाराच्या माध्यमातूनच शेतीचा विकास शक्य | सचिन सोगे | ५३ |
| शेतकरी आत्महत्या ही जागतिक समस्या | कैलास पिंपळापुरे | ५५ |
| निष्ठा | कु. स्नेहा सुरकार | ५७ |
| **CAUSES AND SOLUTIONS OF FARMERS' SUICIDE AND FIALURE LAND** | **Prof. Nitesh N. Telhande** | ५८ |
| वर्धा जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या – कारणे व उपाय | प्रा.डॉ. गणेश एन. बहादे | ६१ |
| प्रदूषणाचा अजस्त्र विळखा | कु. दिपाली कृष्णाजी पारसड | ६४ |
| प्रदूषण रोखणारी फौज म्हणजे वृक्ष | कु. पुजा कलोडे | ६६ |
| शास्त्रीय पद्धतीने वनीकरण करा... | गणेश जयपूरकर | ६८ |
| माझी आई | कु. लिना दादाराव कुडमते | ६९ |
| शासनाच्या शेतीकरीता विविध योजना | भाग्यश्री ढगे | ७० |
| आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर | पुनम रा. नौकरकार | ७३ |
| वृक्ष संवर्धन–काळाची गरज | कु. प्रिती रामभाऊ वांदिले | ७६ |
| भारतीय कृषीचे महत्व | कु. स्वाती वरूडकर | ७८ |
| बळीराजा | कु. प्राजक्ता सुरेशराव कुरसंगे | ८१ |
| वेळेचे महत्व | सुरज साटोने | ८२ |
| मुक्ता साळवेचा निबंध वाचा ऐका | प्रणय खंदार | ८२ |
| माझी आई | कु. पल्लवी झाडे | ८३ |
| भारतीय शेतकऱ्यांच्या विकासाच्या संदर्भात महात्मा फुले यांच्या विचारांची भुमिका | प्रा. पंकज वा. मून | ८४ |
| इंग्रजी विभाग | प्रा. नितेश तेलहांडे प्रा. संजय दिवेकर | ८७ |
| राज्यशास्त्र विभाग | प्रा. विनोद मुडे | ८८ |
| अर्थशास्त्र विभाग | डॉ. विठ्ठल घिनमिने | ८९ |
| समाजशास्त्र विभाग | प्रा. डॉ. गणेश बहादे | ९० |
| गृहअर्थशास्त्र विभाग | प्रा. आरती देशमुख | ९० |
| इतिहास विभाग | प्रा. पंकज भोयर | ९१ |
| शारिरीक शिक्षण विभाग अहवाल | प्रा.डॉ. नरेश भोयर | ९२ |
| सांस्कृतिक विभाग | प्रा. नितेश तेलहांडे | ९३ |
| राष्ट्रीय सेवा योजना अहवाल | प्रा. पंकज मुन | ९७ |
| मराठी अभ्यास मंडळ कार्यवृत्तांत | प्रा. डॉ. प्रवीण कारंजकर | ९८ |
| स्पर्धा परिक्षा व स्वयरोजगार मार्गदर्शन विभाग स्पर्धा | प्रा. संजय दिवेकर | ९८ |
| अल्पकालीन स्वयंनिर्वाही अभ्यासक्रम अहवाल | प्रा.डॉ. विठ्ठल घिनमिने | ९९ |

# महात्मा फुलेंचा शेती विषयक विचार

कु. अश्विनी राखडे (बी.ए. भाग-३)

विद्ये विना मति गेली।
मति विना नीती गेली।
निती विना गती गेली ।
गति विना वित्त गेले।
वित्त विना शुद्र खचले
इतके अनर्थ एका अविद्येने केले ।

महात्मा जोतीराव फुले यांनी 'शेतकऱ्याचा असुड' हा ग्रंथ लिहिला. भारत हा शेतकऱ्यांचा देश आहे. याचा अर्थ शेती हाच उद्योग या देशात केंद्रस्थानी आहे. आजही ७०% जनता शेती उद्योगात गुंतली आहे. शेतकऱ्यांच्या स्थितीविषयी एवढे तपशिलाने चिंतन करणारा, उपाययोजना सुचवणारा हा पहिला ग्रंथ आहे.

भारत हा कृषी प्रधान देश आहे. आणि शेतकऱ्याचे जीवन हे दैनंदिन प्रश्नांच्या विळख्यात अडकून बसले आहे. जगायचे कि मरायचे असा प्रश्न त्याच्या मनात निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाला सीमाच उरलेली नाही. साखर कारखान्याकडून होणारी बेसुमार लुटालुट त्यात खतांचा वाढलेला दर, न्याय मागण्यासाठी रस्त्यावर उतरले कि बळीराजावर प्रशासनाच्या वतीने गोळीबार केला जात आहे. त्याच्यामध्ये असंख्य शेतकरी दगावले. तर काहीजण गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर होणाऱ्या या अत्याचाराला राज्य सरकार नक्कीच जबाबदार आहे.

शेतकऱ्यांनी काय करायचे ? न्याय मागायला कोणाकडे जायचे ? कोण देईल त्यांना न्याय ? त्यांच्यावर होणारा अन्याय त्यांना निमुटपणे सहन करावा लागत आहे. आपला देश कृषि प्रधान देश म्हणून ओळखला जात आहे. मग आपल्या देशाला कृषि प्रधान करण्यासाठी ज्या बळीराजाने रात्रंदिवस शेतात कष्ट केले. त्याच्या कष्टाचे काय ? हा प्रश्न नेहमी डोळ्यासमोर उभा राहतो.

संपुर्ण देश हा त्या शेतीत राबणाऱ्या बळीराजावर जगतो आहे. त्यांच्या कष्टांच फळ त्यांना मिळालं पाहिजे. सरकारने त्यांचा विचार केला पाहिजे. नाहीतर त्यांच्यावर तो अन्याय होईल. शेतकरी जे पिके पिकवितो त्याचा भाव दिला जात नाही. आज कांदा ५० रूपये झाला तर लगेच आंदोलने आणि बातम्या चालु झाल्या, सफरचंद १०० रूपये किलो होऊन खातातच ना ! मग कांदा ५० रूपयाचे घेऊन खाल्ला तर कुठे बिघडले शेवटी तोही जिवनावश्यक वस्तुमध्येच मोडतो ना. शेतकरी सतत उन्हातान्हाची पर्वा न करता शेतात राब राब राबतो. शेतामध्ये तो एवढं कष्ट करतो पण त्याला काय मिळतं, काहीच मिळत नाही. मालाला किंमत मिळत नाही. खताचे दर वाढतात, जीवनावश्यक वस्तुचे दर वाढतात. मग

शेतकऱ्याच्या मालाची किंमत का वाढत नाही. तुम्हाला हा गरीब शेतकरी सापडला म्हणून तुम्ही त्याचे वाटेल तसे शोषण करता.

शेतात राबणारा शेतकरी जमिनीचा खऱ्या अर्थाने मालक व्हावा शेतकऱ्यांची सावकाराकडून होणारी पिळवणूक बंद करण्यात आली व बँकामार्फत शेतकऱ्यांना मदत देऊ करण्यात आली. पण हे सगलं शेतकऱ्यांपर्यंत कोणीही पोहचवले नाही. आणि शेतकरी हा कंगाल जीवन जगत आहे. कधीकधी पिकवलेल्या मालाला भाव येत नाही. तर कधीकधी दुष्काळ पडला तर पाऊस येत नाही. तर शेतकरी कर्ज कशी फेडणार ? शेवटी शेतकरी आत्मत्येचा मार्ग स्विकारतात, कर्ज बळी ठरतात ? शेतकऱ्याच्या सर्वनाशाला अविद्या जबाबदार आहे. आणि तीन गोष्टी कारणीभूत ठरतात. पहिली गोष्ट त्यांच्या धार्मिक समजुती, दुसरी गोष्ट त्यांची स्वत:ची मनोवृत्ती, तिसरी गोष्ट म्हणजे प्रशासन या सगळ्या गोष्टी तेव्हा इंग्रजांच्या काळात त्यांना समजत नव्हत्या. इंग्रजांच्या लाठीखाली ते राहिले, कर्जबाजारीपणा सहन केला पण त्यांनी तोंडातून आवाज सुद्धा काढला नाही. शेतकरी हे इंग्रजांच्या खुप काळ गुलामगीरीत राहिले म्हणून आता शेतकऱ्यांच्या आचरणावर डोळा ठेवण्याकरीता सरकारने 'डिटेक्टिवह' डॉक्टरांच्या नेमणुका केल्या. मुला-मुलींची लग्ने लहानपणी करू नयेत, शुद्रांच्या मुलांनी शिकावे याची आरक्षणव्यवस्था असावी. खतांचा पुरवठा व्हावा. कालवे व पाटबंधाऱ्याच्या सोयी व्हाव्यात हे विचार शासनानी लोकांपर्यंत पोहचवायला पाहिजे.

शेतकऱ्याचे जीवन सुखी व्हावे म्हणून शत्रुविरूद्ध लढण्याचा पराक्रम केला. शेतकऱ्याचे जीवन सुखी व सुसह्य व्हावे असे आजही आपले मत आहे. जीवनविषयक नवा दृष्टिकोण आत्मसात करून आणि हा दृष्टिकोण देणारे शिक्षणाचे हत्यार वापरून आजच्या काळात शेतकऱ्यांना मदत करायला पाहिजे. पण असं कोणीही करत नाही. नोकरदार किंवा राजकीय नेते मोठमोठ्या कार मधून फिरतात. पण त्यांना गरीब शेतकऱ्याची स्थिती जाणवत नाही. शासनाची मानसं शेतकऱ्याच्या भरोश्यावर ऐशआरामाची जीवन जगतात. आणि शेतकरी हा कष्ट उपसत असतो. मग त्याच्यावर अन्याय का ?

'रानं सार कोरडेच<br>
नाही पिकालाही पाणी<br>
मायबाप फिरतात<br>
रात्रंदिवस अणवानी'

जी सत्ताकेंद्रे ग्रामीण भागातून शेतसारा आणि इतर स्वरूपाचे कर त्यांच्या माध्यमातून नियमितपणे पैसा ओढीत. राजघराण्यांची व त्यांच्या अधिकाऱ्यांची चैन त्यांच्या पैशातून चाले. म्हणूनच त्यांच्या ऐश-आरामाची, सेवा पुरविण्यासाठी दुर दुरचा कारागीर वर्ग, चित्रकला, संगित, नृत्य इत्यादीमधील वाकबगार कलावंत अशी सत्ताकेंद्र असलेल्या गावी स्थायिक होत. अर्थातच, व्यापारी केंद्रामधून शेतकरी आपले वरकड उत्पादन विक्रीसाठी आणत तेव्हा ते कमी किमतीत खरेदी करीत तेव्हा शेतकऱ्याचे शोषण होत असे.

‘रानं भिजवती सरी
मग बांधावं बंधारे
तंव्हा कोरड्या हिरीचे
खोदा उकलती झरे’

जेव्हा शेतकरी शेतीसाठी कालव्याचा किंवा धरणाचा उपयोग करीत त्यात चुकीचे शेतसारा धोरण, भरमसाठ कर, आकारणी, करवसुलीची चुकीची प्रथा यासारख्या बाबी आगीत तेल ओतात. याचा परिणाम असा झाला कि शेतकरी नेहमी पैशाच्या चणचणीत असे. तेव्हा अडचणीच्या वेळी तो खाजगी सावकाराकडे धाव घेत असे. सावकारांचे व्याजाचे दर भरमसाठ असत. त्यामुळे एकदा कर्जबाजारी झालेला शेतकरी पुढे आयुष्यात कर्जबाजारीच राहात असे शेतसारा रोखीच्या रूपात भरणे अनिवार्य केल्यामुळे शेतकऱ्याला त्यासाठी त्याचे धानोत्पादन बाजारात विकावे लागे. त्यामुळे भावातील चढ–उताराचांही शेतकऱ्यानांच झळ पोहचतं असे. शेतसारा न भरू शकल्याने सरकारने जमिनीचा लिलाव करू नये. म्हणून शेतकऱ्यांना अशा अडचणींच्या वेळी सावकाराकडे धाव घ्यावी लागे. आणि सावकार हे चांगल्या प्रकारे शेतकऱ्याचे आर्थिक शोषण करून घेत असे.

जमिनीचे गहाणखत होऊ शकत असल्याने आणि सरकार कागदोपत्री पुराव्यांना महत्व देत असल्याने सरकारचे फावले जावु लागले. शेतकऱ्याने कर्जाची परतफेड केली तर मुद्दल आणि भरमसाठ दरातील व्याज मिळाल्याने त्याचा लाभ होत असे. आणि जर तो परतफेड करू शकला नाही तर गहाणखत करून घेतलेली जमिन त्याला मिळे. म्हणजे दोन्ही परिस्थितीत सावकारांचाच फायदा होत असे. आणि सावकार शेतकऱ्याची पिळवणूक करीत असे. शेतकरी जर सावकाराकडे कर्ज मागण्यासाठी गेले तर सावकार हे शेतकऱ्यांना कर्ज देतात पण कर्जाच्या मोबदल्यात शेतकऱ्यांची शेती ते स्वत: साठी पिकवित असतात. मग शेतकऱ्यांने काय करावे. जिकडे जावे तिकडे सावकार शेतकऱ्यांचे शोषण करतात.

‘‘ आडवावे जागोजागी
सारे उतारात पाणी’’

शेतकऱ्यांना माफक दराने कर्ज, ‘पाणी अडवा, पाणी जिरवा’ योजना शेतकरी शिक्षण कार्यक्रम आणि बारीक–सारीक सुचना स्वतंत्र महाराष्ट्राच्या पहिल्या पिढीच्या राज्यकर्त्यांनी विचारात घ्यायला पाहिजे. ग्रामीण जनतेच्या हालअपेष्टा आणि शेतीबद्दल अनेक समस्या आहे. शेती हा व्यवसाय निसर्गावर अवलंबून आहे. नैसर्गिक आपत्तीच्या स्थितीत फारसे काही करता येत नसले तरी आपत्तीग्रस्तांना आर्थिक व अन्य स्वरूपाचे सहकार्य करणे हे तरी आपल्या हातात आहे आणि शासनाने त्या कामी आघाडीने कार्य केले पाहिजे. सरकारी शेतसाऱ्याने आणि सावकारी शोषनाने तो कात्रीत सापडला आहे. या दोन्ही गोष्टी शासकीय प्रयत्नाने कमी करणे शक्य आहे. आणि केले पाहिजे. जेणेकरून सावकाराकडन शेतकऱ्यांची पिळवणूक होणार नाही याची काळजी सरकारने घेतली पाहिजे. शेतकरी हा रात्रंदिवस कष्ट

करून पुर्णपणे शेतीसाठी झिजत चालला आहे. तर त्याची काळजी सरकारने घेतली पाहिजे. शेतकरी कोणत्या वेळी कोणते पीक घेतो. त्याला योग्य भाव देणे हे सरकारचे कर्तव्य आहे. हे कर्तव्य शेतकऱ्यांबद्दलचे सरकारने पुर्ण केले पाहिजे आणि त्यांची मदत केली पाहिजे.

'असं याव सरकार
लई असाव दयाळु
शेतामधी राबतील
शेतकरी भाऊ'

शेतकऱ्यांची स्थिती सुधारावयाची असेल तर सरकारने स्थानिक गरजा पाहुन शेतमालाची निर्यात केली पाहिजे.

'शेतकरी पोरालाही
त्यांनी लई शिकवावं
शिकलेले सद्‌गुणी
गावोगावं पाठवावं'

तर शासनाने पुढाकार घेऊन बालविवाहाची परंपरा थांबवावी, शुद्रांना शिक्षणास प्रोत्साहन द्यावे, गरीब घरातल्या मुलांना नोकऱ्या द्याव्या, गावात शिक्षणाची सोय झाली पाहिजे, समाजात अनेक जाती-जमातींच्या मुला-मुलींना शिक्षण द्यायला पाहिजे. आणि सरकारनी सर्व हक्क शेतकऱ्यांना मिळून दिले पाहिजे. समाजात एक प्रथा चालत आली ह्या प्रथेबद्दल शासनानी आवाज उठवायला पाहिजे. मृत्युनंतर शांती मिळावी म्हणून ब्राम्हणाकडे कर्मकांड करूण घेणे म्हणजेच एक प्रकारचे शोषण आहे.

सृष्टी ही ईश्वराची निर्मिती आहे. जी सृष्टी निर्माण करू शकतो त्याला माणसाकडून काहीही अपेक्षा नाही आणि सर्वांच्या मते ईश्वर एक आहे

'विद्या देवाची आम्हांला
ती इमाने इतबारे
बुद्धिवंत डोक्यातून
वाही ज्ञानाचेच झरे'

*भारतीय शेतकरी कर्जात जन्म घेतो, कर्जात वाढतो, कर्जात मरतो आणि आपल्या वारसांवर कर्जाचा भार ठेवुन जातो.*

*❊ रॉयल कमिशन ऑन ॲग्रिकल्चर*

# म. फुले कृत शेतकरी उन्नतीचें उपाय

✍ डॉ. प्रवीण कारंजकर

स्वत:चे सर्वस्व शेतात ओतून उभे राहणाऱ्या शेतकऱ्याच्या कुटुंबात जन्माला आल्यामुळे म. फुलेंनी मांडलेले शेतकऱ्याच्या जीवनाचा आलेख वास्तवाच्या पायावरती उभा आहे.

त्यांनी इंग्रजी सरकारला शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी ज्या उपाययोजना योजायला लावल्या त्या आजच्या काळातही उपयोगी अशाच आहेत. मानवाने आपल्या उत्कर्षासाठी उद्योगी व्हायला पाहिजे हा उद्योग म्हणजे शेती ही असू शकतो. मात्र जो असे करीत नाही तो

सर्व दुर्गुणांचा आळस हा पिता ।
बाळपणी कित्ता । मुली मुला ।।
तरूणपणात दुर्गुणी संसारी ।
वृद्धपणी करी । हाय हाय ।।

जो तरूणपणात उद्योगाचा आळस करतो. तो वृद्धपणात त्याची कटुफळे भोगतो असे सांगून शेतकऱ्यांनी आळस सोडून आपले काम करावे असे शेतकऱ्यांना ते सांगतात सोबतच तत्कालीन सरकारने ही शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी उपाय योजना कराव्यात यावरही भाष्य करतात.

यांत्रीक शेती :-

मु. फुलेंचा शेती विषयक दृष्टीकोण व्यापक होता. त्यात दुरदृष्टीही होती. म्हणूनच त्यांनी शेतीमध्ये यंत्राचा वापर केल्या शिवाय मुबलक पिक होणार नाही आणि शेतकरी सुखाने नांदणार नाही हे ओळखूनच इंग्रजी सरकारला विनंती केली की, इंग्रजी सरकारने येथील शेतकऱ्यांना युरोपियन शेतकऱ्याप्रमाणे यंत्राद्वारे शेती करणे शिकवावे. त्यासाठी त्यांना युरोपियन शेतकऱ्याप्रमाणे विद्या शिकवावी. त्यांना विलायतला शेतकीशाळा बघण्यासाठी पाठवावे.

मात्र असे असले तरी यंत्रावर आधारित शेतीचा विचार सर्वत्र लागू करणे शक्य नाही हे ओळखूनच स्वप्नाळूपणे विचार न करता त्यांनी इंग्रजी सरकारला हे ही सांगीतले की, यंत्रावरती आधारित शेतीचा विचार लागू करण्यासाठी काही काळ लागेल. म्हणून पारंपारिक बैलांद्वारे केली जाणारी शेती चालू राहावी यासाठी सरकारने मांसाहार करणाऱ्या ख्रिश्चन आणि मुस्लिम लोकांसाठी गाय बैल मारून खाण्यावर बंदी लावणारा कायदा करण्याची मागणीही केली. यातून त्यांचा यंत्रावरती आधारित शेतीचा विचार वास्तवाच्या पायावर कसा आधारित होता हे लक्षात येते.

पाणी पुरवठ्याच्या सुविधा :-

नैसर्गिक पर्जन्यावर आधारित शेतीपेक्षा ओलीताची शेती जास्त उत्पन्न देणारी असते. हे ओळखून फुले ओलीतांवर आधारित शेती साठी सरकारने उपाय योजना करणे आवश्यक मानतात. त्यांचे कृषी क्षेत्रात जलव्यवस्थापन कसे करावे याचेही विचार लक्षणीय आहेत.

फुले म्हणतात लष्करातील काळे आणि गोरे शिपाई शातंतेच्या काळात कोणतेही काम करीत नाहीत. अशावेळी सरकारने त्यांना बसून राहायचे वेतन देण्यापेक्षा त्यांच्याकडून तलाव, बंधारे बांधून घ्यावेत. या तलावामुळे आजुबाजुच्या परिसरात पाण्याची पातळी वाढेल. आणि शेतातील विहीरींना

बारमाही पाणी राहील. परिणामी शेतांना बाराही महिने पाणी पुरवठा होईल. शेतकरी नवनवीन पिके काढु शकेल. आणि आपले जीवनमान उंचावू शकेल असा विचार ते मांडतात.

एवढेच नव्हे तर सरकारने शेतकऱ्यांना विहीरी खोदून द्याव्यात. आणि जे शेतकरी स्वत: विहीरी खोदून घेतील त्यांना सरकारने बक्षिसे द्यावीत. जेणेकरून शेतकऱ्यात उत्साहाचे वातावरण निर्माण होईल. अशा प्रकारे ज्योतिरावांनी जलव्यवस्थापन करून ओलीताची शेती कशी करावी याचा ताळेबंदच सरकारला दिला होता. त्यांचा हा विचार आजही महत्वपूर्ण आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने प्रत्यक्षाप्रत्यक्ष हाच विचार स्वीकारला आहे.

सरकारनी नोकरांवर अंकुश :-

शेतकऱ्यांच्या हलाखीवरचा महत्वपूर्ण उपाय सांगतांना ज्योतिराव म्हणतात की सरकारने शेतकऱ्यांच्या मुलांस विद्या द्यावी. अर्थात जो पर्यंत शेतकऱ्याचा मुलगा शिकत नाही तो पर्यंत शेतकरी सक्षम व समर्थ होऊ शकणार नाही. सरकार ज्या प्रमाणे रॉयल फंडातून ब्राह्मणांच्या मुलांना शिकविण्यासाठी खर्च करते त्याप्रमाणे सरकारने लोकल फंडातून शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणावर खर्च करावा.

त्याचप्रमाणे काळे गोरे सरकारी कर्मचारी यांना सरकार दरमहा मोठे पगार आणि पेन्शन्स देतात. तेव्हा सरकारने कमी पगार असणाऱ्या कर्मचाऱ्याच्या पगारात बदल न करता लठ्ठ पगार आणि पेन्शनमध्ये हळूहळू कपात करावी. आणि वाचलेला पैसा शेतकऱ्यांच्या हितासाठी खर्च करावा. जेणेकरून शेतकऱ्यांना भुकमार हलाखी सहन करावी लागणार नाही त्यांना आत्महत्येची वेळ येणार नाही.

आजच्या संदर्भातही हा विचार चिंतनीय आहे. एवढी मौलीकता आजपासून दिडशे वर्षांपूर्वी मांडलेल्या या विचारात आहे.

बक्षिस आणि शिक्षा :-

शेतकऱ्यांच्या जीवनात बदल करण्यासाठी चांगल्या कामासाठी बक्षिस आणि चुकांसाठी शिक्षा असा बदल म. फुले सांगतात. फुले म्हणतात इंग्रजी सरकारने शेतकऱ्यामध्ये स्पर्धा निर्माण करावी. यासाठी श्रावण महिन्यात प्रदर्शनी, आश्वीन महिन्यात शेतपिके आणि औत हाकण्याची स्पर्धा घेऊन उत्तम शेतकऱ्यास बक्षिसे द्यावीत जेणेकरून त्यांच्यात स्पर्धा निर्माण होईल व ते जास्तीत जास्त पिके घेण्याची आणि उत्तम औत हाकलण्याची क्षमता निर्माण होईल.

चुकीसाठी शिक्षा ही ते सांगतात, यामुळे शेतकऱ्यास विपन्नावस्था येते अशा वाईट गोष्टींवर सरकारने जरब बसवावी. यात शेतकऱ्यांना नादी लावणारी जोगतिनी कसवीणी, तमासगीर, नाटककार, आराधीनी, मुरळ्या, कोल्हाटीर्णी यांच्या कुवीतीपर गायन व वर्तनावर सरकारने बंधने लावावे असे ते स्पष्ट सरकारला कळवितात. कारण यामुळे शेतकऱ्यात अनीती निर्माण होते. परिणामी शरीरप्रकृती आणि अर्थ या दोन्हीचा नाश होतो. आणि एकूणच शेतकऱ्यांच्या सामाजीक, आर्थिक, शारीरिक व मानसिक बळाचा ऱ्हास होतो हे लक्षात घेऊन ज्योतिरावांनी हा उपाय सांगीतला होता.

अशाप्रकारे ज्योतिराव फुले यांनी शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी सरकारने करावयाचे विविध उपाय योजना सांगीतल्या आहेत.

✡ ☪

# गृहअर्थशास्त्र स्वयंरोजगाराच्या संधी

(Self Employment in Home Economics)

प्रा. आरती देशमुख
(गृहअर्थशास्त्र विभाग)

स्वयंरोजगाराची आवश्यकता :

जेव्हा एखादी व्यक्ती स्वत: पैसा व ज्ञान यांचा उपयोग करून व्यवसाय किंवा सेवा करते व त्यापासून अर्थप्राप्ती करते त्याला स्वयंरोजगार असे म्हटले जाते. स्वयंरोजगार ही आजच्या काळाजी गरज आहे. कारण वाढती लोकसंख्या, वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगती, शासनाची बदलती आर्थिक धोरणे आणि आणि डबघाईस आलेली देशाची आर्थिक परिस्थिती त्यामुळे सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रात रोजगार म्हणजे नोकरी मिळणे कठीण झाले आहे. आज सर्वच क्षेत्रात अतिशय जास्त स्पर्धा निर्माण झालेली आहे. पूर्वी सारखी सहजपणे नोकरी मिळत नाही. अशीच परिस्थिती गृहविज्ञान क्षेत्रात पण दिसून येते.

वाढती महागाई, सतत वाढणाऱ्या गरजा, जीवनस्तर उंचावण्याची इच्छा, शिक्षणासारख्या अतिशय आवश्यक बाबीवर होणारा अमाप खर्च इ. कारणामुळे फक्त एकाच्या कमाईवर घर चालविणे कठीण झाले आहे. त्यामुळे आजच्या गृहिणीला कमाई करून कुटुंबाची आर्थिक गरज पूर्ण करावी लागते परंतु आजच्या स्पर्धेच्या युगात नोकरी मिळविण्यासाठी लागणारी उच्च शैक्षणिक पात्रता सर्वांनाच सहजपणे मिळविता येत नाही. त्यामुळे नोकरी मिळाली नाही तरी गृहिणी स्वयंरोजगार करून आपली गरज भागवू शकते आणि स्वत: आत्मनिर्भर होऊन स्वाभिमानाने जीवन जगू शकते.

गृहअर्थशास्त्र हा मुलींसाठी तयार केलेला अभ्यास क्रम आहे. या अभ्यासक्रमाचे आताचे स्वरूप पुर्वीच्या मानाने बरेच बदलले आहे. बदलत्या आवश्यकतेनुसार या विषयात व्यवसाय शिक्षणावर बराच भर दिलेला आहे. या विषयात स्नातक किंवा स्नातकोत्तर पदवी प्राप्त केल्यानंतर ती विद्यार्थीनी विविध क्षेत्रात स्वत:चा व्यवसाय सुरू करू शकेल असे प्रशिक्षण तिला दिले जात आहे. व्यवसाय मोठ्या प्रमाणावर सुरू करून स्वयंरोजगाराबरोबरच ती इतरांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊ शकते. गृहविज्ञान विषयाचे शिक्षण घेतलेल्या गृहिणी करू शकतील असे प्रमुख स्वयंरोजगार पुढील प्रमाणे आहेत.

१) अन्न उद्योग :-

यात गृहिणी सुरू करू शकेल असे उद्योग म्हणजे (अ) खाद्य पदार्थ तयार करूण विकणे (ब) डबा बंद टिकणारे पदार्थ तयार करणे (क) आजाऱ्याला आवश्यक आहारोपचार पुरविणे.

अ) खाद्य पदार्थ तयार करूण विकणे :- विविध खाद्य पदार्थ जसे चकली, शेव, चिवडा, लाडु, वड्या इ. यांना घरी करणे शक्य होत नाही त्यांच्यासाठी करून विकल्यास चांगला उद्योग सुरू होतो. नागपूर, पुणे, नाशिक या ठिकाणी असे पदार्थ करून विकण्याचे उद्योग प्रसिद्ध आहेत.

ब) डबा बंद किंवा टिकणारे पदार्थांचा उद्योग :-

लोणची, पापड, जाम, जेली, सरबते, सॉस इत्यादी ज्यांना घरी करणे शक्य होत नाही त्यांच्यासाठी करून विकल्यास चांगला उद्योग सुरू होता. नागपूर, पुणे, नाशिक या ठिकाणी असे पदार्थ करून विकण्याचे उद्योग प्रसिद्ध आहेत.

क) आहारोपचार पुरविणस उद्योग :-

बऱ्याच कुटुंबामध्ये मधुमेह, रक्तदाब, अनिमिया इत्यादी सारख्या आजाराचे रूग्ण असतात. परंतु आजच्या धकाधकीच्या काळात त्यांना आवश्यक असलेला आहार नेहमी काही पुरविता येत नाही. त्यामुळे आजार वाढण्याची शक्यता असते. अशा वेळेस गृहविज्ञानाची विद्यार्थीनी स्वत:चे आहारोपचार केंद्र चालु करू शकते. त्यामध्ये ती आहाराचा सल्ला तर देऊ शकेल परंतु त्याच बरोबर आजारावर योग्य असा आहार तयार करून विकण्याचा व्यवसाय सुद्धा करू शकेल.

२) वस्त्र उद्योग :-

यात गृहविज्ञानाच्या विद्यार्थीनी करू शकतील असे व्यवसाय म्हणजे अ) तयार कपड्यांचे उत्पाद करणे ब) भरतकाम करणे क) फॅशन डिझायनींग करून स्वत:चे बुटीक काढणे ड) काही समारंभासाठी लागणारे कपडे व इतर कला कसुरीचा वस्तु तयार करणे इ) वस्त्र छपाईचा व्यवसाय करणे.

अ) तयार कपड्यांचे उत्पादन करणे :- तयार कपड्यांना तसेच विदेशात सुद्धा खुप मागणी आहे. गृहविज्ञानाची विद्यार्थीनी या उद्योगात काम करू शकते. कपडे तयार करून विकण्याचा उद्योग ती करू शकते. हल्ली प्रत्येक शाळेसाठी गणवेष असतो. आपल्याच शहरातल्या किंवा गावातल्या २-३ शाळांचे युनिफार्म शिवून देण्याचे काम ती सहज मिळवूर शकते. तसेच नविन फॅशन प्रमाणे कपडे तयार करून विकणे किंवा मागणीप्रमाणे शिवून देणे हा व्यवसाय पण ती करू शकते.

ब) भरतकाम करणे :- भारतीय भरतकामला जगातल्या वेगवेगळ्या भागातून मागणी येत असते. भरताकामाचे विविध टाके त्याच बरोबर भारतातील वेगवेगळ्या प्रांतात केले जाणारे भरतकाम यांचे शिक्षण गृहविज्ञान या विषयात दिले जाते. त्या भरतकामाची मोठ्या व्यापाऱ्यांकडून मागणी होणे व त्याप्रमाणे पुरवठा करणे असा स्वयंरोजगार ती करू शकेल. तसेच स्वत: भरतकाम करूण देणे व विकणे असा व्यवस्थापन ती करू शकेल. उदा. काथा भरतकामाच्या साड्या जगू प्रसिद्ध आहेत. ते भरतकाम गृहअर्थशास्त्र विषयाचे शिक्षण घेतलेली विद्यार्थीनी सहज करू शकेल.

क) फॅशन डिझाइनर :- फॅशन ही सारखी बदलत असते. त्यामुळे फॅशनप्रमाणे कपड्यांची मागणीपण असते. तेव्हा नवनविन फॅशन शोधून काढणे व त्याप्रमाणे कपहे तयार करणे हे फॅशन डिझाईनर करू शकते. त्याप्रमाणे यात ती आपला व्यवसाय सुरू करू शकते.

ड) समारंभासाठी लागणारे कपडे व कला कुसरीच्या वस्तु तयार करणे :- लग्न, मुंज, बारसे इत्यांदी समारंभासाठी विशिष्ट वस्तु व कपडे आवश्यक असतात. तेच तयार करून विकण्याचा रोजगार बऱ्याच स्त्रिया करतात. लहान मुलांचे कपडे, स्वेटर, शोभेच्या वस्तु तयार करण्याचे शिक्षण गृहविज्ञानाच्या

विद्यार्थीनीला दिले जाते. त्यामुळे हा व्यवसाय ती सहज करू शकते.

इ) वस्त्र छपाई :

कापडावरील विविध त्यात नाविन्य निर्माण होत असते. हे डिझाईन तयार करण्यासाठी ठप्पा छपाई, पडदा छपाई, बाटीक, बांधणी इत्यादी पद्धतींचा अभ्यास गृहविज्ञान या विषयात केला जातो त्यामुळे प्लेन कापडावर व्यक्तीला हवी ती डिझाईन हव्या त्या रंगसंगतीमध्ये तयार करून देण्याचा व्यवसाय हल्ली फार जोरात सुरू आहे. जो गृहविज्ञानाची विद्यार्थीनी करू शकते.

३) मानव विकास आणि कौटुंबिक संबंध :-

या विषयातील स्वयंरोजगार मुलांचे संगोपन जन्मापासून योग्य प्रकारे होण्यासाठी मातेला फार जागृक रहावे लागते. परंतु आजच्या धकाधकीच्या जीवन पद्धतीत गृहिणीला नेहमीच मुलांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष देणे जमत नाही. तेव्हा ती अशा ठिकाणाच्या शोधात असते की जेथे मुलांवर योग्य संस्कार होऊन त्यांचा सर्वांगीण विकास चांगला होईल. या दृष्टीकोनातून गृहविज्ञानाच्या विद्यार्थीनी पुढील स्वयंरोजगार सुरू करू शकतील. अ) पाळणा घर सुरू करणे. ब) बाल समस्या सोडविण्यासाठी पालकांसाठी सल्ला केन्द्र. क) विवाह आणि कौटुंबिक संबंध सल्ला केन्द्र

अ) पाळणार घर सुरू करणे :-

लहान मुलांचे संगोपन, त्यांची वाढ विकास यांचे शास्त्रशुद्ध शिक्षण या विषयात दिले जाते त्यामुळे या विषयाच्या विद्यार्थीनी पाळणा घर सहज सुरू करू शकतात. आज बऱ्याच गृहिणी कामासाठी घराबाहेर जात असतात. सर्वांच्याच घरी लहान मुलांना बघणारे कोणी असतेच असे नाही. त्यामुळे चांगल्या भरवश्याच्या पाळणा घरात बाळ ठेवायला गृहिणी नेहमी तयार असतात. त्यामुळे पाळणा घराचा व्यवसाय चांगला चालू शकतो व गृहविज्ञान विषयाची विद्यार्थीनी तो सहजपणे करू शकते.

ब) बालवाडी सुरू करणे :-

अडीच वर्षा पासून ते ६ वर्षा पर्यंत मुले पुर्व प्राथमिक शाळेत म्हणजेच बालवाडीत जातात. अशी बालवाडी गृहविज्ञान विषयाची विद्यार्थीनी चालवु शकते. कारण मुलांचा विकास, त्यांचे खेळ, त्यांचा भावनिक विकास याचा अभ्यास ती करते त्यामुळे अशी शाळा सुरू करू शकते.

क) बाल समस्या सोडविण्यासाठी पालकांसाठी सल्ला केन्द्र :-

मुलांच्या विविध अवस्थामुळे काही समस्या निर्माण झाल्या तर काय करावे असा प्रश्न सर्वच पालकांना पडत असतो. तेव्हा बालकांच्या समस्या सोडविण्यासाठी बाल सल्लागार केंद्र सुरू करता येईल.

ड) विवाह आणि कौटुंबिक संबंध सल्ला केंद्र :-

विवाह आणि कौटुंबिक संबंधाचे शिक्षण गृहअर्थशास्त्रात दिले जाते. त्यामुळे विवाहाच्या आणि कौटुंबिक संबंधाच्या समस्याशी या विद्यार्थीनी अवगत असतात. त्या समस्याकडे कोणत्या दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे, त्यावर कसा तोडगा काढला पाहिजे याचा अभ्यास त्या करतात. त्यामुळे त्या योग्य सल्ला

केंद्र काढून आपली सेवा देऊ शकतात व स्वत:साठी स्वयंरोजगार निर्माण करू शकतात.

४) कौटुंबिक साधन संपत्तीचे व्यवस्थापन आणि आंतरिक सजावट :-

या विषयाच्या अंतर्गत विद्यार्थीनींना गृहसजावटीचे तसेच पुष्प रचनेचे शिक्षण दिले जाते. तसेच कोणतेही कार्य करण्यासाठी आवश्यक असलेले व्यवस्थापनाचे शिक्षण पण दिले जाते. त्यामुळे ती कोणताही व्यवसाय कमीत कमी साधनांचा उपयोग करून यशस्वी रित्या करू शकते. या विषयाच्या अभ्यासामुळे विद्यार्थीनी करू शकतील असे व्यवसाय म्हणजे अ) गृहसजावटकार (Interior Designer and Decorator) ब) पुष्परचनाकार (Floriest) क) ग्राहक सल्लागार

अ) गृहसजावटकार :-

घर बांधल्यानंतर गृहसजावटीची समस्या बऱ्याच लोकांना असते. गृहविज्ञान या विषयात गृहसजावटीचे शास्त्रशुद्ध शिक्षण दिले जाते. त्यामुळे गृहसजावटकार म्हणून ती स्वयंरोजगार करू शकते. त्यात फर्निचरची मांडणी, भितीबद्ध फर्निचर करणे, विविध वस्तुंची मांडणी इत्यादी विषयी सल्ला ती देऊ शकते.

ब) पुष्परचनाकार : पुष्पगुच्छांचे (Bouquet) चे महत्व दिवसेंदिवस फार वाढत आहे. वाढदिवस, लग्न व इतर अभिनंदन करण्यासारख्या सर्व प्रसंगांच्या वेळी पुष्पगुच्छ देण्याची प्रथा आता पाश्चात्यांप्रमाणे आपल्याही समाजात रूजली आहे. त्यामुळे पुष्पगुच्छ करून विकण्याचा व्यवसाय गृहविज्ञान विषयाच्या विद्यार्थीनी करू शकतात. पुष्पगुच्छ व पुष्परचना करण्याचे शिक्षण त्यांना या विषयांतर्गत दिले जाते. मोठ्या शहरांमध्ये मोठ्या हॉटेल्स मध्ये तसेच ऑफिस मध्ये पुष्परचना करण्याचे करार (Contract) करून स्वयंरोजगार मिळू शकतो.

क) ग्राहक सल्लागार :-

या विषयांतर्गत ग्राहक कल्याण, ग्राहक उपयोगी सेवा, ग्राहक संरक्षण कायदे इत्यादीचे शिक्षण मिळते. त्यामुळे ग्राहकांच्या समस्यांवर योग्य सल्ला देण्यासाठी ''ग्राहक सल्लागार केंद्र'' या विषयाच्या विद्यार्थीनी उघडू शकतील. ग्राहकांना व्यापारीक, दुकानदार, उत्पादक तसेच शासकीय सोयी सवलती या सगळ्या विषयीच समस्या असतात. बऱ्याच ठिकाणी त्यांची फसवणूक व पिळवणूक होत असते. मात्र त्यावर उपाय काय करायचा हे बऱ्याच ग्राहकांना माहित नसते. अशा वेळेस ग्राहक सल्लागार म्हणून गृहविज्ञानाच्या विद्यार्थीनी काम करू शकतील.

अशाप्रकारे या विषयाच्या सर्वच शाखांमध्ये विद्यार्थीनींना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध असतात. जो स्वयंरोजगार त्या निवडतील त्याचा थोडा सखोल अभ्यास त्यांनी केला तर त्या स्वयंरोजगारात नक्कीच यशस्वी होऊ शकतील.

# दुष्काळ व सततची नापिकी

कु. वैजयंती मांडेकर बी.ए. भाग ३

भारत हा कृषी प्रधान देश आहे. येथील सुमारे ७५ टक्के लोकांचा व्यवसाय शेती हा आहे. सद्यास्थितीत विविध कारणाने शेती व्यवसाय धोक्यात आला आहे. दरम्यान परंपरागत पिढीजात शेतकरी कसा चुकत आहे. तो आळशी झाला आहे, तो आत्महत्या करून पळपुटेपणा करतो आहे असे असंवेदनशिल वक्तव्य शेतकऱ्यांच्या बाबतीत सातत्याने केले जात आहेत. हे सर्व ऐकुण आपल्या भूमिशी अर्थात काळ्या आईशी प्रामाणिक असलेल्या शेतकऱ्यांना 'खरचं' आपलं काही चुकत आहे काय ? हा प्रश्न सतावीत आहे.

सध्याच्या परिस्थितीमध्ये कोणतेही वृत्तपत्रे वाचण्यासाठी घ्या 'शेतकरी आत्महत्या' हे शिर्षक मात्र त्या वृत्तपत्राची शोभा वाढविते. हे शोभेच कारण नसून तर ती एक चिंतेची बाबत आहे. 'शेतकरी आत्महत्या' या विषयावर लोकसभा, राज्यसभा गाजत निघाल्या पण यावर तोडगा काढायचा हे सर्व विसरूनच गेले. सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारले असता ते उत्तर देतात. 'शासनाकडे (केंद्र सरकारकडे) आम्ही मागणी केली आहे. त्यावर ते आपली मदत लवकरच देतील असा आमचा विश्वास आहे. पण कधी देतील इकडे तोंडच पाणी पळालयं. तरी हे चालूच. यावर विरोधकांची टिका, आंदोलने पण याला काय अर्थ सत्तेत राहून तुम्ही काय केलत. सत्तेशिवाय आम्ही काही करू शकत नाही. ज्योतिबा फुले, तुकडोजी महाराज, गाडगेबाबा आणि आताचे अण्णा हजारे यांनी कधी नाही केली हात. मग काय त्यांनी नाही केला विकास. खेडीच्या खेडी सुधारली त्यांनी सत्तेशिवाय. सत्तहा हा प्रश्न राजकारण्याचा सत्तेपुढे यांना काही दिसत नाही. शेतकरी वाचला काय नी मेला काय. शेतकऱ्यांसाठी ज्या योजना राबविण्यात येतात. जे पैसे येतात ते गळणी लागल्याप्रमाणे येतात. शेवटी शेतकऱ्यांच्या हाती काय पडत निराशा.

निवडणूकीद्वारे आपले आपले अमुल्य मत देतो. मग नंतर कळत हे तर एकाच माळीचे मणी. ते सांगतात. योजनाद्वारे लाभ घ्या, बँकेतून कर्ज मिळवा. हे शेतकऱ्यांसाठी एक दिव्यच आहे. अगदी ७/१२, ८ अ तलाठ्यापासून कागद मिळेपर्यंत. पुन्हा पासबुकात कर्ज जमा होईपर्यंत प्रत्येक टप्यात खर्च करावा लागतो. पुन्हा अटी व नियम तर सोबतीला आहेतच.

आपण शेतकऱ्याला 'बळीराजा' म्हणजो पण 'बळी' जातो तो कसला हो राजा. शासन ही शहर सुधारायला निघाली पण 'स्मार्ट सिटी' ऐवजी 'स्मार्ट खेडी' करा ना. आजच्या भ्रांत चंगळवादात तो (शेतकरी) गुरफटलेला आहे. काल परवा शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारा सवंगडी आज बाईकवरून फिरतो. त्याच्याजवळ स्मार्ट भ्रमणध्वनी आहे. तो आर्थिकदृष्ट्या सुरक्षित आहे. पण आज ही शेतकरी मात्र जिथे होता तिथेच आहे. त्याला आर्थिक सुरक्षितता नाही. शेतीतील खर्च, संसार, उत्पादन याची आकडेमोड करता करता त्याच्या नाकी नऊ येतात. मुला, मुलीचे

शिक्षण, मुलीचे लग्न, म्हाताऱ्या आईवडिलांच्या आजारावरील खर्च, या सर्व बाबीची पुर्तता कशी करावी. या प्रश्नामुळे तो धास्तावून गेला आहे. यातून घडतात मग आत्महत्या. त्या व्यसनामुळे किंवा प्रेमामुळे नाही तर कर्जामुळे, नापीकीमुळे आत्महत्या घडतात.

काही दिवसापूर्वी केंद्रिय कृषी मंत्री यांना शेतकरी आत्महत्येच कारण विचारला असता त्यांनी शेतकरी आत्महत्या या प्रेमभंगामुळे होत आहेत. अशी मुक्ताफळे उधळून शेतकरी प्रश्नांवर मलम लावायचे सोडून मीठ चोळले आहे. आपली बुद्धी, विचार हे जगाच्या पोशिंद्याच्या बाबतीत कितपत खाली जाऊ शकते हे दाखवून दिलेले आहे. नंतर माफी मागून काय उपयोग.

पावसाची वाट पाहता पाहता शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी आलय, लोकांकडून फसवणूक होता होता आता पाऊस सुद्धा शेतकऱ्याला फसवायला लागलाय. नांगरणी, पेरणी करून शेतकरी पावसाची वाट पाहायला लागला. पण याही वर्षी पावसाने आपले हात वर केले. नदी, नाले, विहीरी हि कोरडी पडली.

मराठवाड्यात तर वरूणराजाने आपली दया दाखवलीच नाही. शेतकऱ्यावर दुबार पेरणीच संकट ओढवलं. त्यात बि-बियाणाचे भाव तर आकाशाला भिडले. कर्ज काढून बियाणे घेतले. पण पाण्याशिवाय ते तरी काय जादू दाखवतील. दुष्काळाच सावट मात्र शेतकऱ्यांवर कायम आहे. शासनाकडून काही मदत मिळेल. याची वाट बघतात पण ते राजकारणी स्वत:च अंधारात आहेत. ते काय नेणार दुसऱ्यांना प्रकाशाच्या वाटेवर. शेतकऱ्यांना कर्जमाफी नव्हे तर कर्जमुक्ती हवी आहे. हे काय देणार कर्जमुक्ती. एखादं पॅकेज जरी जाहिर केल की, ते शेतकऱ्यांच्या दारात येईपर्यंत अनेक घरातून फिरून येते. प्रश्न विचारले असता शासनाची तिजोरी रिकामी. मग जर तिजोरी रिकामी, तर तुम्ही कसले करता हो विदेश दौरे. द्या ना शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लक्ष.

लोकपाल बिलाचा विरोध असो किंवा वेतन वाढ असो. असल्या प्रश्नांवर पटकन संमती मिळविणारे व लगेच एकत्र येणारे महत्वाच्या प्रश्नांवर मूग गिळून गप्प बसतात. शेवटी महत्वाची बाब म्हणजे शेतकरी आत्महत्येची जबाबदारी स्विकारायला अजूनही कुणीच पुढे यायला तयार नाही. म्हणजे शेतकरी हे आतंकवाद्यापेक्षाही दोन पावलं पुढ आहेत की काय ?

लाल बहादूर शास्त्री यांनी देशाला 'जय जवान, जय किसान' हा मंत्रे देऊन शेतकरी व जवान हे देशाचे किती महत्वाचे घटक आहेत. हे आपल्याला पटवून दिले; मात्र आजची परिस्थिती पाहता 'मर जवान, मर किसान' अशी परिस्थिती चोहीकडे दिसते. पानीपतचे युद्ध असो वा, महाभारतचे युद्ध असो या मध्ये सर्वसामान्य माणूसच भरडल्या गेल्याचे दिसून येते. तेव्हा हे कुठे तरी थांबवायला हवे. आज जीवनावश्यक प्रश्न बाजूला ठेवून निरर्थक प्रश्नांवर करोडो, अब्जो रूपये फुंकले जात आहेत. खरचं देश महासत्ता होणार का ?

शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळत नाही. त्याने उत्पादित केलेल्या मालाचे भाव बाजार समिती व्यापारी, अडते ठरवितात, त्याला नीट हिशोब येत नाही. शेतीचा जमा/खर्च करता येत नाही. फळबागा फेल जातात. शेतात पुरेशी वीज भेटत नाही. सिंचन व्यवस्था नाही. दुसरीकडे शेतकऱ्याला सर्वच नाव ठेवतात. कुणी चांगले

म्हणत नाही. सामाजिक प्रतिष्ठा राहिली नाही. लग्नासाठी मुली देत नाही. शेती बे-भरवश्याची झाली आहे. तरी तो मात्र अजूनही शेती करतो. हे शेतकऱ्याच चुकत आहे का ?

शेवटी शेतकरी दोष देतो तो नशीबाला कारण अजूनही शेती प्रामुख्याने निसर्गावर अवलंबून आहे. पण शेतकऱ्याचा आता पावसावर विश्वास राहीला नाही. पेरणीनंतर पाऊस हा सुट्टीवरच गेला. रोज सकाळी शेतकरी आकाशाकडे टक लावून बघतो पण सकाळ ही ऊन घेऊन उगवते. शेतातील पीक ही करपून गेली, जनावरांना पिण्यासाठी पाणी नाही. कृत्रिम पावसाची योजना देखील फोल ठरली, यावर सरकारने त्वरीत उपाययोजना करावी.

शेतकऱ्यांच्या हितासाठी 'आर्थिक सुरक्षितता' ही अत्यंत महत्वाची बाब आहे. जर शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या असतील, तर कोणत्याही राजकीय पक्षांनी यात राजकारण न आणता, सर्वांनी मिळून जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजे. थोडक्यात, काय 'राजकारण्याचा होतो खेळ, शेतकऱ्यांचा जातो जीव' अशीच परिस्थिती शेतकऱ्याच्या बाबतीत झाली आहे. आणि नेहमीच अशी परिस्थिती होत आली आहे. अगदी वर्षानुवर्ष .........!

आपला देश कृषी प्रधान देश म्हणून ओळखला जातो. शेतकऱ्याला जगाचा पोशिंदा म्हटल्या जातो ना मग शेतकरी हा कसा असला पाहिजे याच भान ही संबंधीतांना राहू नये. यापेक्षा दुसरे दुर्दैव ते कुठले ठरणार आहे.

## संघर्ष करण्यांची कविता

कु. अंकिशा मोरेश्वर ताजणे
बी.ए. भाग २

जे अशक्य वाटते ते स्वप्न मला पाहायचे
आहे
ज्या शत्रूचा कोणी पराभव करू शकत नाही
त्या शत्रूला मला हरवायचं आहे
कोणालाही सहन होत नाही
ते दु:ख मला सहन करायचं आहे
ज्या ठिकाणी धाडसी माणसं
जाण्याचं धाडस करत नाही
त्या ठिकाणी जाऊन मला धावायचं आहे
ज्या वेळेस माझे शरीर थकले आहे
त्या वेळेस मला ऐव्हरेस्ट दिसत आहे
त्या वेळेला मला एकेक पाऊल
त्या ऐव्हरेस्टच्या दिशेने टाकायचे आहे
तो स्टार मला गाठायचा आहे
मला सत्यासाठी झगडायचं आहे
संघर्ष करायचा आहे
कुठल्याही प्रश्न त्यासाठी विचारायचा नाही
कुठलाही थांबा घ्यायचा नाही
माझी नरकात जायची सुद्धा तयारी आहे
पण त्याला कारण स्वर्गीय असलं पाहिजे.

# करार शेती

✍ **कु. मोनाली पोहाने** बी.ए. भाग ३

भारतीय शेतीत जे अनेक बदल गेल्या ३०-४० वर्षांमध्ये घडून आलेत त्यात संस्थात्मक बदल महत्वपूर्ण मानले जातात. तांत्रिक बदलांमुळे शेती उत्पादनात वाढ झाली. तर संस्थात्मक बदलांमुळे शेती बि-बियाणे, खते इ. आदानांना पुरवठा होण्यास मदत होत आहे. सोबत शेतमालाच्या विपणनात सुधारणा होतांना दिसत आहे. अर्थात अशा प्रकारचे संस्थात्मक बदल शेती तसेच शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्यास पुर्णपणे यशस्वी झाल्यास असे म्हणता येणार नाही. उदा. शेतकऱ्यांसाठी अंमलात आलेली कापूस एकाधिकार योजना. या संस्थात्मक बदलामुळे कापसाच्या विक्रीची समस्या न सुटता उलट ती समस्या बिकट झाली आहेत.

शेतीतील संस्थात्मक बदलांच्या संदर्भात गेल्या काही वर्षापासून अंमलात येत असणारा बदल म्हणून ज्याची विशेष चर्चा सुरू आहे तो बदल म्हणजे 'करार शेती'(Contract Farming) लागवडी संबंधी निर्माण केलेली ही व्यवस्था आहे. भारत सरकारने इ. स. २००० मध्ये नॅशनल ॲग्रिकल्चरल पॉलिसीत भारतीय शेतीत करार शेती विकसीत करण्यासाठी खाजगी क्षेत्राला सहभागी करून घेण्याची आवश्यकता विशद केली आहे. करार शेती संबंधीतील काही वाद प्रश्न येथे आपण चर्चेस घेऊ.

करार शेती ही एक व्यवस्था आहे. खरेदीदार शेतकऱ्यांकडून विशिष्ट शेतमाल वा उत्पादन विकू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांशी करार करतो. या करारात शेतमालाचा दर्जा, मात्रा, किंमत इ. महत्वपूर्ण बाबींचा उल्लेख असतो. खरेदीदार हा शेतमालावर प्रक्रिया करून तो शेतमाल नवीन स्वरूपात बाजारार विकतो. किंवा आपल्या उत्पादनात तो संबंधीत शेतमालाचा वापर करतो. खरेदीदार हा कंपनी, व्यक्ती किंवा एखाद्या सहकारी संस्था देखील असू शकेल. तथापि बहुतेक ठिकाणी खरेदीदार कंपनी असल्याचे दिसत आहे.

शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या कृषि उद्योगांना मोठ्या प्रमाणावर विशिष्ट दर्जाचा शेतमाल हवा असतो. तसेच तो कोणत्या किंमतीवर मिळेल, याचीही शाश्वती असावी लागते. हा शेतमाल उत्पादीत करणाऱ्या शेतकऱ्यांना शेतमालाची वाजवी किंमत प्राप्त व्हावी अशी इच्छा असणे स्वाभाविक आहे. या शेतमालाच्या किंमतीत अनेकवेळा मोठ्या प्रमाणावर चढ उतार होत असतात. अशावेळी शेतमाल विपुल प्रमाणावर उत्पादीत होऊनही त्यांना कमी किंमतीमुळे अल्प उत्पन्न प्राप्त होते. कधी-कधी उत्पादनखर्चही भरून येण्या इतपत या किंमती नसतात. उदा. टमाटे, कांदा, मिरची इ. अशावेळी जर एखाद्या कंपनीने टमाटे किंवा कांदा उत्पादकांशी करार केला तर उत्पादनकांना पुरवू शकतील. आयुर्वेदीक उत्पादनासाठी

उत्पादकाला औषधी वनस्पतींची मोठ्या प्रमाणावर गरज असते. अशा कंपन्या औषधी वनस्पती निर्माण करणाऱ्यांशी करार करतील जेणे करून विशिष्ट किंमतीवर योग्य दर्जाचा कच्चा माल त्यांना उपलब्ध होऊ शकेल. ही बाब प्राण्यांच्या बाबतही होऊ शकेल जसे ब्रॉइलर, मासे, चिकन, खेकडे इ.

शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगसंस्था ज्यावेळी शेतकऱ्यांकडून आधी केलेल्या करारानुसार शेतमाल विकत घेतात त्यावेळी ते उत्पादन प्रक्रियेत ही सहभागी होऊ शकतात. ते शेतकऱ्यांना कर्ज मिळविण्यासाठी तसेच गोदामांची व्यवस्था करू शकतात. थोडक्यात, शेतमाल प्रक्रिया करणाऱ्या उद्योगसंस्था आपल्याला पुरेसा व योग्य दर्जाचा शेतमाल मिळावा म्हणून शेतकऱ्यांना मदत करू शकतात तसेच शेतकऱ्यांच्या शेतमालाची खरेदी योग्य किंमतीवर विकत घेण्याची हमी प्रदान करतात. या उद्योगसंस्था स्वत: मालकी प्रस्थापित न करता किंवा शेती न करता उत्पादनावर गुणात्मक नियंत्रण ठेवतात.

भारतात सुधारित व उत्पादन देणाऱ्या बियाणांचे उत्पादक हे करार शेती व्यवस्थे अंतर्गत कार्य करीत आहेत. गेल्या ४० वर्षापासन महाराष्ट्रातील साखर कारखाने किंवा गुजरातमधील दूध वितरक हे देखील सहकारी तत्वावर करार शेतीचाच अवलंब करीत आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय शेतकरी ब्रिटनमधील कारखान्यांसाठी कापूस उत्पादीत करीत होते. ते करार शेतीचे अत्यंत सोपे प्रारूप होते.

मात्र गेल्या १० वर्षापासून कॉर्पोरेट क्षेत्राने करार शेतीत रस घ्यायला सुरूवात केल्यामुळे या करार शेतीकडे अधिक काळजीने पाहण्याची गरज उद्‌भवत आहे. आता कार्पोरेट क्षेत्र केवळ शेतमाल विकत घेण्याच्या दृष्टीने करार शेतीकडे पाहत नाही तर आपण उत्पादीत केलेल्या खतांना बियाणांना, यंत्रसामुग्रीस बाजारपेठ कशी उपलब्ध होऊ शकेल या दृष्टीनेही करार शेतीचा विचार करत आहे. भारतात पुढील कंपन्या करार शेतीशी संबंधीत आहे.

भारतात करार शेतीसंबंधीत कंपन्या :-

| | |
|---|---|
| १) ग्लोबल ग्रीन | छोटी कणसे (बेबी कॉर्न) |
| २) पायोनियर | ब्रॉयलर |
| ३) पेटली कं. | मिरची, बासमती, तांदुळ |
| ४) सामी लॅब | वैद्यकीय औषधी वनस्पती |
| ५) डाबर | औषधी वनस्पती |

अशाप्रकारे भारतात शंभरच्या वर कंपन्या करार शेतीशी संबंधीत आहे. तामिळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटक, पंजाब, हरियाणा या प्रांतामध्ये या कंपन्यांचा प्रभाव आहे.

# राष्ट्रसंताचे शेतीविषयक विचार

✍ प्राचार्य विनोद मुडे

भारत हा शेतीप्रधान देश आहे. इंग्रजांच्या काळापासून शेतकऱ्याच्या जीवनाकडे, प्रगतीकडे सतत दुर्लक्ष होत आहे. शासनाकडून वेळोवेळी शेतकऱ्यांची पिळवणूक होत होती आणि आजही होत आहे. अनेक काळापासून शेतकऱ्याच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर होता व आज ही आहे. कर्जात जन्मणारा व कर्जात मरणारा असा भारतीय शेतकरी आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडून त्याला सन्मानाचे जीवन जगता येईल असे वाटत असतांना त्यांच्या जीवनात पुन्हा निराशाच पदरी पडली. भारताने लोकशाहीचा स्वीकार केला पण शेतकऱ्यांच्या बाबतीत कोणतेही परिवर्तन घडवून आणले नाही.

राष्ट्रसंतांनी याच शेतकऱ्यांची व्यथा 'ग्रामगितेत' सुद्धा वर्णन केली आहे ते म्हणतात.
''गुलामीमें था वतन हमारा। तभी से रोता किसान सारा। अभि तो हालत बडी बुरी है। कभी इधर भी चला करोंगे। न बाल बच्चो को सुख है उनको बिमारिया रहत घेरी उनकी। न धोती साडी बदन पे अच्छी। कभी तो उनकी सल्ला करोगे। टुटा छप्पर-दिवार खिडकी । सदा की ठंडी धुप घर मे नही ओढने को, नही बिछाने जरा, कभी तो मिला करोंगे।''

शेतकऱ्यांच्या दारिद्री जीवनात परिवर्तन घडून त्याला उज्वल भविष्य प्राप्त व्हावे यासाठी राष्ट्रसंतांनी 'ग्रामगीता' लिहून ग्रामनाथालाच अर्पण केलेली आहे. शेतकऱ्यांच्या दारिद्र्याच खरं कारण त्याच्या अज्ञानातच आहे. त्याचे अज्ञान दूर झाले तर त्यांची उन्नती घडून येईल हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ओळखले होते. श्रमप्रतिष्ठेचे महत्व शेतकऱ्याला कळले व उद्योगशिलता त्याच्यात निर्माण झाली तर त्याला त्याचा विकासाचा मार्ग गवसेल हिच त्यांच्या कार्याची सिद्धता होती.

आज आपला देश एकविसाव्या शतकातील अत्याधुनिक सुख-सुविधांनी युक्त होत चालला आहे. पण ग्रामिण जीवन रोजच्या रोज कठिण आणि बिकट होत चालले आहे. कारण आधुनिक, तांत्रिक सुख-सुविधांनी ग्रामीण माणसाला उध्वस्त केले आहे. आज खेडी भकास होत चालली आहेत. खेड्यांमधून लोकांचे शहराकडे पलायन सुरू झाले आहे. म्हणूनच राष्ट्रसंत म्हणतात-

त्यासि सर्वचि असती जबाबदार। शक्ती, संपत्ति, विचार, प्रचार।
हे एकहि नाही ताळ्यावर। म्हणोनि ग्राम ओसाडले ।।
श्रीमंता आपुले न वाटे काम । गरीब उत्पादनाचे नाही प्रेम ।
शिक्षित हीन वाटतो परिश्रम । यानेच आली शिथिलता ।।

ज्या शेतीला एकेकाळात 'उत्तम शेती' मध्यम रोजगार आणि कनिष्ठ नौकरी' अशा प्रकारचे सर्व श्रेष्ठ स्थान आणि शेतकऱ्याला मानपान होता. तो त्या शेतीला आणि शेतकऱ्याला आज राहिलेला नाही. शेतीतील उत्पन्नाला योग्य भाव मिळत नाही. शेतकऱ्याजवळ शेतमाल आले की त्याचे भाव

पाडण्यात व्यापारी आणि मायबाप सरकार अग्रेसर असते. शेतकऱ्यांजवळचे माल संपले की शेतमालाची भाववाढ सुरू होते. व्यापारी गब्बर होत चालला आणि शेतकरी ज्याला 'बळीराज्याची' संकल्पना देण्यात आली आहे. त्याची मात्र दैना झाली आहे. गरीबीत दारिद्रयात तो खितपत पडला आहे.

आज कष्टकरी समाज आळशी होत चालला आहे. श्रमाचे मोल संपत चालले आहे. ऐतखाऊ वृत्ती बळावत चालली आहे. त्यात भरीस भर म्हणून चांगल्या हेतूने आणलेला 'केंद्र सरकारचा 'अन्न सुरक्षा कायदा' पण समाजावर वाईट परिणाम करणारा, श्रमिक समाजाला ऐतखाऊ आणि आळशी बनवणारा असा कायदा झाला आहे. यामुळे आज आळशी लोकांचा भरणा समाजात वाढत चालला आहे. शेती व्यवसाय अधोगतीला जात आहे. या संदर्भात राष्ट्रसंत म्हणतात :-

''देशात कामांचा उभा डोंगर । दारिद्रय - दु:खांचा वाहतो पूर ।
अर्धनग्न, अर्धपोटी लोक अपार । त्यांचे दु:ख का न दिसे ।।
परि ज्यांना होणे आहे साहेब । लोकांवरी कसावया रूबाब ।
न कष्टता ईच्छिती आराम खूब । ते चि राहती बेकार ।।''

बेरोजगार कोण ? याचे उत्तर राष्ट्रसंतानी वरील ओव्यामध्ये दिले आहे. ऐतखाऊ, श्रम करण्याची लाज बाळगणारे लोक आज बेरोजगार आहेत. असे राष्ट्रसंत म्हणतात एकीकडे बेरोजगारीची फौज तयार आहे तर दुसरीकडे कामगार, श्रमिक मिळत नाही. ज्यामुळे अनेक उद्योग, शेती व्यवसाय बंद पडत चालले आहे. आज शेतीत काम करायला कोणीही तयार नाही. दुसरी बाब म्हणजे श्रमाला योग्य मोबदला मिळत नाही हे सर्व ऐतखाऊ कमी श्रमात अधिक मोबदला मिळविण्याच्या नादात असलेल्यांना राष्ट्रसंत म्हणतात -

''जेव्हा पोटासि भूक लागे । तेव्हाचि घरोघरी काम मागे ।
नाहीतरी आळस घेवोनि संगे । खुशाल पडे झोपडी माजी ।।
मजुर इकडे कार्य निष्ठा न जाणे । श्रीमंत तिकडे आळशी बने ।
म्हणोनि झाले कंटाळवाणे । जीवन आता देशाचे ।।
उत्पादनाची गती खुंटली । उपभोगाची भावना वाढली ।
काय करील भूमाता भली । मशागत नसता जमिनीची ।।''

राष्ट्रसंतांना सुराज्य यावे असे वाटत असले तरी शेती व्यवसायाला सुगीचे दिवस येणे आवश्यक आहे. त्यासाठी सरकारला आपली योजना बदलावी लागेल. शेतीभिमुख योजना आखावी लागेल. शेती मालाला योग्य भाव मिळवून द्यावा लागेल. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. शेतीला उद्योगाचा दर्जा द्यावा लागेल. श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करून द्यावी लागेल. शेतकरी, शेत-मजुर यांना कर्जमुक्त करावे लागेल. त्यांच्या शेतांना फुलवावे लागेल. या धरणीला सुजलाम् - सुफलाम् करावे लागेल. तीचे सौंदर्य तीला पुन्हा बहाल करावे लागेल ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात.

✡☪

# शेतकरी आत्महत्या

कु. बौध्दश्री गौ. गावंडे बी.ए. भाग-३

भारत हा कृषी प्रधान देश असून सध्या आपल्या कृषी प्रधान देशात परिस्थितीला हतबल होऊन, आयुष्य संपवायचे म्हणून शेतकरी आत्महत्या ही आपल्या देशाला लागलेली सर्वात मोठी किड आहे. दुष्काळ, नापिकी, कर्जबाजाराला कंटाळून आत्महत्या करण्याचे प्रकार सातत्याने घडत आहेत. प्रश्न हा पडतोय की, दुष्काळ,नापिकी, कर्जबाजारीपणा आत्महत्या करणे हाच यावरील ऐकमेव पर्याय आहे काय ? खरोखरच आत्महत्या करून आपल्या कुटुंबियांना समाधान प्राप्त होते काय ? किंवा याउलट आपल्या अकस्मित जाण्यामुळे आपल्या कुटुंबाची वाताहत थांबवण्याऐवजी आपल्यापायी संपुर्ण कुटुंब उघड्यावर पडते. त्यासाठी आत्महत्येचा मार्ग स्विकारण्यापूर्वी प्रत्येक शेतकरी, शेतकरी युवा बांधवांनी खालील दिलेल्या प्रश्नांचा सारासार विचार गांभिर्याने करायला पाहीजे. मुख्यत्वेकरून आपण कुटुंबातील मुख्य आधारवड आहात ? आपल्यावर आपल्या कुटुंबातील पत्नी, मुलगा, मुलगी तसेच म्हातारे आईवडिल इत्यादी अनेक जिव अवलंबून असतात. त्याकरीता मुख्य कर्ताधर्ता, आधारवड या नात्याने आपली आपल्या कुटुंबियाप्रती जबाबदारी काय ? आपण जर कर्जबाजारीपणा किंवा अन्य बाबीस कंटाळून आत्महत्या केली, तर आपल्या पश्चात आपल्या पत्नी मुला बाळावर काय संकट कोसळेल ? आपल्या आकस्मिक मृत्युनंतर वृद्धपकाळात आपल्या वृद्ध मात्यापित्यास कोण आधार देणार ? तुमच्या बरोबर शेतात राबणारी आणि सांजवेळी तुमची चातक पक्षाप्रमाणे प्रतिक्षा करणाऱ्या आपल्या अर्धांगिनीचे आपल्या मृत्युनंतर काय ? आजचा काळ पाहता पत्नीचा सर्वात मोठा आधार हा तिचा पतीच असतो आणि आपण थोड्या बिकट परिस्थितीला घाबरून आत्महत्या करून मोकळे होतो. आपण हयात असे पर्यंत आपल्या पत्नीकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन आदरवत असतो; परंतु आपणा पश्चात त्या आधुनिक पावशी, अत्याचारी दुनियेचा सामना आपली विधवा माऊली करू शकणार काय ? कारण शेवटी पती कसा ही असला तरी शेवटी फार मोठा आधार असतो. आपल्या जीवनाशी निगडीत अत्यंत महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे आपण आत्महत्येचा मार्ग स्विकारण्यापूर्वी, कुटुंबातील कर्ता पुरुष म्हणून कधी जाणून घेणार आहोत, हाच खरा यक्ष प्रश्न आहे. या सर्व प्रश्नांचा गांभिर्यपूर्वक विचार संपूर्ण शेतकरी बांधवांनी केला, तरच आपल्या देशातील शेतकरी आत्महत्या कमी होतील. ऐन उमेदिच्या काळात संपूर्ण कुटुंबाची उमेद, स्वत: वर असतांना नियतीशी हतबल होऊन आत्महत्या करणे हाच एकमेव पर्याय उरत नाही कारण धर्म कोणताही असो त्यामध्ये कोणत्याही कारणास्तव आत्महत्या करणे यासारखे जगात दुसरे पाप नाही. जिवनात संकटे ही येतच असतात आणि तो सृष्टीचा नियम आहे. त्यासाठी आपण अशा दुष्काळी परिस्थितीशी समान करून फुल शेती, पालेभाज्या, दुग्ध व्यवसाय किंवा अन्य जोडधंदा करून आपल्या परिवाराची बाग फुलविण्याचा आदर्श डोळ्यासमोर सातत्याने ठेवा. मुस्लीम शेतकरी बांधव परिस्थितीशी हतबल होऊन आत्महत्या करतात का ? त्यांचा आदर्श वाखणण्याजोगा आहे. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर

असु द्या कारण शेवटी जीवन हे अनमोल असुन केवळ एकदाच मिळते. कठीणातल्या कठीण परिस्थितीत मार्ग काढणे शिका. आत्महत्या करून आपले आणि आपल्या कुटुंबियाचे आयुष्य उघड्यावर पडु देऊ नका ? आतापर्यंत शेतकरी आत्महत्या खुप झाल्या परंतु आता मात्र आत्महत्यांचा तांडव कुठे तरी थांबायला पाहीजे ?

जिल्ह्यातील ऑगस्ट महिन्यात २१ शेतकऱ्यांनी मरण कवटाळले, ही बाब शेतातील परिस्थिती गंभीर असल्याचे पुन्हा दाखवून देते. यावर्षी सप्टेंबर संपण्यापूर्वीच १०१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद जिल्हाधिकारी कार्यालयात आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात याबाबतची आकडेवारी काढणे सुरू होते. मागील वर्षी १३४ शेतकऱ्यांनी आत्महत्याकेली होती. कोणी विष घेऊन तर कोणी गळफास लावून तर कुणी विहीरीमध्ये उडी घेऊन आत्महत्या करीत असतात. शेतातील नापिकीचे सावट, कर्ज फेडीबाबतची मावळलेली आशा, कुटुंबाच्या दैनंदिन खर्चाची नसलेली तरतुद तसेच शेतमालाच्या हमी भावाबाबत आश्वासनाप्रमाणे न मिळालेला दिलासा, अशा विविध मार्गाने शिवारावर आलेल्या संकटापुढे हताश होत शेतकरी आत्महत्या करीत असतात.

आत्महत्याच्या संदर्भात जागतिक पातळीवर उपलब्ध असलेल्या आकडेवारीनुसार भारत हा उच्च आत्महत्या दर असणारा प्रमुख देश मानला जातो. त्यापैकी विदर्भ, उर्वरित महाराष्ट्र, आंध्रप्रदेश या विशाल प्रदेशात आत्महत्या या सामाजीक समस्येची व्याप्ती प्रचंड प्रमाणात आढळते. विदर्भाच्या संदर्भात तर हे आत्महत्येचे सामाजीक तथ्य अतिशय भयावह आणि कडवर आहे. काही महिन्यापूर्वी तर विदर्भात दर ८ तासानंतर सरासरी १ आत्महत्या होत होती. आणि ती ही कर्जबाजारी आण भुके कंगाल शेतकऱ्याची असे. यावरून विदर्भात शेतकरी आत्महत्या या सामाजीक समस्येची तीव्रता किती भयानक आहे हे स्पष्ट होते. नॅशनल क्राईम बोर्डाच्या अधिकृत आकडेवारीनुसार १९९७ ते २००७ या दहा वर्षाच्या काळात १,८२,९३६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आणि त्यापैकी सर्वात जास्त लोकसंख्या विदर्भातील शेतकऱ्यांची आहे.

ज्यावेळी व्यक्ती आपल्या जीवनाचा स्वत:च अंत करण्यास तयार होते आणि एका विशिष्ट पद्धतीने आपली जीवनयात्रा संपविते तेव्हा त्या घटनेला समाजशास्त्रज्ञ, समाज आणि कायदा 'आत्महत्या' संबोधीत करतो. वास्तविक आध्यात्मिकदृष्ट्या आणि सर्वच देशातील संवैधानिक तरतुदीनुसार 'आत्महत्या' हे एक पलायनवादी आणि अवैध कृत्य मानले जाते. कोणत्याही आधुनिक आणि सुसंस्कृत समाजात आत्महत्येचे कृत्य समर्थनीय मानले जात नाही. या संदर्भात मराठीतील विख्यात गायक अरूण दाते यांच्या एका गीतातील पुढील काव्य पंक्ती जगण्याचा आणि जीवनाच्या संदर्भात फार सुंदर आशावाद व्यक्त करतात

''इथल्या पिंपळ पानावरती,
अवघे विश्व तरावे
'अनंत मरणे' झेलुन घ्यावी
इथल्या जगण्यासाठी
या जन्मावर, या जगण्यावर
शतदा प्रेम करावे''.

पण आत्महत्या करणाऱ्या इतक्या वैफल्यग्रस्त आणि निराश झालेल्या असतात की विवेक, धीर आणि संयम हे शब्द त्यांच्या जीवनरूपी शब्दकोषातून केव्हाच 'बाद' झालेले असतात. आणि व्यक्तीने सुचेल आणि जमेल त्या अघोर पद्धतीने आपल्या जिवनाचा अंत करतात.....

# फक्त तुझ्यासाठी

**कु. प्रिया संजयराव इखार**
बी.ए. भाग-३

काय झाले नी काय नाही
कळेनास झाले आहे ग.
तु काय आहे हे मला कळलेच नाही
कुठल्या शब्दात तुझे वर्णन करू
लिहीतांना शब्द सुद्धा लागत आहे
खर तर मला तुझे वेडच लागले आहे.
दररोज रात्री तु माझ्या स्वप्नात
येऊन हळुवार माझ्या कानात तुझा गोड

असा आवाज देऊन डोक्यावरून प्रेमाने हात कुळुवाळून मला गाढ झोपेमध्ये एकदाच सोडून जाते. त्या वेळी मला तो तुझा दुखावलेला चेहरा दिसतो. आणि माझे डोळे भरून येते. आणि मग मला जाग येते आणि मी पुन्हा रात्रीची वाट पाहते की तु पुन्हा स्वप्नात येशील याच आशेने मी रोज झोपतोय ग तुझ्या शिवाय माझ्या या हृदयात कुणीच येत नाही ग मनात फक्त एकच भिती असतो

तु गुलाबाच्या फुलासारखी माझ्या समोर असते.
हे अगदी खर आहे.
मी तला रोज कुळुवाळते कांट्याची भिती
नाही ग मला भिती फक्त
ऐवढीच वाटतेय की पण तुला मधेच
कुणी तोडून नेईल हिच भिती असते

तुला माहित तर नसेल च माझ्या मनातील भाव मी एका कागदाच्या हृदयावर कोरत आहे. कारण हे सर्व मी कुणालाच सांगू शकत नाही आणि माझ्या मनावर खुप तान येते अ ग म्हणून मी या निर्जिव कागदा बरोबर बोलण्याचा प्रयत्न करतो.

✡ ☪

# वनसंरक्षण

**कु. काजल गणपतराव महाजन**
बी.ए. भाग-३

''वृक्ष वल्ली आम्हा सोयरे वनचरे''

या अभंगातून बरेच काही शिकायला मिळते. हा अभंग संत तुकाराम लिहीत असून या गीतेचा गोडवा देशाच्या प्रत्येक व्यक्तीचा तोंडातून ऐकायला मिळते म्हणजे वनसंरक्षण काय आहे हे समजून मिळते म्हणजे वनसंरक्षण काय आहे हे समजून येते तसेच वनसंरक्षण म्हणजेच हे समजणे तेवढेच सोपी जाते. समाजात राहणारे प्रत्येक व्यक्ती हे निसर्गावर अवलंबून आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजेच वृक्ष लागवडीपासून किती प्रकारचे फायदे होते हे पाहून म्हणजेच आपल्याला लक्षात येईल महत्वाचा मुद्दा म्हणजे वृक्षापासून आपल्याला शुद्ध ऑक्सिजन मिळते. वृक्षाचे महत्वाचे काम ते आहे की, जे मनुष्याच्या जिवनात घातक असलेले हायड्रोजन ते स्वत: घेऊन आपल्याला ऑक्सिजन देण्याचे काम करते.

पूर्वीच्या काळामध्ये आपल्याला देशाचा विचार केला गेला असता जगाच्या तुलनेत जंगल विभाग ३२% होता. पण आता हे स्थिती राहलेली नाही. कारण जिकडे तिकडे वन नष्ट होत आहे. खूप मोठं प्रमाणात वृक्ष नष्ट होत आहे. कारण आजचा विचार केला तर सर्व कामे लाकडामुळे करून घेण्याचा प्रयत्नात आपल्याला देशाच्या प्रत्येक माणूस करून घेत आहे. देशामध्ये जंगल कमी प्रमाण होत आहे. त्यामुळे खुप मोठ्या प्रमाणात पाण्याची टंचाई भासत आहे. जंगलामुळे जंगल नष्ट होत असल्यामुळे पाण्याचे प्रमाण कमी होत आहे. अशा अनेक गोष्टी आहे कारण ज्यामुळे आजच्या परिस्थितीत साधारण मनुष्याचे जीवन धोक्यात आहे. आजच्या परिस्थिती आपल्या आपल्या देशाच्या सरकारने सुद्धा या गोष्टींची जाणीव करून घेतली आहे आणि बऱ्याच सवलतीमधून 'झाडे लावा, झाडे जगवा' ही मोहीम सुरू केली आहे. यासाठी आपल्या देशाच्या सरकारी खात्याने किती तरी पैसा या झाडाच्या संरक्षणासाठी खर्च केला आहे. कारण वृक्षाचे महत्व हे मनुष्याचा जीवनात किती महत्वाचे आहे ही जाणीव करून देण्यासाठी केली आहे.

थोडक्यात सांगायचे म्हणजेच वृक्षामुळे पाणी साठा कमी होऊ शकत नाही तसेच वृक्षामुळे समाजातील प्रत्येक मनुष्याला शुद्ध ऑक्सिजन मिळते त्यामुळे त्याला आजार होऊ शकत नाही आणखी एक महत्वाचे म्हणजेच त्याच्या पासून अनेक फायदे करून घेता येतो.

आपल्या देशामध्ये बऱ्याच ठिक ठिकाणी डोंगराळ भाग आहे की आपण त्यामध्ये कोणतेही पिक किंवा कोणतेही धान्य उगवू शकत नाही. अशा ठिकाणी वृक्षाची लागवड करून आपण थोड्या प्रमाणात वन विभाग तयार करून शकते की त्याचे रक्षण वनविभागीय कर्मचारी करू शकते. प्रत्येक झाड्यांचे आपल्या जिवनात महत्व आहे ते समजून घेणे आपले काम आहे. आपल्या देशाच्या परिस्थितीचा विचार केला तर ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे झाले आहे. त्याकरीता मोठी

यंत्रणा उभारण्यात आली आहे हे उपयोग चालवण्याचे काम या मशीन करत असते. पण त्यामुळे समाजात जगण्यास माणसाला त्यामुळे किती त्रास सहन करून घ्यावे लागले. ह्या विचार उपयोग करणार व्यक्ती करत नाही. या मशिनमुळे वातावरण दुषीत होते ते मशिन कोणत्या ना कोणत्या उपकरणावर ने उपकरणे दररोजचा वातावरण दुषीत होते त्याचा परिणाम आपल्या सारख्या सर्व साधारण व्यक्तीवर होतो या सारख्या मोठमोठ्या उद्योग कारखान्याचा आसपास मोठी जंगले किंवा खूप प्रमाणात मोठी झाडे लावली तरी तर त्यावरून काही प्रमाणात वातावरण दुषीत होणार नाही इत्यादी प्रकारच्या मोठ्या प्रमाणात वृक्षाचा वातावरण संरक्षणासाठी होत आहे.

झाडे लावा
झाडे जगवा
आणि वृक्षाचे संरक्षण करा.

*****

# जगाचा पोशिंदा

निसर्गा सोबत झुंज देण्याची
सवय झाली आहे आम्हाला
ढोरासारखे कष्ट करूनही
काहीच नाही आमच्या वाट्याला .......!

जगाचे पोशिंदे आहोत आम्ही
त्याचा गर्व वाटतो आम्हाला
साऱ्या जगाला पोसतो आम्ही
यांचा आनंद वाटतो आम्हाला ........!!

आमच्या कष्टावर जगून
का छळता तुम्ही आम्हाला
शेतीची दशा काय आहे
विचार जाऊन शेतकऱ्याला .......!!!

पांढरे सोने पिकवितो आम्ही
पिवळे सोने तुमच्या गळ्याला
आमच्यासाठी एकच आहे
नायलन दोर आमच्या नशिबाला........!!!!

✍ **लहू मोहिते** बी.ए. भाग १

# कृषी प्रधान देश : भारत

**मयुर पुंडलीकरावजी घोडमारे** बी.ए. भाग-३

भारत देश हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो मग खरंच भारतातील शेतकरी सुखी आहे याकडे कुणाचे लक्ष असते. शेतकरी हा या देशाचा कणा समजला जातो. तोच हा आर्थिक संकटात सापडला आहे. राजकारणी लोक निवडणूकीच्या काळात देशाचा कणा समजणाऱ्या शेतकऱ्याच्या खाद्यांवर आपली पोळी शेकून घेतो. मग पाच वर्षात त्याच्या समस्यांकडे दुर्लक्ष होत असते अशा संकटात सापडलेला शेतकरी खरंच त्याला दोन घास सुखाचे मिळते का ?

देशाचा कणा समजणारा शेतकरी आज सावकाराच्या कर्जाखाली दबत चालला आहे. त्याला श्वास घ्यायला जागा नाही. इकडे निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी हतबल झाला आहे. त्याला निसर्गासोबत स्पर्धा करण्याची शक्ती उरली नाही. त्यामुळे तोच आज आपल्या मुलांना चांगले शिक्षण देवू शकत नाही. स्वत:ला राहण्याकरीता तो एक आपले घर उभे करू शकत नाही. दरवर्षी पडणाऱ्या कमी पावसामुळे त्याला नापीकीला सामोरे जावे लागत आहे. नापीकीमुळे देशाचा कणा समजणाऱ्या शेतकऱ्याच्या पाठीचा कणाच मोडत चालला आहे. आज गरज आहे शेतकऱ्याला उभे करायची त्याला प्रोत्साहन देण्याची. त्या शेतकऱ्याला सक्षम करण्याची. जर आजचा शेतकरी सक्षम झाला तर तो आपले कुटुंब चांगल्या रितीने चालवु शकतो. तो सक्षम झाला तर देश सक्षम होईल. आज गरज आहे शेतकऱ्याच्या मुळ प्रश्नांची तळापर्यंत जावून त्या प्रश्नांची दखल घेवून तो प्रश्न सोडवण्याची. शेतकऱ्याच्या प्रत्येक समस्या सोडवण्याची तरच शेतकरी आजच्या युगात तग धरू शकेल. अन्यथा पाठीचा कणा मोडायला वेळ लागणार नाही. आज गरज आहे ती म्हणजे शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना तयार करून त्या अंमलात आणल्या पाहिजे. सरकारनी एक पाऊल पुढे नेवून शेतकऱ्याला हिताच्या योजना तयार करण्याची गरज आहे. आपणास शेतकऱ्यासाठी दिर्घ काळ टिकणारी परिणामकारक उपाय योजना करावी लागेन. त्या शेतकऱ्याची शेती हितकारक कशी होईल या करीता आपल्याला प्रयत्न करावे लागेन. शेतकऱ्याला स्वत:च्या पायावर उभे राहण्याकरीता आपल्याला सक्षम उपाय योजना कराव्या लागतील. शेतकऱ्यांच्या मालाला किंमत देवून त्याच्या जवळ ४ पैसे जमा करावे लागतील. त्याला पॅकेज न देता त्यांच्या मालाला किंमत द्यावी लागेल. शेतकऱ्याच्या शेतीकरीता सिंचनाची व्यवस्था करावी लागेल. त्याकरीता सरकारला नद्या जोडणी तसेच कालवे, धरणे, बंधारे, शेत तळे इत्यादी प्रकल्प पुर्ण देशभर राबवावा लागेल. तरच शेतीला मिळणारा पाण्याचा प्रश्न कायमचाच सुटेल.

आज जर बारमाही विज उपलब्ध करून दिली तर एका पाण्याचे पिक गेले असे म्हणायला जागा उरणार नाही. त्याकरीता त्याला विज उपलब्ध करून द्यावी लागेल. शेतीला भरपूर कर्ज देण्याकरीता बँकांना प्रोत्साहन द्यावे लागेल. जर शेतकऱ्यांना वेळेवर कृषी कर्ज दिले तर त्याला सावकाराच्या दारी जावे लागणार नाही. शेतकऱ्यांना शेतीमध्ये नव-नविन उपक्रम राबवण्यास मदत करावी लागेल. त्यामुळे त्यांची आर्थिक बाजू भक्कम होईल. कमी पावसामध्ये होणारे नव-नविन बि-बियाणे उपलब्ध करून द्यावे लागणार आहे मग तो आपुलकीने शेती करायला लागेन. आणि एकदा शेतकरी उभा राहीला तर तो कधीच पडणार नाही. शेतकरी अधिकाधिक धान्य उत्पादन करेन. त्यामुळे देशामधील अन्न धाण्याचा प्रश्न कायमचा सुटेल. आपल्याला दुसऱ्या देशामधून अन्न धान्य निर्यात करण्याची गरज भासणार नाही.

तेव्हा कुठे भारत हा कृषी प्रधान देश आहे असे गर्वाने आपल्याला सांगता येईल.

***

# शेतकरी

कु. राखी रमेश कुळसंगे
बी.ए. भाग

आमचा बळीराजा शेतकरी
रान जीवाचे करी
राबवूनीया पिक घेई
पोट कुटुंबाचे भरी

कष्ट करूनी वावरी
मुले आपली जगवी
शेतात राबूनी पिक घेई

दुष्काळ जेव्हा पडी
पिक नष्ट होई
कर्ज सावकारांचे घेई
जेव्हा देन न होई
आत्महत्या करूनी
जीव आपला घेई

आमचा बळीराजा शेतकरी
आमचा बळीराजा शेतकरी.........

# कॉलेज लाईफ

कु. रूपम सुपारे
बी.ए. भाग ३

जेव्हा मुले चढतात कॉलेजची पायरी
तेव्हा असते अभ्यासाची सर्व तयारी

जेव्हा सुरू होते कॉलेजचा तास
तेव्हा वर्गातील मुली दिसतात खास

मुलांना लागतो मुलीचा ध्यास
आणि होतात कॉपी करून पास

जेव्हा होतो कॉलेज नंतर बेकार
तेव्हा मिळतो नौकरीला नकार

त्यालाच संबोधले आहे कॉलेज
जेथे मिळते नको ते नॉलेज

प्रत्येकाला वाटते करावे लव्ह मॅरेज
शेवटी मग टाकतात मोटारीचा गॅरेज

*एक उगवणारे झाड राष्ट्रांच्या प्रगतीचे जिवंत प्रतिक समजले जाते.*
*ते झाड तोडणे अतिशय सोपे आहे. परंतु त्या झाडाची लागवड*
*आणि संवर्धन करण्यासाठी एक पिढी खर्ची पडते.*

*✼ पंडित जवाहरलाल नेहरू*

# वडिलांबद्दल माझे विचार

**मयुर भोयर** बी.ए. भाग १

आई घराचं मांगल्य असते. तर वडिल अस्तीत्व असतात. पण घराच्या या अस्तित्वाला खरच आपण कधी समजून घेतले आहे काय ?

वडिलांना महत्व असूनही त्याच्या विषयी जास्त बोलल जात नाही. कोणत्याही व्याख्याता आईविषयीच जास्त बोलतो. संत महात्मे यांनी सुद्धा आईचेच महत्व सांगीतले आहे. देवाधिकांनी सुद्धा आईचेच तोंडभरून कौतुक केले आहे. वडिलांबद्दल फारसे कुठे बोलल्या जात नाही. काही लोकांनी वडिलांचे वर्णन केलय पण तेही तापट, व्यसनी, मारझोड करणारे. समाजात असे एक दोन टक्के वडील असतीलही पण चांगल्या वडिलांबद्दल काय ?

'आईकडे अश्रुचे पाट असतात तर वडिलांकडे संयमाचे घाट असतात' आई रडून मोकळी होते पण सांत्वन वडिलांनाच करावं लागतं. रोजच्या जेवण्याची सोय करणारी आई आपल्या लक्षात राहते पण आयुष्याच्या शिदोरीची सोय करणारे वडिल आपण सहज विसरून जातो.

जिजाबाईंनी शिवाजी घडविला असे अवश्य म्हणावं पण त्यास वेळेस शहाची राजांची ओढताणसुद्धा लक्षात घ्यावी. देवकीच, यशोदेचे कौतुक अवश्य करावं पण पुरातून पोराला डोक्यावर घेवून जाणारा वासुदेव लक्षात ठेवाव. वडिलांच्या टाचा झिजलेल्या चंपलाकडे पाहीलं की त्याचे प्रेम कळते. त्याचं फाटका शर्ट पाहील की कहते की आमाच्या नशिबाची भोक त्याच्या शर्टाला पडली आहेत. त्यांचा दाढ वाढलेला चेहरा त्याची काटकसर दाखवितो.

वडिलांना मुलीचे लग्न, मुलाच शिक्षण करायचे असते. घरात उत्पन्नाच साधन नसते. ऐपत नसते. तरीही मुलाचा मेडिकलला, इंजिनियरींगला प्रवेश मिळवून दिला जातो. ओढताण सहन करून त्या मुलाला दर महिन्याला पैसे पाठविले जातात. परंतु सर्वच नसली तरी काही मुल अशी ही असतात की जे तारखेला पैसा येतात मित्रांना पार्ट्या देतात. या वडिलांन पैसे पाठविले त्याची टिंगल करतात. एकमेकांना वडिलांची लाज वाटायला लागते. पण हे ही गोष्टी विसरतात की आज त्यांनी जे यशाचे शिखर गाठले आहे ते त्यांच्या वडिलांमुळेच.

कोणत्याही परिक्षेचा निकाल लागल्यावर आई जवळची वाटते. कारण ती जवळ घेते, कौतुक करते, कवटाळते परंतु गुपचुप जावून पेढ्यांचा डबा आणणारे वडिल आपल्या लक्षात येत नाहीत. आपल्याला कधी चटका लागला, ठेच लागली, फटका बसला तर 'आई गं' शब्द बाहेर पडतो पण रस्ता क्रॉस करतांना एखादा ट्रक जवळ येऊन ब्रेक अचानक लागतो. तेव्हा बापरे हाच शब्द बाहेर पडतो. कारण छोट्या संकटासाठी आई चालेल. पण मोठमोठी वादळ पेलतांना बापच आठवतो. काय पटतय नां! ?

कोणतेही वडिल श्रीमंत मुलीच्या घरी जास्त जात नसतात पण गरीब मुलीच्या घरी पंधरा मिनीट का होईना चक्कर मारतात. वडिलांचे महत्व कुणाला कळते तर खऱ्या अर्थाने वडिलांना समजून घेते ती म्हणजे त्या घरातील मुलगी. सासरी गेलेल्या अथवा घरापासून दूर असलेल्या मुलीला वडिलांशी फोनवर बोलतांना त्यांचा बदललेला आवाज एका क्षणात कळतो. मग ती अनेक प्रश्न विचारले. कोणतेही मुलगी स्वत:च्या इच्छा बाजुला ठेवून वडिल म्हणतील तेव्हा लग्न करते. कारण ती वडिलांना त्यांच्या कष्टांना जाणते. इतरांनी सुद्धा आपल्याला असच जाणावं हिच प्रत्येक वडिलांची किमान अपेक्षा असते.

# आई

कु. संगीता दांडेकर
बी.ए. २

किती वेदना झाल्या तीला
तुला जन्म देतांना
जाणीव त्याची ठेव पोरा
तुझे जीवन जगतांना

लहानया तु मोठा झालास
आईच्या कुशीत असतांना
प्रयत्न केलास तु मोठा होण्याचा
बुद्धीचा विकास करतांना

साहेब तू झाला होतास
कष्ट ती उपसत असतांना
तु कितीही मोठा झालास तरी
तिला विसरू नको जातांना

तिनेच हे जग दाविले
जाणीव तुला नसतांना
सांभाळून जा पोरा
या शब्दांचे मुळ शोधतांना
नाही तर वेदना होतात
हाक मारशील
आई, तुझी नसतांना ............!

# बळीराजा

कु. निशा कडवे
बी.ए. २

शेतकरी माय-बाप
मातीसंग नित्य खेळी
दिस-रात बा राबूनी
तरी रिकामीच झोळी ।।१।।

काबाड कष्ट करूनिया
बा पिकवितो मोती
तरी झोपा लागे आम्हां
रोज उपाशीच पोटी ।।२।।

दर सुर्योदय होता
बा शेताकडे वळे
गार हवेतही घाम
पावसावानी गळे ।।३।।

उसन वारीचा तुकडा
माय न्याहारीला नेई
गोडी गुलाबीन स्वाद
जेवणाचा राणी घेई ।।४।।

दिस डोईवर येता
उर भरूनिया घेई
बाळ पाहतेच वाट
पान्हा फुटूनिया जाई ।।५।।

कधी शिकेन मी शाळा
पाळण्याची दोरी हाती
शिकण्याची माझी ओढ
कशी धरावी ती पाटी ।।६।।

# शेती क्षेत्रातील कर्जबाजारीपणा

कु. प्रणाली शेन्डे बी.ए. भाग २

प्रस्तावना :-

स्वातंत्र्यानंतर शेतीच्या विकासासाठी अनेक योजना कार्यक्रम राबविले आहेत. शेतीचा विकास झाला. हरितक्रांती झाली. अन्नधान्याचे उत्पादन ५० दशलक्ष टनापासून २४० दशलक्ष टनापर्यंत वाढले पण त्यांची फळे शेतकऱ्यांच्या पदरी पडलेली नाहीत. हे शेतकऱ्यांच्या आत्महत्येवरून लक्षात येते. शेतीसमोर येत्या काळात इतर अनेक संकट ही आहेत. परंतु हे संकट जिवंतपणा बाबतचे आहे. मानवाची जगण्याची उमेद ज्या ठिकाणी संपते त्यावेळी विकास, प्रगतीही संपते. त्यामुळे वाढता कर्जबाजारीपणा व शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे भारतीय अर्थव्यवस्था समोरील मोठे आव्हान आहे. शेती व शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखल्याशिवाय खऱ्या अर्थाने शाश्वत विकास साध्य होणार नाही. त्यामुळे यावर गांभीर्याने विचारमंथन होऊन धोरणात्मक उपाय योजना आखण्याची गरज आहे.

भारतीय शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा :-

शेतीला अल्प, मध्यम व दिर्घकालीन कर्जाची गरज असते. आजही ग्रामीण भागात २७% लोक दारिद्रय रेषेखाली जीवन जगतात त्यामुळे त्यांना कर्ज काढूनच शेती करावी लागते. शेती करतांना जमिनीचा आकार हा घटक महत्वाचा असतो. भारतात वाढत्या लोकसंख्येमुळे दरडोई जमिनीची उपलब्धता घटलेली आहे. त्यातही वारसा हक्काने विभाजन व तुकडीकरणाने जमिनीचे लहान लहान तुकडे होत आहेत. एक हेक्टर पेक्षा कमी जमीन असणाऱ्या सीमांत शेतकऱ्यांची संख्या भारतात ६३ टक्के आहेत. तर शेतकरी (१ ते २ हेक्टर) असणाऱ्या ची संख्या १८ टक्के आहे. या लहान आकाराच्या तुकड्यात शेती करणे परवडणारे नसते. त्यांच्या उत्पादन खर्चात झालेली वाढ व लहरी निसर्ग यामुळे त्यांनी काढलेल्या कर्जाची परतफेड होवू शकत नाही. राष्ट्रीय पाहणी नमुना २००५ नुसार भारतात ४८.६ टक्के शेतकरी कर्जाच्या सापळयात अडकलेले आहेत. सर्वाधिक कर्जबाजारीपणा कुटुंबाची संख्या आंध्र प्रदेशात (८२%) त्यांनंतर तमिळनाडु (७४.५%) पंजाबसारख्या सधन व समृद्ध राज्यातही कर्जबाजारी कुटुंबाची संख्या ६५.४% आहे. महाराष्ट्रात ५४.८% टक्के कुटुंबे कर्जबाजारी असून आत्महत्येचे सत्र सातत्याने सुरू असणारे राज्य आहे.

ग्रामिण भागातील कुटुंबाची कर्जे केल्या तीन दशकात वाढत गेलेली आहे. १९९१ मध्ये २२,२११ कोटी रू. ची कर्जे होती. ती २००७ पर्यंत १,११,४४८ कोटी रू. पर्यंत वाढलेली आहेत. ही वाढ पाचशे पटीपेक्षा जास्त आहे. एकुण कर्जात ६० टक्के शेतकऱ्यांची ७३% कर्जे होती. तर ४० टक्के बिगर शेतकऱ्यांची २७ टक्के कर्जे होती. यावरून

शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढत गेल्याचे लक्षात येते.

शेतकऱ्यांच्या कर्ज पुरवठा हा प्रामुख्याने संस्थात्मक म्हणजे सहकारी बँक, व्यापारी बँका, ग्रामीण बँका यांच्यामार्फत तर बिगर संस्थात्मक स्त्रोतामध्ये व्यावसायिक सावकार, जमिनदार यांच्यामार्फत कर्ज पुरवठा होत असतो. सावकारी कर्जाच्या तावडीतून सोडवण्यासाठी सरकारी बँका, व्यापारी बँका व ग्रामीण बँकाची स्थापना करण्यात आली. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर संस्थात्मक कर्जाचा पुरवठ्यात वाढ झालेली आहे परंतु आजही बिगर संस्थात्मक घटकांचा म्हणजेच सावकारांचा प्रभाव फारसा कमी झालेला नाही. हे वेगवेगळ्या अभ्यासावरून सिद्ध झाले आहे. सीमांत व लहान शेतकरी मोठ्या प्रमाणात सावकाराच्या कर्जाच्या विळख्यात सापडलेले असून आजही ४० टक्के पुरवठा हा सावकार व जमिनदाराकडून होत आहे. ग्रामिण कर्ज पुरवठ्याच्या विविध घटकांचा हिस्सा पाहता ७० टक्के सावकार, १० टक्के सार्वजनिक बँकेमार्फत, ९ टक्के सहकारी बँकेमार्फत, १ टक्का सुक्ष्म पतपुरवठ्यामार्फत तर ९ टक्के इतर मार्गांनी होतो. (हिंदुस्थान टाईम्स २००४) यावरून सावकारांचा कर्ज पुरवठ्यामधील प्रभाव लक्षात येतो.

आजपर्यंत शेती हा व्यवसाय नफ्याचा कधीच नव्हता व आजही नाही. शेतीचे पावसावर अवलंबित्व परंपरागत पद्धतीने शेती लागवडीच्या पध्दती आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, शेतीचा वाढता उत्पादन खर्च व शेतमालाला उत्पादन खर्चावरून किंमत निर्धारणाचा अभाव वाढत्या महागाईमुळे वाढता खताच्या, बि-बियाण्याच्या पाण्याच्या किंमती, कोरडवाहू शेती, कर्ज पुरवण्याची किचकट पद्धती यामुळे शेतकऱ्यांना शेती फायद्याची झालेली नाही. विदर्भातील कापसाची किंमती व प. महाराष्ट्रातील ऊसाच्या किंमतीसाठी झालेले आंदोलने यावरून याची तीव्रता सहज लक्षात येईल. एकुणच शेती हा व्यवसाय बेभरवशाचा व्यवसाय बनून शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढत गेलेला आहे. याशिवय म्हणजे याविषयी इंदिरा गांधी इन्स्टीट्युट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च या संस्थेचा हवाला देत अमेरिकन वृत्तपत्र, न्युयॉर्क टाईम्सने स्पष्ट केले आहे की, ८६.५ टक्के शेतकरी कर्जबाजारी व नापीकीमुळे आत्महत्या करतात.

समारोप :

आत्महत्या रोखण्यासाठी कर्जमाफी, आर्थिक पॅकेज यासारख्या योजना तकलादु आहेत. त्या तात्पुरत्या स्वरूपाच्या आहेत. मलमपट्टी लावून उपयोगाचे नाही. तर ती जखम होवू नये या दृष्टीने ठोस पावले उचलण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना कर्जपुरवठा हा संस्थात्मक विकसित झाली पाहिजे. औद्योगिक वस्तुंच्या उत्पादनाद्वारे शेतमालाच्या किंमती उत्पादन खर्चाचा विचार करून मार्जीन ठेवून ठरवल्या गेल्या पाहिजे. त्यामुळे आदान व प्रदान यातील तफावत दूर होवू शकेल. कोरडवाहू शेतीचा विकास ''पाणी अडवा, पाणी जिरवा''

यासारख्या उपक्रमांना प्रोत्साहन ग्रामिण भागात परिसेवा क्षेत्राचा विकास ग्रामीण औद्योगिकरणाला चालना या उपक्रमांना गती दिली पाहिजे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या या मानसिक दृष्टीकोणातून होत आहेत असे अनेक तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे गाव पातळीवर समुपदेशन केंद्राची स्थापना त्यामार्फत त्याचे प्रबोधन करण्याच गरज आहे. राष्ट्रीय शेतकरी आयोगाचे अध्यक्ष डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी किंमत स्थिरीकरण निधी स्थापन करावा, जमिनीतील पाण्याचे पुनर्भरण सक्तीचे करावे. कृषी कर्जावरील व्याजदार ४ टक्क्यापर्यंत कमी करावा, विपणन व्यवस्था सुधारण्यावर भर द्यावा. किसान कॉल सेंटर्सची गरज यासारखचे उपाय सुचविले आहेत. थोडक्यात शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा व आत्महत्या रोखण्यासाठी शेती व शेतकऱ्यांच्या विकासाला चालना दिल्याशिवाय शेती क्षेत्रातील हे अरिष्ट थांबणार नाही. एकंदर शेतकऱ्यांचा वाढता कर्जबाजारीपणा व आत्महत्या याचा जवळचा संबंध आहे. त्यासाठी शेतकऱ्याला योग्य दरात सुलभ पद्धती ने कर्जपुरवठा उपलब्ध झाला पाहिजे.

शेती व शेतकरी हा विकासाचा केंद्रबिंदु जोपर्यंत बनत नाही तोपर्यंत शाश्वत विकास होणार नाही.

✡☪

## गणेशा बाप तू बळीराजाचा !

कु. दिपाली पारिसे बी.ए. भाग २

करून तुला नमन बाप्पा
वक्रतुंड तुझे नांव घेतो,
वर्ष भराच्या आठवणीतून,
तु एका क्षणात येतो

शेतकऱ्याचा राजा तू
दीनदुबळ्यांचा विधाता तू
श्रीमंताचा दगडू शेट तू

परंतु देवा या शेतकऱ्यांची
का परिक्षा पाहतो तू

सोडणं रे हात मोदकावरून
फिरव बाप्पा फवारा,
गोर गरीब शेतकऱ्यांवरून

दुष्काळी ठेवून देवा
आम्हा कुठवर ठेवशील तू
आत्महत्येच्या मार्गाशिवाय
कोणता मार्ग शिल्लक ठेवलास तू

कसले भोग आले आमच्या नशिबा
जरा तू तरी सांग कारण
तुला नमन करून बाप्पा घेतो तुझे
नांव

कृषिप्रधान देश म्हणून
आपण लोक मिरवत होतो,
जगाला सांगत होतो आपण
पण आता देवा भीक मागून
खायची नेहमी वाट पाहतो.

# शेती संबंधीत जोडधंदा

कु. प्रणाली इंगोले बी.ए. भाग ३

''शेतकरी सुखी तर जग सुखी ''

भारत हा कृषी प्रधान देश आहे. शेतीसह आपल्याला जोडधंदा करणे आवश्यक आहे. त्यामुळे शेती करण्यास मदत मिळते व शेतीचा विकास होऊ शकतो. शेतीचा विकास झाला तर देशाचा विकास होईल म्हणून जोडधंदा करणे आवश्यक आहे.

शेतीसंबंधीत जोडधंदा आपल्याला कुक्कुटपालन, मेंढीपालन, मत्सोत्पादन, पशु-प्राणी संगोपण, मोती उद्योग, फुलाच्या बागायती, लाख उद्योग, रेशीम किड्यांची पैदास अशाप्रकारे जोडधंदा करणे आवश्यक आहे.

१) कुक्कुटपालन :-

कुक्कुटपालन म्हणजे कोंबड्यांचे पालन करणे होय. कोंबड्यापासून आपल्याला मांस, अंडी मिळावी म्हणून कोंबड्या पाळल्या जातात. यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या कोंबड्यांचा उपयोग होतो.

अंडी देणाऱ्या कोंबड्यांना लेअर्स कोंबड्या म्हणतात तर मास मिळण्यासाठी वाढलेल्या कोंबड्यांना ब्रॉयलर या नावाने ओळखल्या जातात.

कमी खाणारी आणि जास्त अंडी देणारी लेअर्स कोंबडी पालनासाठी निवडली जाते.

मांस देणाऱ्या कोंबड्या शरीराने धष्टपुष्ट असणे आवश्यक आहे. त्यांना जास्तीत जास्त खायला घालून त्यांचे वजन आणि मासांचे प्रमाण वाढवण्याचा प्रयत्न करावा त्यामुळे मांस, अंडी, कोंबड्या विकल्यास त्याचा आर्थिक लाभ मिळल्यास शेतीच्या कामासाठी उपयोग होईल.

२) मेंढीपालन :-

शेतकऱ्याला जोडधंदा म्हणून मेंढीपालनाचा सुद्धा व्यवसाय करता येतो. बोरी, बाभळी अशी रानांमध्ये उगवणारी झुडप तसेच ज्वारी, भूईमुंग, हरभरा इत्यादी पिकांची काढणी झाल्यावर उरलेली घसकटे-देठ कुटार मेंढ्या आवडीने खातात.

मेंढ्यापासून लोकर, मांस आणि कातडी तर मिळतेच शिवाय मेंढ्यांना शेतात बसवून खत मिळवता येते. यामुळे मेंढ्यापाळाला आर्थिक फायदा होतो. एका भारतीय मेंढीपासून एक ते दीड किलोग्रॅम लोकर आणि १० ते १२ किलो मांस मिळते. त्याची विक्री करून उत्पन्न मिळते. मेंढीच्या मलमुत्रात नायट्रोजन, फॉस्फरस आणि पोटॅशिअमचे प्रमाण इतर प्राण्यांच्या तुलनेत अधिक असते.

३) मत्स्योत्पादन :-

माणूस वर्षानुवर्ष समुद्रातील तसेच नदीच्या पाण्यातील मासे खात आलेले आहे. माणूस पुर्वी निसर्गत:च उपलब्ध होणाऱ्या मासांचे अन्न म्हणून वापर करीत असे.

आता समुद्रात किंवा साठलेल्या पाण्यात असलेल्या माशांचा अन्न म्हणून वापर करीत असे.

माशांचा सागरी अन्नात समावेश होतो. गोड्या पाण्यात कटला, रोहू, मृगळ, कार्प तर खाऱ्या पाण्यात बोय, मुडदुशी, रेणबी, चॅनॉस खसी अशा जातीच्या माशांच्या शेती जोडधंद्यासाठी शेततळी उपयोग करू शकता.

४) पशु प्राणी संगोपण :-

गाई, म्हशीपासून अधिक दुध मिळविण्यासाठी दुभत्या जनावरांना खुराक दिले पाहिजे.

पशुपालनामुळे आपण दुग्ध व्यवसाय करू शकतो. आणि शहरामध्ये हे दुध विक्री करू शकतो यामुळे आपल्याला भरपूर उत्पादन प्राप्त होवू शकते.

त्याचप्रमाणे प्राण्यापासून मिळणारे शेण हे गोळा करून आपण आपल्या शेतामध्ये टाकले तर त्यामुळे जमिन भुसभुसीत होतील आणि जमिनीमध्ये चांगल्या प्रकारचे उत्पादन घेवू शकते.

गाई, म्हशीपासून दुध मिळते तर दुधापासून अनेक प्रकारच्या वस्तु बनवु शकतो. दही, ताक, लोणी, तुप, खवा, पेठा अशा प्रकारच्या वस्तु सुद्धा विकून उत्पादन घेवू शकतो.

म्हणून पशु-प्राणी संगोपण करणे शेतीच्या जोडधंद्यास मदत मिळवू शकतो.

५) मोती उद्योग :-

प्राचीन काळापासून मोत्याला फार महत्व आहे. अलंकार, शोभेच्या वस्तु, भरतकाम यासाठी मोत्याचा उपयोग केला जातो.

त्यामुळे मोत्याला भरपूर मागणी असते म्हणून मोती उद्योग केला पाहिजेत.

६) लाख उद्योग :-

लाखेपासून वेगवेगळ्या आकाराचे मणी तयार करून दागदागिने ही बनविले जातात. लाख ही किड्यांनी स्त्रवलेले एक पदार्थ आहे. निवडुंगावर तसेच पळसाच्या झाडांवर वाढणारे किडे लाखेची निर्मिती करतात. लाखेची निर्मिती फक्त भारतामध्येच होते त्यामुळे लाख हे मौल्यवान आहे म्हणून लाखेपासून आपल्याला भरपूर आर्थिक लाभ मिळू शकते.

७) रेशीम किड्यांची पैदास :-

रेशीम किड्यांपासून उच्च प्रतीच्या रेशीम धागा मिळत असल्याने मानव रेशीम किड्यांची पैदास करत आला आहे. यापासून सुद्धा आर्थिक लाभ होवू शकते.

८) मधमाशा पालन :-

शेतीसाठी जोडधंदा म्हणून आपण मधमाशी पालन हा धंदा निवडू शकतो.

मधमाशा पालन करणे, साधे व सोपे आहेत. आपण आपल्या शेतामध्ये विविध प्रकारची फुलझाडे लावली आणि तिथे जर पोळ्यांचे डब्बे ठेवले तर मधमाशी आपले पोळे तयार करू शकते. त्यातून प्राप्त मधाची विक्री करून शेतकरी आर्थिक पैसा मिळवू शकतो.

अशाप्रकारे शेतीसंबंधीत जोडधंदा विविध करू शकतो व त्यातून भरपूर उत्पादन वाढवू शकतो.

✡☪

# देशाचा आधारस्तंभ शेतकरी

**कु. रूपाली चरडे** बी.ए. भाग २

'शेतकरी पोशिंदा जगाचा
आधारस्तंभ देशाचा'

अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन गोष्टी माणसाच्या मूलभूत गरजा आहेत. यापैकी अन्न व वस्त्र शेतकरी पुरवितो. म्हणून तो देशाचा आधारस्तंभ ठरतो.

आपले अन्न शेतकरी निर्माण करतो. शेतात तो काबाडकष्ट करतो आणि धान्य पिकवितो. ऊनपावसात आणि थंडीवाऱ्यात तो सारखे श्रम करत असतो. तोच नव्हे तर त्याची बायको, मुले हे देखील शेतात कष्ट उपसतात. धान्य निर्माण करण्यासाठी शेतकरी आपल्या जिवाचे रान करतो. म्हणून आपण पोटभर जेवू शकतो.

शेतकरी आमची लाज राखतो कारण तो आम्हाला वस्त्र पुरवतो. जे वस्त्र आपण वापरतो ते सुतापासून तयार होते. सुत कापसापासून तयार होते. तो कापूस शेतकरी पिकवत असतो, कपड्यांमुळे लाज राखली जाते, ऊन व थंडी यापासून रक्षणही होते.

शेतकरी देशाचा आधारस्तंभ खरा, पण त्याचा आधारस्तंभ कोण ? त्याला आपल्यासारखेच पोटभर खायला मिळाले पाहिजे. त्यांच्या बायको-पोरांना वस्त्रे मिळाली पाहिजे. पण ही चिंता कोणी करत नाही. सावकाराकडून त्याची पिळवणूक होते. लहरी पावसामुळे त्याचे पिक बुडते. नापिकी होते. शेतीसाठी काढलेल्या कर्जाचीही तो परतफेड करू शकत नाही. जगाचा पोशिंदा स्वत: उपाशी असतो, आत्महत्या करतो.

नोकरदार वर्ग वेळोवेळी पगार वाढीची मागणी करतात. त्यांनी याचा विचार करावा. शेतकऱ्याला उपाशी ठेवून आपण सुखी होऊ शकत नाही. कारण देशाचा आधारस्तंभ शेतकरी असे नुसते तोंडाने म्हणायचे आणि प्रत्यक्षात मात्र त्याचे जीवन असह्य करून टाकायचे, ही माणसाच्या जगण्याची रित नव्हे, कारण - 'शेतकरी सुखी तर जग सुखी.

*यदि हम जीवीत रहना चाहते है तो, हमारे जीवन का दर्शन फिरसे लिखा जाना चाहिए, वृक्षों का अर्थ है जल, जल का अर्थ है रोटी और रोटीसे हम जीवीत रहते है।*

** भारतीय नियोजन आयोग*

# कविता

कु. जया दाते
बी.ए. २

जमिन आपली सुपिक करण्या
जागोजागी बांधावित धरणे
डोंगर टेकड्यामधील पाणी
आवश्यक आहे तिथेच जिरणे ।।१।।

दऱ्याखोऱ्यातील तलाव तळी
होतील तितकी बांधून काढावित
जागोजागी लहान लहान धरणे
पाण्याने भरून जावीत ।।२।।

पाणी पुरवठा अत्यावश्यक
प्रथम उत्तम शेतीसाठी
पाणलोटाची उत्तम सोय
घ्यावी करून वर्षाकाठी ।।३।।

वरचेवर ताली दुरूस्त करूनी
पाऊस पाणी अडवून ठेवावा
कोरडवाहू शेतीसाठी ही
जलसाठा कायम ठेवावा ।।४।।

पाणलोट विकास व जलसंधारण
असे माध्यम प्रभावी
जलसिंचनाची गरज फार
शेतात आणि गावोगावी ।।५।।

# तुं ये रे बा विठ्ठला

सुंदर माझे जाते गे फिरे बहुतेके।
ओंव्या गाऊ कौतुके तु येरे बा विठ्ठला ।।१।।

जीवशिव दोनी खुंटे गे प्रपंचाचे तोटे गे ।
लावुनी पांची बोटे गे तु येरे बा विठ्ठला ।।२।।

सासु आणि सासरा दीर तो तिसरा ।
ओव्या गाऊ भ्रतारा तु येरे बा विठ्ठला ।।३।।

बारा-सोळा गडणी अवघ्या कामिनी ।
ओव्या गाऊं बसुनि तु येरे बा विठ्ठला ।।४।।

प्रपंचदळण दळिले पीठ भरिले ।
सासुपुढे ठेविले तु येरे बा विठ्ठला ।।५।।

सत्वाचें आधन ठेविले पुण्य वैरिले ।
पाप तें उतू गेलें तुं येरे बा विठ्ठला ।।६।।

जनी जातें गाईल किर्ती राहिल ।
थोडासा लाभ होइल तुं येरे बा विठ्ठला ।।७।।

* मोनाली सं. लोहकरे बी.ए. २

# पाणी अडवा पाणी जीरवा

**कु. रश्मी विनोदराव बुटे** बी.ए. भाग ३

पृथ्वीचा ७१ टक्के भाग हा पाण्याने व्यापला आहे. पृथ्वीवरील जलावरणात ९३ टक्के भाग महासागराचा असून ५ टक्के जमीनीवरील पाण्याचा आहे. ध्रुविय प्रदेशातील बर्फाच्या स्वरूपात २ टक्के पाणी आहे. पृथ्वीवर महासागर, समुद्र, नद्या, ओढे, झरे, विहीरी यातून पाणी उपलब्ध होऊ शकते.

पाण्याचे असंख्य उपयोग आहेत. पृथ्वीवरील सजीवांची उत्पत्ती पाण्यात झाली असून पाणी व वनस्पती यामध्ये पाणी हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. सजीवांच्या शरीरात त्याच्या क्रिया-प्रक्रिया होण्यासाठी पाणी अत्यंत गरजेचे आहे. घरगुती वापर, उद्योगधंदे, शेती यासाठी तसेच प्राणी, वनस्पती यांचे पोषण व संवर्धन, विद्युतनिर्मिती, जलवाहतूक इ. कारणांसाठी पाण्याचा उपयोग होतो. मानवी जीवनात व त्याच्या संस्कृतीत पाण्याला महत्वाचे स्थान आहे. पाणी हे घन, द्रव, वायू अशा अवस्थेत राहू शकते. वरील सर्व प्रकारचे पाण्याचे उपयोग व महत्व लक्षात घेता जल ही अत्यंत उपयुक्त नैसर्गिक संपत्ती आहे असे दिसून येते.

लोकसंख्या वाढीमुळे उद्योग धंद्यांच्या आणि जलसिंचन विकासामुळे पाण्याच्या मागणीत वाढ होत आहेत. पाण्याच्या उपलब्धतेनुसार मानवी उद्योग अवलंबून असतात. जगातील सर्व लोकांना शुद्ध, स्वच्छ व आरोग्यदायी पाणीपुरवठा होणे आवश्यक आहे. त्यासाठी पाण्याच्या प्रत्येक थेंब महत्वाचा मानला पाहिजे. पर्यावरणात निसर्गत: उपलब्ध असलेल्या पाण्याचे संरक्षण, संवर्धन व विकास करणे व त्याची उपयुक्तता वाढवणे यासाठी पाण्याचे केलेले व्यवस्थापन म्हणजे 'जलसंधारण' होय निरनिराळ्या कारणासाठी उपयुक्त असलेल्या पाण्याचा पुरवठा सर्वकाळ नियमीत व्हावा व तो फायदेशिर ठरावा यासाठी प्रकल्प राबवणे हे जलसंवर्धनाचे आद्य उद्दीष्ट असते.

⁕ भारतातील पाण्याची समस्या व जलसंवर्धन :-

भारतात जलसंपदा विपुल आहे. तथापि संवर्धन आणि नियोजनाचा अभाव मात्र प्रकर्षाने जाणवतो. एकुण पावसाच्या पाण्यापैकी १ टक्के पाणीच वापरले जाते. भारतातील शेतीला मोसमी पावसावर अवलंबून राहावे लागते. वनस्पतींची अनिर्बंध तोड, मृदेची अतोनात धूप यामुळे मोसमी पावसाचा बराच भाग वाहून जातो. जलसाठ्याच्या वापरात अजिबात नियोजन नाही. तळी व सरोवरे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

पंजाब, हरियाणा, गुजरात, तामिळनाडू, उत्तरप्रदेश ही राज्ये भारतातील सुमारे १/३ पाण्याचा वापर करतात. संपुर्ण भुजलाचे पुनर्नवीकरण होऊ शकत नाही. त्याकरीता भूजलसंवर्धन महत्वाचे

मानले जाते. पंजाबमधील कपूरथळा, हरियाणातील मोहिंदरगढ, उत्तरप्रदेशातील बागपत, शहानपुर या भागात नलिका विहीरींची संख्या दिवसेंदिवस वाढू लागल्याने भूजलपातळी वरचेवर खाली उतरत आहे.

महाराष्ट्रात प्राकृतिक वैशिष्ट्यामुळे काही मर्यादित भाग वगळता भुपृष्ठाखाली जलपातळी ३० मीटरपेक्षा खोल आढळत नाही. परंतु वारंवार पडणाऱ्या अवर्षनामुले शेतकरी १०० मीटर पेक्षाही खोल बिंधन विहीरी खोदताहेत अशा नलिकाविहीरींना सुरूवातीस पुर्वीच्या नलिकाविहीरी भुगर्भातील साठा मिळाल्यामुळे ४-६ महिने व्यवस्थित चालतात. त्यासाठी किमान ५०-६० हजार रू. खर्च येतो. पुढे नलिकाविहीरी कोरड्या झाल्याने महाराष्ट्रातील शेतकरी कर्जबाजारी झालेले आहेत.

गुजरातमध्ये दरवर्षी सुमारे २ मीमी जलपातळी खाली उतरत चालली आहे. सागरकिनारी भागात खारट पाणी जमीनीत उतरण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. पुर्व किनारपट्टीवर नदी-तलावाच्या वाढत्या प्रदुषणामुळे पिण्याचे पाणी व अंतर्गत मासेमारीवर भयानक संकट कोसळले आहे. त्यामुळे मासेमारांचे स्थलांतर अटळ आहे. तसेच कलकत्त्याजवळ 'सॉल्ट सरोवर' सारखी सर्वत्र अनेक सरोवरे निर्माण होण्याचा धोका आहे.

जलसंर्वधनाचे उपाय :

जलसंवर्धन करणे काळाची गरज आहे. त्यासाठी खालील उपाय महत्वाचे मानले जातात.

१) प्रसार माध्यमांतून पाण्याचे महत्व लोकांना समजावून दिले पाहिजे. कायद्याचा दुरूपयोग केल्यास होणारे दंड व शिक्षा याची जाणीव सर्वांना झाली पाहिजे. पाणी ही राष्ट्राची संपत्ती असल्याने कायद्याचे उल्लंघन करणारा देशद्रोही समजावा व योग्य ती शिक्षा करावी.

२) भुपृष्ठावर स्वच्छ पाण्याचे स्त्रोत सर्वत्र समान नाही. तेव्हा सर्वांना शुद्ध पाण्याचा उपभोग सम प्रमाणात घेता येणे शक्य नाही. याकरीता उपलब्ध पाण्याचा वापराचा अतिरेक टाळून आवश्यक तेवढेच जल वापरावे.

३) शेतीकरीता पाटाने पाणी दिल्याने खुप पाणी जमीनीत झिरपून पाण्याचा क्षय होतो. याकरीता ठिबक सिंचन पद्धत, फवारा, मडका पद्धतीचा वापर करून जलसंवर्धन करावे.

४) पुरामुळे अवर्षनामुळे पाणी दुषित होते. याकरीता अवर्षन, पुरासारख्या घटना घडू नयेत म्हणून जंगलतोड, चराईवर पुर्ण नियंत्रण आणावे म्हणून सपाटीकरण, बांधबंदिस्ती, कटुर बंडिंग हे राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून नेहमी राबवावे.

५) पिण्यासाठी वापरायचे पाणी शक्यतो बंदिस्त असावे. ते शुद्ध करून, जंतुनाशके वापरून, बंद

पाईपमधून जलाशयात आणावे. पाणी दुषित होऊ देऊ नये. म्हणजे जलसंवर्धन होईल.

६) सरोवराच्या पाण्याची वाफ होऊ नये म्हणून अल्कोहोलसारखे बाष्पीभवन प्रतिबंधक रसायने वापरावी.

७) जल प्रदुषित होणार नाही याची खबरदारी बाळगावी.

पावसाच्या पाण्याचे संचयन :-

पावसाचे पाणी घराघरावर पडते. पाऊस पडण्याचे प्रमाण प्रत्येक भागात वेगवेगळे आहेत. हिमालयात पावसाचे प्रमाण खूपच कमी आहे. तर राजस्थानमध्ये १०० मीमी सुद्धा तो पडत नाही. त्यामुळे जेथे पाऊस पडतो तेथील लोकांनी त्या पावसाचे पाणी साठवून उन्हाळ्यात त्याचा वापर केला पाहिजे. त्यासाठी जनतेला जलसाक्षरतेची गरज आहे.

पावसाच्या पाण्याच्या संयचनाची संकल्पना आज वेगाने पुढे येत आहे. या संकल्पनेमध्ये पावसाचे गच्चीवर पडणारे पाणी तेथून पाईप चॅनेलद्वारे वाहून नेले जाते. व ठरावीक टाकीत साठवले जाते. तेथून ते जमीनीतील खड्ड्यात सोडले जाते व ते पाणी तेथे मुरल्याने भुजलपातळी वाढवण्यास मदत होते. अशा प्रकारची योजना प्रत्येक व्यक्तिने राबवायला हवी.

भारतात पडणारा पाऊस हा अनियमित स्वरूपाचा आहे. जर पावसाळ्यात पाणी साठवून ठेवले किंवा जमीनीत पुरवले तर त्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई कमी भासते. भारतात पारंपारीक जलाशये भारतीय भूमीवरील बऱ्याच मोठ्या प्रदेशावरील लोकसंख्येची पाण्याची गरज पुर्ण करण्यास सक्षम होत परंतु काळाच्या ओघात या जलाशयाचे अवमुल्यन झाले आहे. पावसाच्या पाण्याचे संवर्धन करण्याच्या विविध पद्धती भारतात विकसित केल्या गेल्या आहेत. ज्यामध्ये प्राचीन काळापासून पावसाच्या पाण्याचे संचयन केले जात आहे. या संचयित पाण्याचा वापर घरगुती व शेतीसाठी केला जातो. पावसाचे पाणी साठवण्याचे अनेक फायदे आहेत. त्यामुळे सामान्य पाणी पुरवठ्यावरील भार कमी होतो. भूजल पातळीतही वाढ होते. या पद्धतीमुळे जमीनीतील क्षाराचे प्रमाण कमी करता येते. पावसाच्या पाण्यामुळे निर्माण होणारे अनेक प्रवाह एकत्रित होऊन मोठा जलप्रवाह तयार होतो.

अशा प्रकारे जमीनीमध्ये मुरवल्याने पाण्याची टंचाई भासणार नाही. आणि देशातील लोकांना कोरड्या दुष्काळाला सामोरे जावे लागणार नाही.

***

# शेतमाल प्रक्रिया उद्योगाचा अभाव

**कु. सीमा शेन्डे** बी.ए. भाग ३

भारताच्या आर्थिक विकासात शेती व्यवसायाचे अत्यंत महत्वाचे स्थान आहे. अमेरिका व अन्य प्रगत देशाचा मागील इतिहास जर पाहीला तर असे दिसून येते की, हे देश महासत्ता बनण्याचे खरे कारण म्हणजे तेथील सक्षम शेतीचा विकासच आहे. प्रगतशिल देशाच्या असे लक्षात आले की कृषी मालाची प्रक्रिया व मुल्यवृद्धी केल्याशिवाय पर्याय नाही.

भारताला हवामानाचे आणि नैसर्गिक साधन सामग्रीचे वरदान लाभलेले आहे. म्हणूनच भारतामध्ये कुठल्याही प्रकारचा शेतमाल मोठ्या प्रमाणात पिकवला जावू शकतो. आपण बऱ्याच पिकांच्या बाबतीत जगात पहिल्या पाचमधील स्थानावर आहोत. शेतीमाल उत्पादनात चीनखालोखाल भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. परंतु शेतीतील उत्पादकतेमुळे हे चित्र वेगळे पाहावयास मिळते. म्हणूनच या ठिकाणी महात्मा गांधी यांची एक गोष्ट नमूद करावीशी वाटते. ती म्हणजे नैसर्गिकरित्या श्रीमंत असणाऱ्या देशातील आपण गरिब लोक आहोत. म्हणजे आपल्या या नैसर्गिक साधनसामुग्रीचे आपल्याला निट आकलन झाले नाही. म्हणून आपण शेती व्यवसायात प्रगती करू शकलो नाही. महाराष्ट्र हे भारतातील शेती व्यवसायात आणि औद्योगिक क्षेत्रात एक प्रगतीशिल राज्य असून विविध पिके राज्यात घेतली जातात. महाराष्ट्राचा औद्योगिक विकास झपाट्याने होत असतांना शेतमालालाही या भागामध्ये मोठ्या प्रमाणात बाजारपेठ उपलब्द झाली आहे. व भविष्यातही मोठ्या प्रमाणात वाढणारे आहे. महाराष्ट्रातील जवळजवळ ८७ टक्के जमिन ही कोरडवाहू आहे. दिवसेंदिवस पाण्याचा व मजुरांचा प्रश्न बिकट होत असताना शेतकरी आता आधुनिक सिंचन पद्धतीचा व कृषी यांत्रिकीकरणाचा वापर करताना दिसतो. याचबरोबर शासनाच्या फळबाग विकास कार्यक्रमामुळे आणि राष्ट्रीय फलोत्पादन योजनेमुळे फळे व भाजीपाला लागवडी खालील क्षेत्र दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढले आहे व वाढणारे आहे.

उत्पादन वाढत असतांना शेतकऱ्यांच्या पुढे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत त्यातील एक महत्वाची समस्या म्हणजे शेतीमालास योग्य भाव मिळण्याची ज्या वेळी उत्पादन वाढते त्या वेळेस बाजारपेठेत मोठी आवक होऊन शेतीमालास भाव मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे योग्य भाव न मिळाल्याने मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. त्याचबरोबर उत्पादन जास्त झाल्यामुळे मालाची विक्री न झाल्यामुळे साठवणूकीच्या सुविधा नसल्यामुळे व इतर अनेक कारणांमुळे शेतमालाची मोठ्या प्रमाणावर नासाडी होते. अशा वेळेस शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागतो. म्हणून शेतकऱ्यांनी जागरूक होऊन शेती करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी बांधाच्या बाहेर पडून शेतमाल साठवणूक व आवश्यकतेनुसार विक्री करणे गरजेचे आहे. म्हणूनच शेतीतील तयार झालेल्या माल थेट ग्राहकांपर्यंत पोहचवून जास्त नफा मिळविता येईल हे जवळपास सर्वच पिकांच्या बाबतीत आढळून येते. यासाठी शेतातून काढलेल्या मालाची दुप्पट किंवा त्याहूनही किती तरी पटींनी मुल्यवृद्धी करण्याची शक्ती प्रक्रिया उद्योगामध्ये आहे.

****

# जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम

**प्रा. डॉ. विठ्ठल घिनमिने** अर्थशास्त्र विभाग

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. आज सुद्धा भारतातील ५८% लोकसंख्या कृषि क्षेत्रावर अवलंबून आहेत. एकुण राष्ट्रीय उत्पन्नामध्ये कृषि चा हिस्सा (वाटा) वर्ष २०१३-१४ मध्ये १८% असून एकुण निर्यातीमध्ये या क्षेत्राचा वाटा २०१३-१४ मध्ये १०% आहेत. स्वातंत्र्याच्या ६५ वर्षानंतरही कृषिवरील निर्भरता या क्षेत्राचे महत्व विशद करते. संपूर्ण जगातील एकुण जमिनीपैकी केवळ ११% जमीन शेतीसाठी उपयुक्त आहेत. त्या तुलनेत भारतातील एकुण जमिनीपैकी ५२ टक्के जमीन शेतीसाठी उपयुक्त आहे. जगात आढळणाऱ्या ६० प्रकारच्या मृदापैकी जवळपास ४६ प्रकारची मृदा भारतात आहे. अशी गुणवत्ता व क्षमतेनी भारतीय जमीन समृद्ध व परिपूर्ण असतानांही भारतीय शेतकरी सुखी व समाधानी नसून सन २०००-०१ पासून भारतात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याच्या आत्महत्या झालेल्या आहेत.

भारताने सन १९९१ पासून नविन आर्थिक धोरण स्विकारले. या आर्थिक धोरणाचे श्रेय त्यावेळेचे वित्तमंत्री आणि माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना दिले जाते. या नवीन आर्थिक धोरणामध्ये जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण या तीन पैलुचा समावेश होतो. कृषि व्यापार खुला करण्यादिशेने भारताने १ जानेवारी १९९५ मध्ये जागतिक व्यापार संघटनेशी करार केला. हा करार लागून होवून जवळपास दोन दशकाचा काळा झालेला आहे. या कराराचा नकारात्मक परिणाम शेतीक्षेत्रावर झालेला दिसून येतो. यामागचे मुख्य कारण म्हणजे अजूनही विकसीत औद्योगिक प्रगत राष्ट्रांनी कृषी उत्पादनावर दिल्या जाणाऱ्या सबसिडी तथा घरगुती सुविधा यामध्ये कोणत्याही प्रकारची कपात केलेली नाही या संघटनेतील तरतुदीप्रमाणे हा करार लागु झाल्यापासून सात वर्षाच्या आत विकसीत राष्ट्रांनी कृषी सबसिडी २१% टक्क्यानी व निर्यातीमधील सबसिडी साठी बजेटमध्ये केल्या जात असलेले प्रावधान यामध्ये २४% कपात प्रथम १० वर्षात करणे आवश्यक होते. या संदर्भात आढावा घेतल्यास जपान मध्ये कृषी उत्पादनाच्या एकुण किंमतीच्या ८२.५ टक्के; दक्षिण कोरियात ६२ टक्के; युरोपियन राष्ट्रामध्ये ३५ टक्के; चीनमध्ये ३४ टक्के; अमेरिका २४ टक्के अनुदान दिल्या जाते. तर भारतात हे अनुदान केवळ २.३४ टक्के दिले जाते. अशाप्रकारे अनुदाना संबंधात भेदभावनीती स्पष्ट करित असली तरी मात्र विकसीत राष्ट्र सत्यस्थिती मानायला तयार नाही. भारतामध्ये प्रति शेतकऱ्याला १११ डॉलर म्हणजेच जवळपास ७२१५ रू. सबसिडी दिल्या जाते. तर अमेरिकेत प्रति शेतकरी ४७००० डॉलर, युरोपिय राष्ट्रामध्ये ३४००० डॉलर सबसिडी दिली जाते. यामुळे भारतीय कृषी क्षेत्रावर असा प्रभाव पडला की विकसीत संपन्न राष्ट्र आपल्या शेतकऱ्यांना सबसिडी देऊन जी सुरक्षा प्रदान करते त्यामुळे कृषि उत्पादनाच्या आयातीमध्ये मोठ्या प्रमाणात वृद्धि झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्याच्या मालाना स्पर्धा निर्माण होवून शेतकऱ्याच्या मालाचे भाव कमी होतात त्यांचा प्रतिकुल परिणाम शेतकऱ्यांना आपली उपजिवीका करणे कठीण झालेले आहेत.

जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवर होणारे परिणाम :-

१) शेतीच्या उत्पादन खर्चात वाढ :-

हरित क्रांतीच्या काळात शेतीच्या उत्पादनाचे तंत्र बददले आहे. सिंचन, सुधारित बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके, आधुनिक अवजारे या घटकामध्ये होणारा खर्च वाढलेला आहे. परिणामत: उत्पादन खर्च वाढलेला आहेत व उत्पादनात फारशी वाढ झालेली नाही. त्यामुळे शेतीत व्यवसाय तोट्यात आलेला आहे.

२) शेत जमिनीचा वापर :-

जागतिकीकरणामुले शेत जमिनीचा वापर उद्योगासाठी मोठ्या प्रमाणात करण्यात येतो. त्यामुळे शेतकरी भूमीहीन होत आहे. बहुराष्ट्रीय व बलाढ्य कंपन्या कृषि क्षेत्रात प्रवेश करीत आहेत. विशेष आर्थिक क्षेत्राच्या (सेझ) नावाने हजारो हेक्टर जमिन या कंपन्यानी हडपल्या आहे. परिणामत: मोठ्या प्रमाणात शेतकरी भूमीहीन झालेले आहे.

३) शेतमालाच्या निर्यातीचा प्रश्न :-

जागतिकीकरणामुळे आयात-निर्यात निर्बंध अतिशय शिथील झाले असून त्यांचा फायदा विकसनशिल देशातील शेतमाल निर्यातीला होईल असे म्हटले जाते. प्रत्यक्षात जागतिक व्यापाराची सर्व सुत्रे जागतिक व्यापार संघटनेच्या हाती एकवटलेली आहे. या जागतिक व्यापार संघटनेवर विकसीत देशाचे वर्चस्व आहे. त्यामुळे भारतासारख्या विकसनशिल देशाच्या शेतमालाच्या निर्यातीचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

४) बौद्धिक संपदा अधिकार :-

जागतिकीकरणामुळे बौद्धिक संपदा अधिकार कंपन्याच्या हातात जावून त्यांना शोषनाचा नवीन मार्ग उपलब्ध झालेला आहे. या कायद्यामुळे शेतकऱ्यांच्या बियाणे संग्रहीत करणे व विनिमय करण्याचा हक्क हिरावला गेला आहे. The Seeds Act 2004 च्या बाबत कृषि विषयक अर्थतज्ञ वंदना शिवा म्हणतात बेभरवशाचे आणि पुन: निर्मीती शक्य नसलेले बियाणे तयार करून खाजगी कंपन्यानी भारतीय शेतकऱ्यांना परावलंबीत्व, कर्जबाजारीपणा व अखेर आत्महत्या या स्थितीत शेतकऱ्यांना आणून सोडले आहे.

५) दारिद्रय वाढण्याची शक्यता :-

जागतिकीकरणामुळे विकसनशिल देशाचा वेगाने विकास होईल अशी भ्रामक कल्पना खरी ठरलेली आहेत. जागतिकीकरणाचा फायदा शहरी महानगरीय भागातील उच्च उत्पन्न धारक वर्गाला झालेला आहे. परंतु ग्रामीण भागातील दारिद्रय कमी होण्यापेक्षा वाढताना दिसून येते. भारतात १९८३ मध्ये दारिद्रय रेषेखालील प्रमाण ३६ प्रतिशत होते. सन २000 मध्ये हेच प्रमाण २६ प्रतिशत कमी झालेले आहे. परंतु ग्रामीण भागातील हेच प्रमाण ४0 प्रतिशत होते. याचा अर्थ असा होतो की, जागतिकीकरणाचा सामान्य लोकांना किती फायदा झालेला आहे. याचा विचार करणे आवश्यक आहे.

अशाप्रकारे जागतिकीकरणाच्या संदर्भात भारत व विकसनशिल अन्य देशांनी गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. विकसनशिल व अविकसीत देशांनी आपली बाजू समर्थपणे मांडून विकसीत देशातील अटी व नियमनाना झुगारून आंतरराष्ट्रीय स्तरावर एक सक्षम संघटन निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

✡☪

# माती परिक्षण

**कु. मनिषा ताकसांडे** बी.ए. २

जमीन ही राष्ट्राची नैसर्गिक साधन संपत्ती असून तिची सुपीकता व उत्पादन क्षमता तिच्या शास्त्रोक्त व्यवस्थापनेवरच अवलंबून असते. अधिक उत्पादन देणाऱ्या जातींची लागवड, साधन शेती, दुबार पिके सारख्या सुधारित पद्धतीच्या वापरांमुळे जमीनीतल अन्नद्रव्यांचे प्रमाण झपाट्याने कमी होते. म्हणून पेरणी पुर्वी जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्यांचे प्रमाण जाणून घेवून पिकांच्या आवश्यकतेनुसार अतिरिक्त अन्नद्रव्यांचा पुरवठा करण्यासाठी माती परिक्षण करून त्यानुसार खतांचा वापर करणे अगत्याचे आहे.

त्याचप्रमाणे कोणत्याही फळझाडाची लागवड करण्यापूर्वी जमिनीची त्या त्या फळझाडासाठीची योग्यता तपासून पाहणे अत्यंत महत्वाची बाब आहे. तसेच ओलीताच्या पाण्याचे सुक्ष्म अन्नद्रव्यांचे परिक्षण जमिनीचे भौतिक गुणधर्म जिप्सम् सारख्या भू-सुधारकांचा वापर इत्यादी बाबींचा सखोल विचार करून नैसर्गिक संपत्तीची सुपीकता आणि उत्पादन चिरकाळ क्षमता (चिरस्थायी) टिकवून ठेवण्यासाठी दक्ष राहणे आवश्यक आहे.

परिक्षणासाठी नमुने गोळा करणे :-

अ) मातीचा नमुना :-

१) प्रथम शेताची पाहणी करून जमिनीच्या प्रकारानुसार उदा. जमिनीचा रंग, खोली, उतार आणि उत्पादकतेनुसार विभाग करून प्रत्येक विभागातून एक प्रतिनिधीक नमुना परिक्षणासाठी घ्यावा.

२) नमुना घ्यावयाचे जागेवरील काडी कचरा बाजूला करून १५ ते २० सें.मी. खोली पर्यंत 'व्ही' (V) आकाराचा खड्डा करावा. खड्ड्यामधून पृष्ठ भागांपासून तळापर्यंतची माती गोळा करावी. अशा रितीने आवश्यकतेनुसार ५ ते १० ठिकाणाची माती एकत्र करावी व त्यामधून अर्धा किलो प्रतिनिधीक नमुना परिक्षणासाठी घ्यावा.

३) नमुन्यामधील 'काडीकचरा, पाने, मुले काढून माती कागदावर पसरवून सावलीत वाळवावी. व नंतर स्वच्छ धुतलेल्या कापडी पिशवीत किंवा प्लॅस्टीकच्या पिशवीत माती भरून मातीसह प्रयोगशाळेला पाठवावी.

मातीचा नमुना किती खोल पर्यंत घ्यावा :-

(रासायनिक खतांच्या शिफारशीसाठी)

१) ज्वारी, भात, भुईमुंग, गहू इ. – १५ ते २० सें.मी.

२) कपाशी, ऊस, केळी – ३० सें.मी.

३) फळ झाडाच्या बुध्यांपासून १ ते १५ फुट सोडून बाहेरच्या परिघामधून – ३० सें.मी.

फळ बागेसाठी जमिनीची निवड – 3x3x5 फुट खोलीचा किंवा मुरूम लागेपर्यंत खड्डा करून पृष्ठभागापासून प्रत्येक फुटातील प्रतिनिधीक नमुना काढावा व तो वेगवेगळ्या पिशव्यांमध्ये भरून तपासणीसाठी पाठवावा.

मातीचा नमुना कसा व कोठे पाठवावा :–

मातीचा नमुना प्रयोगशाळेत पाठवितांना प्रत्येक नमुन्यासोबत खालील माहितीचे पत्रक भरून पाठवावे.

शेतकऱ्याचे नांव व पत्ता, शेत सर्वे नं. मागील हंगामात घेतलेली पिके. पुढील हंगामात घ्यावयाची पिके इ.

मातीचे नमुने व त्याचे शुल्क, विभाग प्रमुख कृषी रसायन व मृद शास्त्र विभाग डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला – ४४४ १०४ ह्या पत्यावर पाठवावे.

ब) ओलिताच्या पाण्याचा नमुना :–

विहीरीवरील पंप साधारणपणे १५ ते २० मिनिटे सुरू ठेवून विहीरीतील पाणी जावू द्यावे. नंतर नमुना घ्यावायाची काचेची किंवा प्लॅस्टीकची बाटी स्वच्छ धुवून घ्यावी व त्यामध्ये विहीरीचे पाणी भरावे. नदी, नाले, कालवे ह्यातील पाण्याचा नमुना हा प्रवाहाच्या मध्यातील असावा त्याच प्रमाणे या विहीरीवरील इलेक्ट्रीक पंप बसविलेला नाही अशा विहीरीतील पाणी प्रथम चांगले ढवळून घ्यावे व परिक्षणासाठी घेतलेल्या नमुन्याच्या बाटलीवर नाव, पत्ता, शेताचा सर्वे नं. लिहून प्रयोग शाळेत पाठवावा.

पाणी परिक्षणाचे फायदे यावर माहिती लिहावी.

माती परिक्षण अहवालानुसार निष्कर्ष :–

प्रयोग शाळेत मातीच्या नमुन्याने आम्ल विम्ल निर्देशांक (सामु) विद्राव्य क्षाराचे प्रमाण विद्युत वाहकता सेंद्रिय कर्प. नगाचे प्रमाण समजण्यासाठी उपलब्ध स्फुरद व फलाश या गुणधर्मासाठी पुन: करण करण्यात येते व त्यानुसार माती परिक्षण अहवाल तयार होती या अहवालानुसार जमिनीत अन्नद्रव्ये किती प्रमाणात उपलब्ध आहेत याची माहिती मिळते या अहवालानुसार जमिनीत अन्नद्रव्ये किती प्रमाणात आहेत याची माहिती मिळते. व त्यानुसार पिकाचे प्रकार लक्षात घेऊन सेंद्रिय व रासायनिक खताच्या मात्रा सुचविण्यात येतात.

***

# वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांची आत्महत्या

**कु. चंचल ठोसरे** बी.ए. ३

महाराष्ट्रात एकुण ३५ जिल्ह्यांपैकी वर्धा जिल्हा हा एक महत्वपूर्ण जिल्हा असून वर्धा जिल्ह्यात शेतीचे प्रमाण जास्त प्रमाणात आढळून येते. वर्धा जिल्हा म्हणजेच शेतकऱ्यांसाठी एक महत्वपूर्ण दुवा आहे.

वर्धा जिल्ह्यात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण सर्वात जास्त आढळून येते व यातूनच शेतकऱ्याची परिस्थिती शेती असूनही हलाखीची आहे. यामागे शेतकरी आत्महत्या हे कारण दिसून येते. शेतात चांगल्या प्रकारचे पीक होत असल्यावर सुद्धा शेतकरी मात्र कंटाळलेला आहे. याचे कारण शोधणे गरजेचे आहे. काहींच्या मते शेतकऱ्यांवर खुप प्रमाणात कर्ज असल्यामुले शेतकऱ्यांना होणारे पीक कमी आहे. म्हणून शेतकरी आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतो. तर काहींच्या मते शेतकरी शेतावरील कर्ज फार मोठ्या प्रमाणात काढतात. व त्याची परतफेड करण्यास मात्र तो नाकारतो. आणि त्यामुळे पुढच्या शेतीसाठी कर्ज मिळत नाही. आणि या प्रकारामुळे शेतकरी आत्महत्या करीत असतो. अशा अनेक प्रकारच्या समस्यांना शेतकरी तोंड देत असतो व शेवटी मात्र आत्महत्या हे निदान शेतकरी शोधत असतो. अशा अनेक प्रकारची मते ॲग्रोवन या समाचार पत्रात लोक मांडीत असतात. परंतु शेतकरी मात्र कोणत्या व कसल्या जाळ्यात अडकलेला आहे हे मात्र कुणीच जाणून घेत नाही. शेतकऱ्यांच्या समस्या मात्र कुठल्या प्रकारच्या आहे व त्यांना आपण कशाप्रकारे मदत केली पाहीजे हे सर्वात महत्वाची जबाबदारी आहे. आणि यातूनच शेतकरी बाहेर निघू शकतो व वर्धा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी होत जाईल व शेतकरी आपल्या शेतीत पिक घेऊन आनंदी राहू शकेल.

शेतकऱ्यांची समस्या म्हणजेच पाऊस वेळेवर पडत नाही. आणि पावसामुळे पिकावर हानी पडत असते. पाऊस आघाती पडत असतो. आणि पाऊस आल्यावर शेतकऱ्यांची पेरणी झाली त्यानंतर बीज रूजायला सतत पाऊस पडावा लागत असतो. आणि हा पाऊस वेळेवर न झाल्यास बीज जमीनीत कोंबेजून मरून जातात. आणि काही दिवसांन शेतकऱ्यांना ती शेतीची मोडणी करून परत पाऊस आल्यावर पेरणी करावी लागत असते. आणि दुसऱ्या पेरणीकरीता शेतकरी पुन्हा बँकेचे कर्ज काढीत असतो. पावसाच्या या दुष्काळामुळे शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

पाऊस सतत न पडल्यास पिकांची वाढ खुंटते व पिकांना जास्तीत जास्त उत्पन्न देता येत नाही. आणि त्यामुळे शेतकरी कर्जाची परतफेड करू शकत नाही.

त्याचप्रमाणे जंगली जनावरांचा त्रास सुद्धा शेतकऱ्यांना सहन करावा लागत असतो. पिके मोठी झाली की जनावरांचे पुर्ण लक्ष त्या शेतीची नासधुड करण्यात असतो. रात्रीच्या वेळी जनावरे शेतीतील पिकांना हानी पोहचत असतात. पिकांना पुर्णपणे धुळीला मिळवत असतात. आणि जनावरांनी पिकांची नासधुड करू नये म्हणून शेतकऱ्यांनी केलेले प्रयोग सुद्धा शेतकऱ्यांचा जीव घेत असतात. जनावरे ही

पुर्णता जंगली जनावरे असतात. पावसाप्रमाणेच जनावरे सुद्धा पिकांना हानी पोहचवत असतात. हे सुद्धा शेतकरी आत्महत्येचे कारण असू शकतात.

पिके वाढीला आली की त्यावर रोग फैलत असतात. झाडांची पाने लाल येणे, पांढऱ्या प्रकारच्या अळ्या पानांना खाऊन टाकतात. आणि त्यामुळे उत्पादनात घट होत असते. आणि पिकांवरचे रोग कमी करण्यासाठी शेतकऱ्यांना किटकनाशके यांची फवारणी करावी लागत असते. आणि किटकनाशक फवारणी फार महागड्या दरात विक्रेते शेतकऱ्यांना विकत असतात. आणि त्या फवारण्या मारण्यासाठी शेतकरी कर्जबाजारी होत असतो. हे सुद्धा शेतकरी आत्महत्येचे कारण असू शकते.

अशाप्रकारे शेतकऱ्यांना शेतीत पीके घेताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. यामुळे शेतकरी चिन्ताग्रस्त झालेला दिसतो. झालेले कर्ज, कर्जाची परतफेड व दरवर्षी लावायला शेतीत बीजाची मागणी.

यानंतर शेतकऱ्याला झालेले पीक खुप कमी प्रमाणात असेल तरी सुद्धा मात्र पिकाला भाव मिळत नाही. कमी प्रमाणात पिकाला भाव मिळाल्यामुले शेतकऱ्याचे झालेले कर्ज व शेतकऱ्याला पुढील शेतीसाठी लागणारा पैसा, शेतकऱ्यांच्या कुटुंबातील लागणारा खर्च या सर्वांचा खर्च व शेतकऱ्याला शेतीमार्फत मिळालेला पैसा कमी पडत असतो व या जाचाला कंटाळून शेतकऱ्यांकडे एकच मार्ग दिसून येतो. तो म्हणजेच शेतकरी आत्महत्या ! यामुळे शेतकऱ्यांची मुले अशिक्षित दिसून येतात. व शेतकरी आहे त्याच ठिकाणी दिसून येतो. अफाट कष्ट सोसून शेतकरी शेतात पिक घेत असतात व त्यावर मात्र शेतकऱ्याला निराशाच मिळत असते.

शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. शेतकरी अनेक प्रकारचे पीक शेताद्वारे घेत असतो. शेतकऱ्यांची परिस्थिती अशाच प्रकारची राहीली तर पुढे होणारा त्रास म्हणजेच शेतकरी शेतीतून पिके घेणार नाही. शेतकरी उद्योगधंद्याकडे वळतील किंवा मग छोटे मोठे काम करतील व परिणाम म्हणजे मानवजातीस लागणारा धान्याचा पुरवठा कमी होईल व मुबलक प्रमाणात होईल. धान्यांना महागाई वाढेल. आणि काही दिवसात मात्र शेतकऱ्याची आठवण मात्र मानवजातीला होईल. शेतकऱ्यांचे महत्वा अजूनही मानवाला कळालेले नाहीत म्हणून शेतकऱ्यांवर होणारे परिणाम व परिणामातून आत्महत्येचे प्रमाण कुणीही जाणून घेत नाही. शेतकरी मात्र जगाचा पोशिंदा जीवनात नेहमीत दु:खी असतो.

जोपर्यंत शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या नाही व त्यांच्यावर काही उपाय सुचवले नाहीत तर शेतकरी आत्महत्येचे प्रमाण आपल्याला जास्त प्रमाणात आढळून येईल व शेतकरी का आत्महत्या करीत आहेत व त्यामागे कोणती समस्तया आहे. हे सर्वप्रथम जाणून घेतले पाहिजे. शेतकरी कर्जापायी आत्महत्या करीत असतो. व शेतकऱ्याच्या मागे असलेले शेतकऱ्याचे कुटुंब, शेतकऱ्यांची मुले अशिक्षित राहू नये. त्यांच्या कुटुंबासाठी लागणारा उदरनिर्वाहाचा खर्च ह्या सर्व बांबीकडे लक्ष दिले पाहिजे. शेतकऱ्यांना आपले प्रश्न सोडविण्यासाठी ग्रामपंचायत समितीचा सल्ला घ्यायला पाहिजे. कारण आजचा शेतकरी उद्याचा राजा असे म्हटले जाते. शेतकरी आत्महत्येचे प्रमाण कमी होण्यासाठी सरकारने

शेतकऱ्यांना शेतीमध्ये वापरल्या जाणाऱ्या रासायनिक खते, किटकनाशके, बीजोत्पादन या वस्तूंचा कमी दरात करून द्यायला पाहिजे. त्यामुळे वर्धा जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्येचे प्रमाण कमी होत जाईल.

वर्धा जिल्ह्यात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण त्याचप्रमाणे इतरत्र जिल्ह्यांतही शेतकरी आत्महत्येचे प्रमाण आढळून येतात. शेतकऱ्यांना विहीर, कुंपने, ठिबक सिंचन अशा प्रकारच्या पाण्याची विल्हेवाट लावणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे शेतकरी हा कर्जफेड करू शकेल. व आपले कुटुंब आपली मुले सुशिक्षित करू शकेल. शेतकरी हा जगातील सर्वात मोठा पाया आहे. वर्धा जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्येचे प्रमाण जास्त आढळून येते. दर वर्षी शेतकरी कर्जापायी आत्महत्या करीत असतो. शेतकऱ्यांवर झालेले कर्ज व त्या कर्जातून मुक्त होणे हे शेतकरी प्रयत्न करीत असतो. परंतु शेतकऱ्यांचे प्रयत्न असफल असतात.

आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती बदलण्यासाठी प्रशासनावरील सर्व विभागांनी एकत्र येवून समन्वयाने काम करणे गरजेचे आहे.

त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनी आपल्या मुला-मुलींचे विवाह मेळाव्यात करावे. कारण शेतकऱ्यांवर कर्ज होणार नाही. विवाहासाठी लागणारा पैसा खर्च होणार नाही. त्याचप्रमाणे शेतकऱ्यावर कर्ज होणार नाही. शेतकऱ्यांच्या घरातील कुराचे निधन झाले असतील तर त्यांनी चौदावीचा कार्यक्रम ठेवू नये. कारण निधन केव्हाही झाले तर शेतकऱ्याला कर्ज काढून कार्यक्रम पार पाडत असतात. हे कार्यक्रम न ठेवता त्या ठिकाणी पैसा शिल्लक ठेवावा. यामुळे ही शेतकऱ्यावर जास्त प्रमाणात कर्ज होणार नाही.

अशा काही रूढी, परंपरा समाजात असल्यामुळे शेतकरी त्या परंपरांना चालू ठेवत असतो. परंतु त्याचा परिणाम मात्र त्याच्या होणाऱ्या उत्पन्नावर होत असतो. शेतकऱ्याचे उत्पन्न कमी व गरजा जास्त असल्यामळे शेतकऱ्यावर कर्जाचे प्रमाण वाढत असते व कर्जाचे प्रमाण जास्त झाल्यामुळे किंवा कर्जाची परतफेड न केल्यामुळे शेतकरी मात्र आत्महत्या करीत असतो.

वर्धा जिल्ह्याच्या शेतकरी आत्महत्येचे वाढते प्रमाण हे धक्क्याचे कारण आहे. कारण शेतकऱ्यांवर शेती आधारलेली आहे. शेतकरी जगाचा पोशिंदा आहे. शेतकऱ्याने शेतीमध्ये पिक घेरे बंद केले तर सगळीकडे असंतोषाचे वातावरण निर्माण होईल. शेतकरी आत्महत्येचे प्रमाण कमी होण्यासाठी शेतकऱ्याने स्वत: आत्मनिर्भय व्हायला हवे. शेतकऱ्यांनी आपल्या वाढत्या समस्या व त्यांचा उपाय चांगल्या प्रकारे सोडविण्याचा प्रयत्न करायला पाहिजे. आत्महत्या कर्जाचे उपाय नसून आपल्या कुटुंबाला सांभाळणे व स्वत:च्या मुलांचे चांगल्या प्रकारे संगोपण करणे, त्यांना योग्य प्रकारे शिक्षण देणे याकडे लक्ष देऊन त्याच्यावर उपाय शोधला पाहिजे. कमीत कमी शेतीमध्ये जास्तीत जास्त उत्पादन घ्यायला पाहिजे. सरकारने जे शेतकऱ्यांसाठी योजना राबविल्या आहे. त्यांचा फायदा शेतकऱ्यांनी घेतला पाहिजे.

अशाप्रकारे शेतकऱ्यांनी आपल्या कामाचे नियोजन वेळेवर केले तर शेतकऱ्यांवर होणारे कर्ज व कर्जाची परतफेड नक्कीच होईल. व आपला देशाचा शेतकरी कर्जमुक्त झाला पाहिजे व पुढे येणारे आनंददायी जीवनाचा सुखभोग घेतला पाहिजे.

****

# कोरडवाहु शेतीच्या समस्या व उपाययोजना

**कु. भक्ती घरझोडे** बी.ए. भाग-३

महाराष्ट्र राज्य विविध प्रकारचे कृषी उत्पादने घेण्यात एक महत्वाचे राज्य आहे. शेतीचे प्रामुख्याने सहा प्रकार पडतात. जसे ओलीत शेती, कोरडवाहू शेती, बागायती शेती, आर्द्र शेती, स्थलांतरीत शेती व पायऱ्यापायऱ्या ची शेती. महाराष्ट्रात मुख्यत्वे मोसमी पावसावर अवलंबून असणारी कोरडवाहू शेती आहे. एकुण २२.५७ लाख हेक्टर पिकाखालील क्षेत्रापैकी सुमारे ८०-८५ टक्के शेती जिरायती आहे. सुमारे १७-१८ टक्के क्षेत्र बागायती शेती खाली आहे. देश पातळीवर हे प्रमाण सुमारे ४५ टक्के आहे. अशा स्थितीत कोरडवाहू क्षेत्राचा विकास अपरिहार्य ठरतो.

कोरडवाहू शेतीच्या समस्या :-

महाराष्ट्राच्या विविध विभागात पावसाचे दिवस व पर्जन्यमान यात मोठी तफावत आहे. सरासरी पावसाचे प्रमाण पाहता कोकणात ८४ दिवस, विदर्भात ४५ दिवस मध्य महाराष्ट्रात ४० दिवस व मराठवाड्यात ३७ दिवस असे स्वरूप दिसते. अवर्षण प्रवण क्षेत्रात जेमतेम ५०० मि.मि. तर घाट माथ्याच्या काही प्रदेशात ३,५०० मि.मि. पर्यंत वार्षिक पर्जन्यमान आढळून येते.

पावसाळा ऋतु सामान्यपणे जून ते ऑक्टोंबर असा असतो. अलीकडे पावसाचे प्रमाण कमी होत आहे. पाऊस येण्यातच अनिश्चितता असल्याने संपूर्ण शेतीचेच भवितव्य अनिश्चित अशाश्वत आहे.

कोरडवाहू शेती सुधारणेसाठी उपाय :-

महाराष्ट्रात ८० टक्के कोरडवाहू शेतकरी भरडधान्य पिकवतो. तेव्हा सरकारने कृषी विद्यापीठामार्फत ज्वारी, बाजरी सारख्या पिकांच्या सुधारित बियाण्यांचा शोध घेणे आवश्यक ठरते. त्यांच्या शेतमालाला योग्य विपणन व्यवस्ता आवश्यक आहे. शेतकऱ्यांना पाणी वापराबाबत आधुनिक माहिती व प्रशिक्षण दिला पाहिजे. सर्वसामान्य लहान शेतकऱ्यांची शेती सुधारणा होईल अशा सरकारी कृषी योजनांची गरज आहे. पर्वतमय भागाच्या पायऱ्याजवळील भागात वाहणारे पाणी अडवून तलाव व जलाशय निर्माण करावे अशा कोरडवाहू शेतीसाठी विद्युत दर माफक असावेत. शेतकऱ्यांना कृषी औजाराचा पुरवठा योग्य भाडे तत्वावर व्हावा अशा अनेक सुचना जिरायती शेती विकासासाठी करता येतो.

कोरडवाहू क्षेत्रातील पडणारा पाऊस व उपलब्ध स्थानिक साधनांचे योग्य नियोजन केल्यास, शेती व पुरक उपक्रमास सहाय्य केल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात सातत्य राहिल व त्यांना स्थैर्य प्राप्त होईल. ग्रामिण अर्थव्यवस्था बळकट करून जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी कोरडवाहू शेती विकास तात्पुरता न करता कायमस्वरूपी करणे व कोरडवाहू शेतीच्या उत्पादकतेत शाश्वतता आणणे गरजेचे आहे. हे काम विहीत कालावधीत अभियान स्वरूपात व सर्व समावेशक होणे महत्वाचे आहे.

१ जानेवारी रोजी शाश्वत जिरायती शेतीसाठी महाराष्ट्र सरकारने कोरडवाहू शेती अभियान या नव्या योजनेला राज्य मंत्रीमंडळाने मंजुरी दिली. जिरायती शेतीच्या विकासासाठी पुढील पाच वर्षात २० हजार कोटी रूपये खर्च केले जातील. त्यापैकी २ हजार कोटी रूपयांची तरतूद यासाठी स्वतंत्र्यपणे करण्यात आली. सरकारच्या विविध योजनेतून मिळणारा निधी विचारात घेवून निधीचा वापर केला जाईल. केंद्र व राज्य शासनाच्या कोरडवाहू शेती संबंधातील कार्यक्रमांच्या समन्वयातून एकत्रित कार्यक्रम घेतला जाईल.

१) कोरडवाहू शेतीची उत्पादकता वाढवणे, प्रति क्विंटल उत्पादन खर्च कमी करणे व उत्पन्न वाढवून शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त करणे.

२) मुलस्थानी मृद जलसंधारण साखळी बंधारे, शेततळी या माध्यमातून संरक्षित सिंचनाच्या सुविधा निर्माण करणे.

३) सुक्ष्म सिंचनाचा वापर करून सिंचनाची कार्यक्षमता वाढविणे.

४) यांत्रिकीकरणाद्वारे उत्पादन खर्च कमी करून उत्पादकता वाढविणे.

५) शेतमाास योग्य भाव मिळविण्यासाठी नियंत्रित शेती, प्राथमिक कृषी प्रक्रिया व पणन सुविधा निर्माण करणे.

६) खाजगी क्षेत्राच्या सहभागातून सार्वजनिक खाजगी भागीदारी करून कोरडवाहू शेतीतील धोके कमी करण्याचा व्यापक कार्यक्रम हाती घेणे.

७) पीक विमा योजनेचे बळकटीकरण करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला व्यापक संरक्षण देणे.

८) कोरडवाहू तंत्रज्ञानाचा पीक प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून प्रचार व प्रसार करणे.

९) प्रशिक्षण, शेतीशाळा, अभ्यास दौरे यांच्या माध्यमातून मनुष्यबळांचे सबलीकरण करणे.

महाराष्ट्र राज्यातील हमखास सिंचन क्षेत्राखाली न येणारे क्षेत्र हे या अभियानाचे कार्यक्षेत्र आहे. महाराष्ट्रातील ३३ जिल्ह्यांतील ३५१ तालुक्यापैकी ३४७ तालुक्यामध्ये प्रत्येकी एका गावाची निवड करण्यात येणार आहे. एका गावात एका वर्षात किमान १ कोटी खर्च करणे अपेक्षित आहे. यावर्षी महाराष्ट्रात अवर्षण प्रवण क्षेत्रातील १५१ तालुक्यांतील गावांमध्ये या अभियानाची अंमलबजावणी सुरू होणार आहे.

या अभियानाचा लाभ सर्वच शेतकऱ्यांना मिळणार नाही. लाभार्थींमध्ये अल्प व अत्यल्प भूधारक, महिला व मागासवर्गिय शेतकऱ्यांना प्राधान्य दिले जाईल. जे शेतकरी, शेतकरी गटामध्ये सहभागी होवून गटधारीत उपक्रम राबवण्यास तयार असतील, जे शेतकरी मुलस्थानी जलसंधारण पद्धतीचा अवलंब करतील जे शेतकरी सुक्ष्म सिंचन पद्धतीचा अवलंबण्यास तयार असतील. अशा शेतकऱ्यांना कोरडवाहू अभियानाचा लाभ मिळणार आहे.

****

# शेती समस्या

**कु. ललिता शेलवटकर** बी.ए. भाग-३

भारत हा कृषी प्रधान देश आहे. इथे ८०% शेती निसर्गावर अवलंबून आहे. शेतीच्या समस्यामुळे आजचा शेतकरी भरभटल्या जात आहे. त्यामुळे खालील समस्यामुळे आजची शेती संकटात सापडली आहे. मोठ्या संकटांना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे.

१) निसर्गाचा लहरीपणा :-

निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती संकटात सापडली आहे. आपल्या भारतात ९० दिवस पडणारा पाऊस आज ३० दिवसावर आला आहे. वेळोवेळी न पडणाऱ्या पावसामुळे शेतकऱ्यावर मोठे संकट उभे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. अशा लहरीपणामुळे अन्नधान्याचा तुटवडा भासत आहे. या लहरीपणाला आपणच कारणीभूत आहो, कारण आपण ऐवढी जंगलतोड केली आहे. झाडाची कत्तल आपण करीत चाललो आहे. जंगले नष्ट करून तिथे मोठ-मोठे बंगले उभारत आहो. आपण आज जर जंगल तोड केली नसती तर, पावसाचा असा लहरीपरा आपल्याला बघायला मिळाला नसता. निसर्गाला जर टिकवायचे असेल तर आपल्याला देशात झाडाची संख्या वाढवावी लागेन. आपल्याला युवा पिढीना वृक्ष संवर्धन करण्यास प्रोत्साहन करावे लागेन. हि जर समस्या दुर झाली तर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उभा राहणार नाही.

२) कृषी कर्ज :-

सरकारनी शेतकऱ्यांना सबसिडी द्यायला पाहिजे कारण प्रत्येक वर्षी शेतकऱ्यांना जेमतेम पिक पाणी होते. नफ्याची शेती त्यांना दिसत नाही. बाहेरील कर्ज तोडता तोडता त्यांच्यापाशी शिल्लक काहीच उरत नाही. शेतकऱ्यांना ७५% कर्ज देवून त्यांना शेती करण्यासाठी प्रोत्साहन करावे. जेणेकरून शेतकरी सावकाराच्या दारी जाऊन आपल्या पायाचे उंभरठे झिजवणार नाही. त्यांना वेळेवर कर्ज न मिळाल्यामुळे शेतकऱ्याची शेती तसीच पडित राहते. कारण शेतीला लावण्याकरीता त्यांच्यापाशी काहीच उरत नाही. सरकारनी त्यांची व्यथा ऐकून त्यांना कर्ज मिळविण्याकरीता सुलभ नियम तयार करून द्यायला पाहिजे. सरकार जर शेतकऱ्याच्या पाठीशी खंबीर जर उभे राहीले तर शेतकरी कधीतरी नफ्याची शेती बघू शकेल. नाहीतर शेतकऱ्यांना एक वर्ष जरी नाही पिकले तर त्यांना ते कर्ज तोडता तोडता तिन वर्ष लागते. म्हणजे त्यांची परिस्थिती आहे तशीच राहते. तो पुढे पुढे काही जात नाही.

३) सिंचन :-

निसर्गाच्या लहरीपणामुळे एका पाण्याने शेतकऱ्याचे पिक हातचे निघून जाते. म्हणून आज भारतात गरज आहे ती हरितक्रांतीची. प्रत्येक शेतकऱ्यांना सिंचनाची सोय करून द्यायला पाहिजे. शेतकऱ्यापाशी सिंचनाची जर व्यवस्था असेल तर तो बारमाही पिकपाणी घेवु शकतो. त्याकरीता सरकारनी एक पाऊल पुढे नेऊन नद्या जोडणी करायला पाहिजे. आपल्या देशामुळे ७५% पाणी असेच वाहून जो. ते जर पाणी अडवून ठेवले तर त्यांचा उपयोग शेतकरीता चांगला होईल. शेतीला पाणी मिळाले तर शेती भरपूर

पिकेल. योजना राबवावी लागेल. गावातील नाल्याचे पाणी वाहून जाते. त्या गावातील प्रत्येक नाला सिमेंटनी बंधारा बांधून पाणी अडवायला जेणेकरून गावातील विहीरीची पाणी पातळी वाढण्यास मदत होईल. सरकारनी शेतकऱ्यांना पॅकेज न देता त्यांच्या शेतीकरीता सिंचनाची सोय करून द्यायला पाहिजे. जेणेकरून त्या शेतकऱ्याचे जिवनमान उंचावण्यास मदत होईल.

४) दर्जेदार बि-बियाणे :-

आज आपल्या देशामध्ये भरपूर कृषी विद्यापीठ स्थापन झाले आहे. तरी आपण परकिय देशाच्या बियाण्यावर अवलंबून असतो. आपल्या कृषी विद्यापीठामध्ये दर्जेदार बियाणे तयार करायला पाहिजे. तमुळे त्यांचा फायदा शेतकऱ्यांना मिळेल. आपल्याकडे कमी पाऊस पडतो. कमी पावसात चांगले उत्पादन देणाऱ्या जाती निर्माण करायला लागेन. त्याचा फायदा शेतकऱ्यांना होईल. आपल्या देशामध्ये कृषी विभागानी योग्य दर्जेदार बि-बियाणे निर्मार करण्याची गरज आज आहे. बियाण्याच्या चांगल्या जाती जर अस्तित्वात आल्या तर त्यांचा फायदा देशालाच होईल. त्यामुळे शेतीमधील उत्पादन क्षमता वाढेल आणि त्याचा फायदा नक्कीच शेतकऱ्यांना होईल.

५) शेतकऱ्याच्या मालाला किंमत :-

शेतकरी जे पिकवितो त्याचा फायदा खरचं शेतकऱ्यांना मिळतो का ? हि एक शोकांतिका आहे. शेतकरी काबाडकष्ट करून शेती पिकवितो. तो जेव्हा ते उत्पादन विकायला जातो तेव्हा व्यापारी वर्ग किमती खाली पाडून त्याच्या कडील माल कवडीमोलाने खरेदी करतो. आणि तोच माल व्यापारी वर्ग विकून स्वत: कोट्याधिस बनतो. खरंच शेतकऱ्यांना मालाची किंमत मिळते का ? यांच्याकडे कुणाचे लक्ष दिसत नाही. फक्त सरकार शेतकऱ्याच्या चुलीवर आपली भाकर भाजून घेतो. आज जर त्यांच्या मालाला चांगली किंमत मिळाली तर त्या चार पैशाचा फायदा त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकरीता होईल. पण याकडे कुणाचेच लक्ष राहत नाही. सरकार सुद्धा व्यापारी वर्गाची बाजू घेते. आज सरकारनी असे नियम करायला पाहिजे त्याचा फायदा शेतकऱ्याना होईल. शेतकऱ्यांना आपला माल थेट कंपनीला विकता यायला पाहिजे. दोघामधील दलाल हा जो दुवा आहे तो बंद करायला पाहिजे. नाही तर प्रत्येक जिल्हा लेवलवर एक अशी व्यवस्था करायला पाहिजे जेणेकरून शेतकऱ्यांना आपल्या मालाची प्रक्रिया तेथे तयार करता येईल. त्याचा फायदा थेट शेतकऱ्यांना मिळेल. असे जर झाले तर शेतकऱ्याची परिस्थिती सुधारण्यास वेळ लागणार नाही.

६) रासायनिक खताच्या भरमसाठ वाढलेल्या किंमती :-

आज रासायनिक खताच्या किमती गगनाला मिळाल्या आहे. शेतकऱ्यापाशी रासायनिक खत घेण्याकरीता पैसा नसतो. पण त्याकडे कुणाचे लक्ष नसते. रासायनिक खतावर शेतकऱ्यांना सबसिडी देणे गरजेचे आहे.

शेतकऱ्यासमोरील या शेतीच्या समस्या जर खत्म झाल्या तर शेतकरी पुन्हा जोमाने उभा राहिल. आणि पुन्हा श्रमाने शेतीमध्ये अन्नधान्याचे चांगले उत्पादन करेन व अभिमानाने जवान म्हणेल – 'जय जवान जय किसान '

***

# वृक्ष संवर्धन काळाची गरज

कु. लिखिता कुंभारे बी.ए. भाग-३

वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे !
वृक्षवल्ली आम्हा सोयरे !

वरील उक्तीवरून असे लक्षात येते की, केवळ मनुष्यजातीलाच नव्हे तर संपुर्ण जीवनसृष्टीला वृक्ष संपत्तीची गरज आहे.

जरी माणसाच्या मुलभुत गरजा अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण असल्या तरी या संपुर्ण मुलभुत गरजांची पुर्तता वृक्षांशिवाय होईल याची कल्पना देखिल आपल्या करता येत नाही. कारण, वृक्ष संपत्तीमुळे मानवजातीला तसेच प्राणी सृष्टीला जगण्यास अत्यंत महत्वाचा असा प्राणवायु म्हणजेच ऑक्सीजन हा वृक्षच आपल्याला देत असतो आणि अन्न, वस्थ व निवारा या माणसाच्या मुलभुत गरजाची पुर्तता वृक्षच करतो. आज, मनुष्याला निवाऱ्यासाठी लाकडाचा उपयोग होत असतो. तसेच उदरनिर्वाहासाठी मनुष्य वृक्षसंपत्तीवरच अवलंबुन आहे. वृक्षांशिवाय केवळ माणसाचेच नव्हे तर संपुर्ण जीवनसृष्टीचे अस्तित्व अशक्य आहे. याची जाणीव मनुष्याला असूनही आज मोठ्या प्रमाणात केवळ आपल्या गरजा भागविण्यासाठी वृक्षतोड करीत आहे.

Water, Water Everywhere,
But
No Water to Drink........

असे म्हटले आहे ते अगदी खरेच आहे. कारण मानवांनी आपल्या गरजांसाठी केलेल्या वृक्षतोडीमुळे परिणामत: आज पर्यावरणाचे संतुलन बिघडलेले आहे. पुर्वी पावसाचे आगमन एका विशिष्ट निश्चित कालखंडात येत असे. परंतु आज पर्जन्यवाटपात असमतोल असलेला आढळून येते.

भारत हा नैसर्गिक दृष्ट्या वैविध्यपूर्ण व संपन्न राष्ट्र म्हणून जगात भारताची ओळख केली जाते. परंतु आज जंगलतोडीचे प्रमाण इतक्या मोठ्या प्रमाणात वाढले आहे की, पुर्वी नैसर्गिक दृष्ट्या संपन्न असलेल्या भारताचे जंगलाच्या क्षेत्रफळाच्या दृष्टीने असलेले प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते. त्याचे दुष्परिणाम म्हणून मानवाला दुष्काळ, पर्जन्याचा असमतोलपणा, हरितगृह परिणाम इत्यादी अनेक नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागत आहे आणि यासाठी केवळ मनुष्यच जबाबदार आहे.

पृथ्वीला जीवनसृष्टीचे संतुलन राखण्यासाठी वृक्षांचा भुमिका अत्यंत महत्वाची आहे. आणि म्हणून वृक्ष संवर्धन हि आज काळाजी गरज आहे.

भारतामध्ये पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी जंगलाचे प्रमाण ३१% असावे असे सांगीतले जाते परंतु आज हे प्रमाण फक्त २१% आहे. यावरून आपल्याला वृक्ष संवर्धनाची गरज लक्षात येते. वृक्ष संवर्धन ही केवळ मनुष्याच्या सरंक्षणासाठी गरजेची नसून संपुर्ण पृथ्वीच्या संरक्षणाबाबत महत्वाची बाब आहे. म्हणून, आज, प्रत्येकाने वृक्ष संवर्धनाला प्राधान्य दिले पाहिजे.

"Save Tree,
Save Yourself"

हा प्रत्येक मानवाचा नारा असला पाहिजे. त्यासाठी प्रत्येक मनुष्याने स्वत:ची जबाबदारी म्हणून वृक्ष संवर्धनाचे मोलाचे कार्य हाती घेतले पाहिजे.

आज प्रत्येक देश स्वत:ला विकसित करण्यासाठी विविध उपाय करीत आहे. त्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिकरणाला महत्व दिल्यामुळे कारखाने उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात जंगलतोड करण्यात आली.

औद्योगिकरणामुळे रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातून शहराकडे मनुष्याचा कल वाढला. शहरीकरणासाठी पर्यावरणासाठी अत्यंत महत्वाचा अशा जंगलाची तोड करण्यात आली. औद्योगिकरण, कारखाने, शहरीकरण यासाठी जंगलतोड करण्यात आल्याने तसेच त्या जागावर कारखाने उभारल्यामुळे मोठ्या प्रमाणात विषारी वायु वातावरणात सोडल्या गेले व कारखान्यातून दुषित पाणी शुद्ध अशा नदित सोडल्यामुळे वायुप्रदुषण नव्हे तर जलप्रदुषण सुद्धा आहे.

हवेत कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण वाढल्यामुळे तसेच त्याचा परिणाम म्हणून वातावरणातील ओझोन थर कमी झाला व त्याचा दुष्परिणाम म्हणून सुर्यापासून होणारे हानिकारक किरणे सतत पृथ्वीवर येत आहे. त्यापासून मनुष्याला विविध विचारीण सारख्या व्याधीचा सामना करावा लागत आहे.

मनुष्याने केवळ आपल्या स्वार्थासाठी निसर्गाचा वापर केला आहे. परंतु ते स्वार्थ पुर्ण करण्यासाठी मानवाने निसर्गाचा पुर्ण समतोलच बिघडविला आहे. आज अशी वेळ येत की आपली जननी पृथ्वी विनाशाच्या दारात जात आहे. ह्या मोठ्या संकटाला टाळण्यासाठी वृक्षच पर्याय आहे आणि म्हणून वसुंधरेच्या संरक्षणासाठी उपाययोजना केल्या पाहिजे कारण -

"Without Forest
Mankind is Nothing"

मानवाने Charity begain at home या उक्तीप्रमाणे केवळ स्वत:ची जबाबदारी म्हणून वृक्ष संवर्धनाचे कार्यात आरंभ करून वसुंधरेचे संरक्षण केले पाहिजे.

वृक्ष संवर्धन आज काळाची गरज आहे. कारण वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पुर्ण करण्यासाठी वृक्षांची जोपासना करणे हे महत्वाचे आहे. दिवसेंदिवस होणाऱ्या प्रदुषणामुळे वृक्षांवर मोठा परिणाम पडतो. वृक्षांचे उपयोग ही बाब सांगायची आवश्यकता नाही आहे. कारण सर्वच चांगल्या पद्धतीने त्याशी अवगत आहो. Photosynthesis प्रक्रियेद्वारे वृक्ष मानवासाठी प्राणवायु म्हणजेच Oxygen सोडतो, आणि घातक स्वरूपाचा कार्बन डाय-ऑक्साईड Carbon dioxide वायु स्वत: आत्मसात करतो हा या वृक्षांचा प्रमुख गुणधर्म आहे. या जगात आपण मानवाच्या अस्तित्वासाठी आपल्या धर्मासाठी आणि व्यक्तीगत महत्वाकांक्षेसाठी लढतो. पण वास्तविकता आपणास मानवता हाच आपला धर्म आहे. आपणास जीवन देणारी ही सृष्टी जीचे आपण लेकरे आहे त्यांचा कर्णधार हा मात्र वृक्ष आहे हे तितकेच सत्य आहे. पण तरीही आपण आपल्या जन्मदातेस व कर्णधाराच्या अस्तित्वासाठी मात्र आपण लढत नाही ही

शोकांतिका आहे.

''झाडे लावा, झाडे जगवा''

हा उपक्रम कित्येकदा राबविण्याचा प्रयत्न झालेला आहे. पण तो पुर्णत: सफल झाला असे आपणास म्हणता येत नाही. का ? वृक्षांचे संवर्धन करणे हे आपले नुकतेच आपले काम नाही मात्र समोर जीवंत राहण्यासाठी पृथ्वीला वाचविण्यासाठी आज ती काळाची गरज बनली आहे.

वृक्ष संवर्धन काळाची गरज हा विषय फक्त चर्चात्मक दृष्टीकोनातून पाहला जातो. परंतु प्रत्यक्षात त्याची जोपासना होते असे कशावरून. मानवाचे जीवन हे काही वर्षापुरतेच असते पण आपण जर आपल्या आयुष्यात एका जरी रोपट्याला वृक्ष बनविले असेल तरी आपल्या आयुष्याच सार्थक होईल असे तरी मला वाटते. वृक्षांना आपल्या सृष्टीत स्थान देऊन आपण आपल्याच भावी पिढीच्या भविष्याला संरक्षण देत आहे.

आज संगणकयुगीन काला झालेला आहे. मानव प्रत्येक क्षेत्रात उत्तम कामगीरी करतो. पण इकडे मानवाच्या गरजा पुर्ण करण्यासाठी मानव प्रदेश व्यापत व्यापत आपला विस्तार करीत आहे. ज्याचाच परिणाम मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड आज मानवाची ७०% गरजा हे वृक्षांमार्फत पुर्ण केल्या जाते. आणि त्यासाठी वृक्षांची बेसुमार कत्तल केली जाते. ज्याचा पर्यावरणावर अतिशय घातक स्वरूपाचा परिणाम पडत आहे. ज्याप्रमाणे वातावरणाचे, ऋतुचे, मौसमी वाऱ्याचे चक्र चालायचे ते मात्र विस्कळीत झाले आहे. त्यामुळे अनियमित पाऊस पडतो, अचानक तापमानात वाढ होते. याचाच परिणाम मोठ्या प्रमाणावर शेती या उद्योगावर होतो. निसर्गाचा असमतोल हा वृक्षांच्या कमतरतेमुळे वृक्ष निसर्गाचा समतोल कशाप्रकारे राखतो ते आपणास चांगले कळते. वृक्ष जमिनीची धुप थांबवितात, जमिनीतील पाण्याची पातळी बरोबर ठेवतात त्यानंतर वृक्ष पावसाचे ढगे ओढून घेतात. म्हणून पाऊस हा जास्त वृक्ष व अरण्ये असलेल्या जंगलात पडतो. आणि पाऊस बरोबर पडला तर पर्यावरणही प्रदुषणमुक्त होण्यास मदत होते. म्हणून या बाबत वृक्ष महत्वाची भूमिका बजावतात.

मानवाच्या विकास हे चूकीचे नाही आहे. पण वृक्षांचे पतन ही विचार करण्याची बाबत आहे. आज जर आपणास आवश्यकता म्हणून एखाद्या वृक्षाला नष्य करावे लागले तर त्यांच्या बदल्यात त्याची दुप्पट झाडे लावणे हे आपले प्रमुख कर्तव्य आहे. झाडे लावणेच नाही तर त्याला वाढवून त्याची जोपासना करणे हे सुद्धा तितकेच महत्वाचे.

वृक्षांची लागवड मोठ्या प्रमाणात व्हावी म्हणून अनेकानेक उपक्रम राबवायला पाहिजे जसे कुठल्याही समारंभात भेट म्हणून कुठली वस्तु नाही तर रोपटे द्या. शाळेत किंवा कुठल्याही कार्यक्रमात स्मृती म्हणून एक रोपटे लावा. सनावाराला तर वृक्ष लाऊन आपले घर-अंगण व परिसर सुशोभित करा. आपण दरवर्षी नविन वर्ष चांगल जावं म्हणून आपण संकल्प करत असतो. तसाच पुन्हा एक संकल्पनाची सुरूवात करा. तुम्ही आपण फक्त सुरूवात करून आणि त्याला आपल्या प्रयत्नांची साथ देऊ या म्हणजे नक्की यश मिळेल. वृक्षांमुळे पृथ्वी खुप आनंदी होईल. आणि आपणही आनंदी राहु. आज वेल प्रत्यक्षात सहभागी व्हायची आहे. कारण पृथ्वीला दिर्घकाळ जगविण्यासाठी वृक्षच पुरेसे आहे.

***

# पशुपक्ष्यांच्या हालचालीवर बळीराजाचे लक्ष

**प्रकाश चिडाम** बी.ए. भाग ३

सध्या मे हिटच्या तडाख्यात सापडलेल्या जीवसृष्टीला पावसाची प्रतीक्षा आहे. मृग नक्षत्रापासून पावसाला प्रारंभ होतो. पण पक्षी महिन्याच्या मध्यानंतरच पावसापासून बचाव करण्यासाठी झाडावर आपली घरटी बांधण्याच्या तयारीला लगातततात. पक्ष्यांची घरटी बांधण्याची वेळ आणि पद्धती यावरून पावसाचा अंदाज फार पूर्वीपासून शेतकरी घेत असतात. त्यामुळे पक्ष्यांचे घरटे आणि हालचालीवर बळीराजा लक्ष ठेवून आहे.

शेतकरी शेतीच्या मशागतीसोबतच पशुपक्ष्यांच्या हालचालीवर नेहमीच बारीक लक्ष ठेऊन असतो. त्यांच्या हालचालीवरून पावसाचा आणि एकंदरीतच निसर्गाचा अंदाज बांधला जातो. त्यातील बहुतांश अंदाज अचूक ठरत असल्याचे शेतकरी सांगतात. टिटवी पक्ष्यांने नदीनाल्याच्या काठापासून अंडी दूर ठेवली. तसेच कावळ्यांनी आपली घरटी झाडाच्या मध्यावर बांधली तर पावससाळा जास्त होईल, असे संकेत असतात. सध्या पक्ष्यांनी घरटे बांधण्याची लगबग सुरू केली असून, निवारा व अंडी ठेवण्याची व्यवस्था केल्या जात आहे. घरट्याच्या उंचीवरून पाऊस किती येईल याचा अंदाज बांधला जातो.

कावळ्याच्या घरटी बांधण्याच्या हालचाली हा पावसाच्या आगमनाचा शुभ संकेत समजल्या जातो. कावळ्याने घरटे झाडाच्या शेंड्यावर बांधल्यास पावसाळा असमाधानकारक, मध्यभागी तयार केल्यास पाऊस समाधारनकारक समजण्यात यातो. या सोबतच निंबाच्या झाडांना जास्त प्रमाणात निंबोळ्या लागल्या तर हंगाम चांगला येईल, असा तर्कही अनुभवी शेतकरी देतात. तसेच सुरगण हा पक्षी घरटी बांधण्यात तरबेज असतो. त्याने जर भरपूर घरटी बांधली तर पाऊस जास्त येईल असे समजले जाते. पक्ष्यांना वातावरणाचा अंदाज दूरवरून येत असतो. परंतु शेताभोवतालची झाडेच सध्या तोडल्या जात असल्याने शेत शिवारात पक्ष्यांची घरटी पाहायला मिळणे दुरापास्त झाले आहे.

✡☪

*पर्याप्त भोजन के बिना भारत मे मानवीय कल्याण, वृध्दी, सामाजिक न्याय और लोकतंत्र की स्थापना आदी आशाये व्यर्थ है।*

*❊ भारतीय नियोजन आयोग*

# सहकाराच्या माध्यमातूनच शेतीचा विकास शक्य

**सचिन सोगे** बी.ए. ३

भारत सरकारने १९९१ साली स्वीकारलेल्या नविन आर्थिक धोरणामुळे भारतातील सहकारी अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय दर्जाची समजून तिचा अभ्यास करण्यासाठी केंद्र सरकारने आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या तज्ज्ञांची जी समिती वैद्यनाथन यांच्या अध्यक्षतेखाली गठित केली, त्या समितीने भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा किंचितही अभ्यास न करता आपल्या शिफारशी लादल्या आणि ग्रामीण भागातील कृषी पतपुरवठ्याचा आत्मा समजल्या जाणाऱ्या प्राथमिक सेवा सहकारी संस्थांची वाट लावण्याचे काम केले.

परिणामी सहकारी अर्थव्यवस्थेचे जे विलोभनीय दर्शन ग्रामीण भागातून होत हो ते आता पुर्णपणे नष्ट झाले आहे. शासन आणि शिखर सहकारी संस्था आपल्या संलग्न संस्थांकडे आता लक्ष द्यायलाही तयार नाहीत. राज्य सहकारी बँक, दूध सहकारी महासंघ, राज्य भूविकास बँक यांच्यावर प्रशासक नेमून शासन त्यांच्या मालमत्तेची विल्हेवाट कशी लावता येईल याकडेच आता लक्ष देत आहे. शेतकरी कर्जमाफीचे पॅकेज जाहीर करून शेतकरी कर्जातून मुक्त होत नाहीत. मात्र जिल्हा बँका, पतसंस्था, सावकार यांना मात्र अशा पॅकेजचा भरपूर फायदा मिळाला आहे. ९७ व्या घटनादुरूस्तीच्या नावाखाली आधीच कमकुवत असलेल्या सहकारी संस्था मोडकळीस आणल्या आहेत.

भारताच्या एकुण उत्पन्नात शेतीपासूनच्या उत्पन्नाचा वाटा ६५-७० टक्के आहे. ग्रामीण भागातील विविध कार्यकारी संस्था हा सहकारी चळवळीचा पाया होय. हा पायाच आता नेस्तनाबूत झाला आहे. सहकारी चळवळ ही निष्ठेवर आधारलेली चळवळ आहे. भारतातील ७० हजार खेड्यातून वास्तव्य करीत असलेल्या सामान्यजनांचे प्रगत साधन म्हणून आपण सहकारी अर्थव्यवस्थेवर अवलंबून आहोत, अशी जाणीव त्यावेळी असल्याने संपूर्ण शेतकरी वर्ग तेव्हा संघटित झाला होता. सहकारी अर्थव्यवस्थेचा विकास व्हावा, ती विविधांगी व्हावी म्हणून हरतऱ्हेचे नवनवीन उपक्रम सुरूवातीच्या काळात हाती घेण्यात येत असत. अशा प्रयत्नातूनच आशिया खंडातील सहकारी तत्वावरचा पहिला सहकारी साखर कारखाना उभारला गेला. शेतकऱ्याला कारखानदार करण्याचा हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर सहकारी चळवळीने चांगलीच उभारी घेतली व त्यातूनच क्षेत्रात प्रक्रिया उद्योग उभे राहू शकले.

सहकारी उद्योग उभारणीमध्ये वैकुंठभाई मेहता व डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचे अथक प्रयत्न होते. त्यापायीच शेती उद्योगाला महत्व आले व त्याला कारणीभूत प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाच होत्या. विशेष म्हणजे सन १९४५ च्या सुमारास वैंकुठभाई मेहता शिखर सहकारी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक असताना प्रवरा सहकारी साखर कारखान्याचे मुख्य प्रवर्तक विठ्ठलराव विखे पाटील यांनी दि. १७ डिसेंबर १९४५ च्या प्रथम सभेत डॉ. धनंजयराव गाडगीळ यांची अध्यक्षपदी निवड करून कारखान्याचे अध्यक्षपद स्वत:कडे घेतले. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा पाया मजबूत का आहे, याचा प्रत्यय या उदाहरणावरून येतो. कालगणिक सहकारी चळवळीचा प्रवाह सर्वस्पशी होण्याऐवजी अवरूध्द होत गेला. त्यामुळे निर्माण होणाऱ्या नवनवीन प्रश्नांना साहजिकच सामोरे जावे लागत आहे. या प्रश्नांची उत्तरे शोधणे हे सहकारी

संघटनेविषयी ज्यांना आस्था आहे त्यांचे कर्तव्य आहे.

शासन, शिखर सहकारी संस्था, सहकारविषयक नियुक्त केलेल्या विविध समित्या यांची जागा आता आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडल्या गेलेल्या प्रामाणिक, अभ्यासू, निष्ठावान युवकांनी घेतली पाहिजे. सहकारी चळवळीचा विकास होण्यासाठी नवरक्त, नवा विचार, नवसंशोधन याची नित्य भर पडावयास हवी. जेणेकरून या चळवळीला नवी दिशा मिळेल. ही गोष्ट सातत्याने घडावयास हवी. कोणतीही चळवळ अशा प्रयत्नांमुळेच वर्धिष्णु होत असते. दुर्देवाने दिशा देण्याचे काम आज थांबलेले आहे. कुंठित मतीच्या मर्यादित कुवतीच्या स्वार्थाध नेतृत्वाच्या हाती आता ही चळवळ गेली आहे. त्यामुळेच आता स्वच्छ प्रतिमा असलेल्या नवतरूण युवकांनी त्यांची जागा घेणे क्रमप्राप्त आहे. सहकारी समाजरचनेत देशातील श्रमजीवी व शेतकरी हा देशाच्या औद्योगिकरणाच्या प्रक्रियेत मालक व्हावा ही जी मुळ धारणा आहे ती प्रत्यक्षात आणण्याचे सामर्थ्य या चळवळीत आहे. पण त्यासाठी विधायक व नैष्ठीक कार्यकर्त्यांची संघटना निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. लहान लहान शेतकरी सभासदांनी हौसेने संघटना बांधून पदरचे पैसे घालून सहकारी चळवळ कार्यान्वित ठेवली आहे. परंतु आताचे सत्ताधिकारी, पदाधिकारी सभासदांना पिळू लागले आहेत आणि आपल्या व्यतिरिक्त अन्य सक्षम सहकारी कार्यकर्ता तयार होऊ  द्यावयाचा नाही. अशा कारवाया करण्यात मशगुल आहेत. विधायक कार्याने अधिकारपद मिळविण्याचा जर कोणी प्रयत्न करू लागला तर त्याला खच्ची करायचे अशी प्रवृत्ती आज महाराष्ट्रात सर्व सहकारी संस्थांमध्ये वाढीस लागली आहे.

शासनाने याला पायबंद घालायला हवा. पूर्वी प्राथमिक सेवा सहकारी संस्थांकडूनच शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाला माफी मिळत असे. त्यानंतर नागरी सहकारी पतसंस्थांकडून शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जालाही माफी मिळू लागली. १९५४ साली नियुक्त केलेल्या गोरवाला समितीने आपल्या अहवालात धंदेवाईक सावकार आणि शेतकी सावकार यांचेकडून शेतकरी अनुक्रमे ४४ टक्के व २४ टक्के कर्ज घेत होता तर सहकारी संस्थेकडून केवळ तो तीन टक्केच कर्ज शेतीसाठी घेत होता, असा निष्कर्ष काढला. सावकारी पाशातून शेतकऱ्यांची सोडवणूक करण्यासाठी १९०४ चा सहकारी कायदा करण्यात औला. आता मात्र, सावकारांनाही शेतकऱ्यांना कर्ज देण्याचा खुला परवाना मिलाला  असून त्यांनी दिलेल्या कर्जालाही माफी मिळ शकेल  असा निर्णय झाला. यामध्ये शेतकऱ्यांचे काहीही भले होणार नाही उलट तो कर्जबाजारी होत जार्सल आणि त्याचा फायदामात्र सावकार आणि अन्य संस्था यांना मिळेल. खरे, तर, शासनाचे उद्दिष्ट शेतकऱ्यांची कर्जातून कशी सोडवणूक करावी, हे असायवयास हवे. उलट त्यांचेवर  कर्जाचा डोंगर कसा उभा राहील असा प्रयत्न होताना दिसत आहे.

भारताच्या कृषिप्रधान अर्थव्यवस्थेची सांगड आंतरराष्ट्रीय किंवा जागतिकीकरणाशी घालू नये. शेती हे असे क्षेत्र आहे की ती केवळ सहकाराचा अंगिकार करूनच पुष्ट करता येते. वंशपरंपरागत शेती ही सामुदायिकरीत्याच केली जात असे आणि आजही केली जाते. या ठिकाणी सामुदायिक या शब्दाचा अर्थ घरातील सर्व कुटुंब शेतीवर राबत असते. शेतीचे उत्पन्न राष्ट्रीय उत्पन्न म्हणून धरले जाते. मग शेतकऱ्यांची दुरावस्था का ? कारण शेतकऱ्याचे मूळ दुखणे होते तिथेच आहे पण त्याचा विचार मात्र कुठेही होताना दिसत नाही व हीच तर खरी शोकांतिका आहे.

✡ ☪

# शेतकरी आत्महत्या ही जागतिक समस्या

**कैलास पिंपळापुरे** बी.ए. भाग-१

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे पडसाद आता आंतरराष्ट्रीय परिघामध्येदेखील उमटू लागले आहेत. भारतासारख्या विकसनशील देशांपुरती ही समस्या मर्यादित राहिलेली नाही, तर प्रगत राष्ट्रांमध्येही एक मोठे आव्हान म्हणून शेतकऱ्यांच्या आत्महत्येची समस्या पुढे आली आहे. राष्ट्रांच्या सीमा जरी विभागलेल्या असल्या तरी शेती व शेतीपुढील प्रश्न मात्र बहुतांशी सगळीकडे एकसारखेच आढळतात, ही वस्तुस्थिती आहे. झपाट्याने बदलत असलेली जागतिक अर्थव्यवस्था व मुक्त व्यापाराच्या पृष्ठभूमीवर शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांना स्थैर्य आणि ऊर्जितावस्था प्राप्त करून देण्याचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. ही समस्या सोडविण्यासाठी शेतकरी महिलांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या विषयावर जगातील नामवंत कृषितज्ज्ञ, शेतकरी, अभ्यासक यांच्या विचारांचे आदानप्रदान व्हावे, सखोल चर्चा व्हावी आणि पुढची दिशा व प्राधान्यक्रम निश्चित करावेत, या उद्देशाने काही वर्षापूर्वी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचा आंतरराष्ट्रीय शेतकरी परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. 'शेतकरी महिलांचे सक्षमीकरण आणि किफायतशिर तंत्रज्ञान' हा चर्चेचा विषय होता. भारतासोबतच ऑस्ट्रेलिया, अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, फ्रान्स, इस्त्राईल, केनिया, तैवान, टांझानिया, युगांडा, उझबेकिस्थान आदी देशांमधून शेतकरी, संशोधक, अभ्यासक या परिसंवादात सहभागी झाले होते. या मंडळींनी आपापल्या क्षेत्रातले अनुभव आणि अभ्यास खुलेपणाने मांडले. त्यातून एका नव्या विचारमंथनाची प्रक्रिया सुरू झाली.

शेती हा जगातला सर्वात मोठा व्यवसाय असून, त्यामध्ये ४० टक्क्यांपेक्षाही जास्त वाटा हा लहान शेतकऱ्यांचा आहे. ग्रामीण भागात भौतिक सुखसुविधा पर्याप्त प्रमाणात उपलब्ध नसतांनासुद्धा अन्न पिकविण्याचे महत्वाचे कार्य शेतकरी करत आहेत, आफ्रिका व आशिया खंडामध्ये महिलांचा शेतीतील वाटा पुरूषांच्या बरोबरीने आहे, अशी निरीक्षणे 'फार्मस डायलॉग इंटरनॅशनल' या शेतकऱ्यांच्या आंतरराष्ट्रीय संघटनेचे अध्यक्ष आणि ऑस्ट्रेलियातील शेतकरी फिल जेफरीस यांनी मांडली. संयुक्त शेतकरी कुटुंब पद्धतीने केलेले शेतीमुळेच जगात अन्नधान्य तथा पोषण आहार पिकविला जात असून, महिलांनी पुरूषांच्या खांद्याला खांदा लावत दिलेले योगदान निश्चितच दखलपात्र आहे. खरी समस्या अनिश्चित पर्जन्यमान आणि उत्पादन खर्च व प्रत्यक्षात, मिळणारा भाव यांतील तफावत ही आहे. उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाल्यास शेतकरी शेती व्यवसाय अधिक जोमाने करू शकेल असे त्यांनी नमूद केले. ऑस्ट्रेलियातील शेतकरी वर्गाच्या व्यथा मांडतांना जेफरीस यांनी स्वत:चे उदाहरण

देऊन सांगितले, की जास्त पावसाच्या प्रदेशातील शेतकरी सुखी समृद्ध असून, कमी पावसाचे प्रदेशातील शेतकऱ्यांना आपल्याकडील शेतीसोबतच मेंढ्यासुद्धा विकून परिवार जगविण्यासाठी संघर्ष करावा लागतो. सातत्याने अनेक वर्षे अवर्षण झाल्याने बँकाकडे कर्जफेडीसाठी गहाण ठेवलेली त्यांची जमीन बळजबरीने ताब्यात घेण्यात येते. यामुळे ऑस्ट्रेलियातसुद्धा शेतकरी आत्महत्यांना सुरूवात झाली असून, या बाबीकडे जेफरीस यांनी लक्ष वेधले.

'थिंक ग्लोबली अॅक्ट लोकली' या विचाराने प्रत्येक देशाने आपले कृषी विषयक धोरण ठरवून त्या माध्यमातून शेतकऱ्यांचे हीत साधणे ही काळाची गरज असल्याचे मत 'फार्मर्स डायलॉग इंटरनॅशनल' चे सचिव आणि इंग्लंड येथील शेतकरी जीम विगन यांनी मांडले. आंतरराष्ट्रीय पटलाचा विचार करता, शेतकरी समस्या जगभर कमी–जास्त प्रमाणात सारख्याच आहेत. शेती मशागतीवरील अधिक खर्च, शेतीमालाला मिळणारा अत्यल्प व अनिश्चित दर, बदलते वातावरण, कीडनाशकांचा वारेमाप वापर आणि सर्वात महत्वाचे म्हणजे राजकीय अनास्था इत्यादी समस्या जगातील अनेक देशांत ठळकपणे जाणवतात. शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करताना किंवा निर्णय घेताना शेतकऱ्यांचे मतसुद्धा विचारात घेतले जात नाही, ही सर्वात दुर्भाग्याची गोष्ट आहे, असेही विगन यांनी सांगीतले. अमेरिकेत जवळपास ४०० दुग्धशाळा बंद झाल्या आहेत. दूध खरेदी दरात घट झाल्यामुळे ही स्थिती ओढवली, असे त्यांनी स्पष्ट केले. उत्पादन खर्च आणि बाजारभाव यांतील अंतर समजून घेत कमी खर्चात जास्त उत्पादनाचे तंत्रज्ञान आता आम्हाला अवगत करावेच लागेल असेही विगन म्हणाले.

या परिषदेमध्ये इंग्लंडमधून आलेल्या मोनिका हॉवर्थ या शेतकरी महिलेचे अनुभवकथन चटका लावून गेले. हॉवर्थ यांच्या तरूण शेतकरी मुलाने शेतीतील आर्थिक नुकसानापायी काही वर्षापूर्वी आत्महत्या केली. सफरचंदाच्या २६ वाणांसह इतरही फळपिकांच्या विविध जातींचे भरघोष उत्पन्न घेऊन शेतातूनच मालाची विक्री करणाऱ्या या कुटुंबाचे सर्वकाही सुरळीत चालू असतानाच एक दिवस त्याच्या मुलांने स्वत:चे आयुष्य संपवले. या घटनेने हावर्थ कुटुंब हादरून गेले. त्यांच्या जीवनाला वेगळीच कलाटणी मिळाली. हे कुटुंब तेव्हापासून शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी दिवसरात्र झटत आहेत. शेतकरी गटाच्या माध्यमातून शेतकऱ्याच्या सक्षमीकरणासाठी व आत्महत्या रोखण्यासाठी मार्गदर्शन करण्यासाठी कंबर कसली आहे. महिलांच्या गटाने वैफल्यग्रस्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी विविध उपाययोजना हाती घेतल्या आहेत. त्याचे सकारात्मक परिणाम आढळले असल्याचे निष्कर्ष मोनिका हॉवर्थ यांनी मांडले. या अध्ययनातून इंग्लंडमधील वैफल्यग्रस्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यास काही प्रमाणात यशप्राप्ती झाल्याचे त्यांनी सांगीतले. असेच गट विदर्भात स्थापन करण्यासाठी त्यांनी विदर्भातील काही आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांची प्रत्यक्ष भेट घेतली. तसेच विदर्भातील महिला शेतकऱ्यांना शेतकरी महिला गट स्थापन करण्यासाठी महत्वापूर्ण मार्गदर्शन केले.

शेतकरी आत्महत्या करण्यापूर्वी त्याच्या वागणूकीत होणारे बदल याविषयी अमेरिकेतील मानसोपचार तज्ज्ञ जेनी हंटर यांनी तपशिलवार माहिती दिली. त्यांच्या मते सदर मनुष्य शेवटचे५-६ तास बहुतांशी स्वत:ला एकटे व परिवारापासून अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न करतो, तो अबोल तसेच शांत राहतो, अन्न पाण्यावरील त्याची इच्छा कमी झालेली आढळते. अशा व्यक्तीशी चर्चा केल्यास तो चिडचिड करतो किंवा तेथून निघून जातो. उपरोक्त निरीक्षणे परिवारातील महिलांनी लक्षपूर्वक टिपली आणि योग्य वेळी खबरदारी घेऊन हालचाल केली तर आत्महत्या रोखणे शक्य आहे. संबंधित व्यक्तीला वेळीच सावरणे गरजेचे असते, असे हंटर यांनी नमूद केले. हंटर यांच्या मते महिलांचे निरीक्षण गट(वॉच ग्रुप) बनवून घरातील पुरूषांच्या हालचाली टिपल्यास आत्महत्या रोखण्यास मदत होते.

टांझानिया येथून आलेल्या महिला शेतकरी ज्युलीयाना स्वै यांनी महिलांनी शेतीपूरक व्यवसायाचे धडे घेऊन कुटुंबाला आर्थिक पाठबळ देण्याचे आवाहन केले. त्यांनी टांझानिया येथे महिलांचे ३० हून अधिक स्वयंपूर्ण गट तयार केले आहेत. 'आपल्या नावाचे कुंकू आम्हाला प्रेरक आहे, आपण भले तर कुठलेही काम करू नका; पण आत्महत्येसारख्या पळपुटेपणाचा निर्णय घेऊन आम्हाला विधवा करू नका, आम्ही स्वत: मेहनत करून आपणास व कुटुंबीयास पोसण्यासाठी समर्थ आहोत', असा संदेश या महिलांनी पुरूषांना दिला असल्याचे त्यांनी नमूद केले.

## निष्ठा

वारकऱ्याचा नेम चुकंल वारीचा
पण माझ्या बापाचा नेम चुकत रानात जायचा

गाव पहाटेचं स्वप्नात असतं
तेव्हा बाप असतो रानात
व्यवहारी जगातल्या प्रश्नांपासून
आटिंग्या वनासारख्या तो शेकडो मैल दूर
उगवतं ते माझं आणि
सापडतं ते दुसऱ्याचं अशी त्याची नीती

जगणं मातीमोल व्हायची वेळ आली तरी
कधीच कमी झाली नाही
त्याची मातीवरची निष्ठा

परिस्थितीला रेड्यासारखी टक्कर द्यायचं बळ
मातीनंच दिल असावं त्याला
'पेरायला आणि दारं मोडायला आलं की
सगळ बैजवार होतं' अशी त्याची शिकवण


मी रानाबरोबर माणसं पेरायला शिकलो
आता रानात पीक मावता मावत नाही
पण माणुसकी मात्र उगवता उगवत नाही

****

कु. स्नेहा सुरकार
बी.ए. भाग-१

# CAUSES AND SOLUTIONS OF FARMERS' SUICIDE AND FIALURE LAND

**Assit. Prof. Nitesh N. Telhande**
(Department of English)



A Farmer is a person engaged in agriculture, raising living organisms for food or raw materials. The term usually applies to people who do some combination of raising field crops. A farmer might own the farmed land or might work as a labourer on land owned by others, but in advanced economics, a farmer is usually a farm owner, while employees of the farm are known as farm workers, or farmlands. In developed nations a farmer is usually defined as someone with an ownership interest in crops or livestock, and who provides land or management in their production.

A farmer is the most important man in the world, without farmer, there is no work in the farm. And Indian 80 percentage people are depending on the farm means maximum people work in the farm. Hence, India is called as Agriculture Country. Because, we get raw material from farm as well as food, fruits, furniture, wood, shelter, clothes etc.

In Ancient era, Farmers were happy, delight. They were satisfaction to work in the farm. They celebrated festivals (Diwali, Holi, Pola, Dasara) very well. They live in joined family and work together. No one was unhappy, sorrowful, because they were spirit confidence to hard work in the farm.

In Post-modern era, Farmers are not happy, because day by day prize of things are being increased in the market. Hence, Farmers can not purchase domestic things, which are need for livelihood. In today, farmer is worry, unhappy, irritate, he can not take proper decision for family. All members of family are depend on family, thatswhy, they do not get enough food, cloth and money. Some sons of famers became terrorist, naxalist also lack of job. They are unemployment due to lack of education. They have lot of tension, they do not have money, they became under the debt. Hence, farmer commits suicide.



**Following causes are responsible for Indian farmers' suicides and failure lands;**

- Agriculture is unorganized activity today.
- Most farms are small and economically unfeasible.
- Middle men and economic exploitation of famers.
- Government program do not reach small farmers.
- Failure of crops.
- Family problem.
- Quarrel between husband and wife.
- Uneducated.
- High indebtedness and exorbitant interest rates.
- Banker deceives to farmer.
- Problem of Nature.
- Less crops due to lack of rain.
- To take maximum tax of land. etc.

These reasons are responsible for farmers' suicide.

**Solutions on farmers' suicide or failure lands as following;**

- Farmers and Government should take care properly nature and trees.
- Agriculture officer should guide to farmer to increase crops.
- Government should give education to them.
- They should solve their family problem to concern each-other.
- There is need of motivation and confidence.
- New Technology should use to increase crops. Need to modernize agriculture.
- Banking should give crop loan to farmer.
- Government finds out solution to stop Global Warming.
- Farmers do not waste money in marriage or other traditional festival.
- State Government should give package for farmer.
- To take multiple crops.
- To implicate special agricultural zone.
- Need for better water management.
- Encourage the farmers to adopt allied activities like dairy, fishery, poultry etc. with farming activities.
- Adoption of upgraded technology input long with provision of infrastructure inputs like power at subsidized cost, supply of inputs like seeds, fertilizers, tractor and credit provision through all nationalized banks.
- Arrangements of marking/ forward linkages/ contract farming to sell their produce at remunerative prices.

If these facilities are given to farmers they may achieve self-sufficiency in agricultural production. There is need for major review of agricultural policy to meet the changing need of both produces and consumers. We know, whole farm is depending on farmers. They work in the farm. And we can get shelter, food, cloth. If Government finds out these problems and give proper facilities to them, really the condition of farmer and suicide can stop. We should help to farmer develop their farm, because farmer is pillar of nation.

**Lal Bahadur Shastri says**, "Jay Jawan, Jay Kisan".

****

# वर्धा जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या - कारणे व उपाय

प्रा.डॉ. गणेश एन. बहादे समाजशास्त्र विभाग

शेकडो वर्षांपासून शेती व्यवसाय शेतकरी करीत आला. पूर्वीच्या काळात आधुनिक तंत्रज्ञानाचा व सुधारित बि-बियाणांचा व रासायनिक खतांचा वापर नसतांनाही शेणखत व घरगुती बि-बियाणे यांच्यामुळे शेती लागवडीचा खर्च अल्प स्वरूपात होता. मशागतीसाठी बैलांचा वापर करीत होता. तेव्हा कर्जबाजारीपण पासून बराच दूर होता. ८०% शेतकरी सुखी आणि संपन्न होता. नोकरशाही दुय्यम होती, शेतीचा दर्जा प्रथम होता. एकत्र कुटुंब पद्धती होती. परंतु आधुनिक काळात शेतकऱ्यांची चहुबाजुने कोंडी होत असून तो व्यवस्थेचा बळी ठरत आहे.

२००६ मध्ये वर्धा जिल्हा शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून घोषित झाला आहे. २००१ पासून डिसेंबर २०१५ पर्यंत जिल्ह्यात १३११ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. जिल्ह्यात २००१ पासुनच्या शेतकरी आत्महत्याची नोंद आहे. त्यानुसार २००१ मध्ये ०३, २००२ मध्ये १५४, २००७ मध्ये १२८, २००८ मध्ये ८७, २००९ मध्ये १००, २०१० मध्ये १२६, २०११ मध्ये ११३, २०१२ मध्ये १०९, २०१३ मध्ये १००, २०१४ मध्ये १३४ तर २०१५ मध्ये १६३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासांठी केंद्र व राज्य शासनाने भरघोस आर्थिक मदत देऊनही शेतकरी आत्महत्या वाढतच चाललेल्या आहेत. त्यामुळे विदर्भाची पर्यायाने महाराष्ट्राच्या विकासाची गती मंदावत चालली आहे. शेतकरी आत्महत्यांचा अभ्यास करण्यासाठी वेळोवेळी अभ्यास गट व समित्या ही स्थापन करण्यात आल्या. या समित्याने आत्महत्या रोखण्यासंबंधी अनेक उपाय योजनाही आपल्या अहवालात सांगितलेल्या आहेत.

शेतकरी आत्महत्येची कारणे :-

१) कर्जबाजारीपणा :-

वर्धा जिल्हयातील पीक उत्पादक शेतकरी शेतीकरीता सहकारी सोसायट्या, सरकारी बँक व खाजगी सावकारांकडून कर्ज घेतात परंतु सततच्या नापीकीमुळे मात्र योग्य वेळेत कर्जाची परतफेड करू शकत नाही. अशावेळी मानसिक खच्चीकरणातुन शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो.

२) अल्पभुधारक शेतकरी :-

वर्धा जिल्ह्यात अल्पभुधारक आणि अत्यल्पभुधारक शेतकऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. अशा शेतकऱ्यांची उपजिविका पुर्णत: शेतीवरच अवलबुंन असते. पीकाचे झालेले नुकसान हा त्यांच्यासाठी

सर्वात मोठा आघात असतो. त्यामुळेच सर्वात जास्त अल्पभुधारक शेतकरी आत्महत्या करीत असल्याचे दिसून येते.

३) सिंचनाचा अभाव :-

आजही बरेचसे शेतकरी कोरडवाहु शेती करीत असल्यामुळे त्यांना निसर्गावर अवलंबुन राहावे लागते.निसर्गाच्या लहरीपणामुळे उत्पादनात घट येऊ शकतो त्यामुळे शेतकऱ्यांसमोर फार मोठे संकट निर्माण होतो. या संकटामुळेच शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ येते.

४) जोडव्यवसायांचा अभाव :-

प्रामुख्याने शेती व्यवसायाला जोड व्यवसायांचा  अभाव असल्याचे दिसून येतो. त्यामुळे शेतकऱ्यांचा संपुर्ण भार शेती व्यवसायावर पडतो. अशा जोडधंद्याच्या अभावामुळे नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकरी पुर्ण हतबल होऊन आत्महत्या करण्यात प्रवृत्त होते.

५) सामाजिक/धार्मिक प्रथा :-

धार्मिक सण, उत्सव, विवाह आणि जत्रा या सारख्या धार्मिक/सामाजिक प्रथा, परंपरावर शेतकरी खर्च करीत असतो यासाठी सावकारांकडून कर्ज काढावे लागते. परंतु हा सर्व खर्च अनुत्पादक स्वरूपाचा असल्यामुळे याची परतफेड करण्याकरीता शेती उत्पादनावरच अवलंबुन राहावे लागते. उत्पादन कमी झाल्यास, कर्जाची परतफेड करू शकत नाही. त्यामुळे ते आत्महत्येकडे प्रवृत्त होतात.

६) शासनाचे उदासीन धोरण :

शासनाचे शेतकऱ्यांप्रती नेहमीच उदासीन धोरण राहीले आहे. शासनाने जाहीर केलेली पॅकेज शेतकऱ्यांपर्यंत पोहचू शकत नाही तसेच योजना राबवणारी शासकीय यंत्रणा प्रामाणिक नसल्यामुळे; योजनेचा लाभ त्यांना मिळू शकत नाही म्हणून शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होते.

७) योग्य बाजारभावांचा अभाव :

पिकविला जाणाऱ्या शेती मालाचा योग्य बाजारपेठ आणि योग्य बाजारभावांचा अभाव दिसून येतो. त्यामुळे शेतकऱ्यांना मिळेल त्या किंमतीत आपला शेती माल विकावा लागतो. ऐन वेळेवर व्यापारी मालाचे भाव पाडत असल्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च देखील निघत नसल्यामुळे त्यांचे नियोजन पुर्णपणे विस्कळीत होते. ही स्थिती बरेचदा शेतकऱ्यास आत्महत्या करण्यात कारणीभूत ठरली आहे.

८) महागडे बी-बियाणे :-

आजचा शेतकरी अधिकाधिक खर्चाची रासायनिक शेती करीत आहे. त्याकरीता अनेक बहुराष्ट्रीय कंपण्या आपले महागडे बियाणे व रासायनिक खते विकत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च

वाढत आहे. पर्यायाने तो आर्थिक संकटात सापडला आहे.

वरील कारणांबरोबरच तंत्रशुद्ध शेतीचा अभाव, विजेचा अभाव, शेतीमालाला भाव देण्याची चुकीची पद्धत, शासनाचे आयात-निर्यात धोरण, सरकारी योजनांना अपयश इत्यादी कारणे शेतकऱ्यांच्या आत्महत्यास कारणीभूत असल्याचे स्पष्ट होते.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना केल्या तर आत्महत्या रोखल्या जावू शकतो. तसेच वेळोवेळी समित्याने सुचविलेल्या शिफारशी लागू करणे आवश्यक आहे. तरीही पुढील उपाययोजना चा अवलंब केल्यास आत्महत्यांना आळा बसू शकतो.

१) शेतकऱ्यांना २४ तास विज देणे.

२) सिंचन क्षेत्रात वाढ करणे.

३) कोरडवाहु शेती ओलीताखाली आणणे.

४) बँक आणि सावकारी कर्जातून मुक्त करणे.

५) जोड व्यवसायाकरीता शासनाने अनुदान देणे.

६) पशुधन व पीक विमा योजना लागू करणे.

७) पारंपारीक शेती ऐवजी नव-नविन पीके घेणे आवश्यक

८) शासनाच्या शेती विकास योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे.

९) बी-बियाणे व रासायनिक खते शंभर टक्के अनुदानावर शासनाने द्यावे.

१०) दुष्काळग्रस्त भागात कृत्रिम पाऊस पाडण्याची व्यवस्था करावी.

११) नविन विहीरीवर आणि मागेल त्याला विद्युत पुरवठा त्वरीत करावा.

१२) शेती मालाला व्यापारी आणि दलाल मुक्त करण्यात यावे.

१३) शेतकऱ्यांच्या बांधा पर्यंत पांदन रस्ते दुरूस्त करणे.

१४) शेतकऱ्यांमधील उदासिनता दुर करण्यासाठी चर्चा सत्र व कार्यशाळांचे आयोजन करणे आवश्यक आहे.

अशा उपायांचा अवलंब केल्यास शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यास मदत होऊ शकते. शेतकरी हा देशाचा पोशिंदा आहे. सरकारने शेतकऱ्यांसाठी विविध योजना द्यावा. जेणेकरून उत्पादन खर्च कमी करण्यास सहकार्य मिळेल व त्यांचे उत्पन्न वाढेल तेव्हा शेतकरी सुखी, संपन्न होईल व आत्महत्येस पायबंद बसेल. शेतकरी जगला तर, समाज जगेल म्हणून शेतकरी आत्महत्या थांबणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी शेतकरी चळवळी देखील प्रभावी होणे आवश्यक आहे.

✡☪

# प्रदूषणाचा अजस्त्र विळखा

कु. दिपाली कृष्णाजी पारसडे
बी.ए. भाग-१

मानवाने पृथ्वीवर पदार्पण केल्यापासून मानव निसर्ग यामधील संबंध बदलत गेले. दशलक्ष वर्षांपूर्वी मानवाने पृथ्वीवर आगमन केले असले तरी त्यातील बराचसा काळ त्याने निसर्गाच्या सानिध्यात व निसर्गावर पूर्णत: अवलंबून काढला. विश्वाच्या सुरवातीपासून शेतकरी अवस्थेपर्यंत या प्रदीर्घ काळात निसर्गात एक प्रकारचे संतुलन होते. जवळपास २५० ते ३०० वर्षांपूर्वी निसर्ग व निसर्गाचे नियम शोधण्यासाठी नवीन पद्धत विकसित झोली. निसर्गाला प्रयोगाच्या माध्यमातून प्रश्न विचारून व निसर्गाने दिलेल्या उत्तराचे विश्लेषण करून निसर्ग कसा आहे व निसर्गाचे नियम काय आहेत ? जड पदार्थाची अंतरीक रचना चेतन सृष्टीतील अनुवंशिकता इत्यादीचा शोध मानव घेऊ लागला. या सर्व प्रयत्नामागे मानवाचा ठाम विश्वास होता. हे विश्व अकलनिय आहे. मानवाला निसर्गाचे नियम जसे कळू लागते तसतसे त्या नियमांचा वापर करून तो आपली आर्थिक व इतर उन्नती कशी करता येईल व निसर्गाला कसे राबविता येईल याचा तो विचार करू लागला. नैसर्गिक उत्क्रांतीमध्ये मानवाने ढवळाढवळीला सुरवात केली व त्याचबरोबर पर्यावरणाचा प्रश्न समोर आला. गेल्या दोन-तीन दशकांत मानवाने विज्ञान व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून इतकी नेत्रदिपक प्रगती केली की गेल्या व या शतकाच्या सुरवातीच्या काळात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अनिर्बंध प्रगतीचा मार्ग गसवला आहे. या अनिर्बंध विकासाच्या प्रक्रियेमुळे वातावरणावर जैविक विविधतेवर होणारे दुष्परिणाम ऊर्जास्त्रोतात व कच्च्या मालाच्या साठ्यात होणारी प्रचंड घट या व इतर अनिष्ट परिणामाकडे दुर्लक्ष करून तो निसर्गाला वेठीस धरण्याची स्वप्ने पाहू लागला. मानव व निसर्ग यांच्या परस्पर संबंधातील हा टप्पा अत्यंत घातक व चिंताजनक असाच आहे.

आज आपण पाहतो, की शहरीकरणामुळे मोठमोठ्या इमारती, अद्ययावत वाहने, उद्योगधंद्यांची प्रचंड वाढ, वारंवार होणारी जंगलतोड, मोठमोठी यंत्रे, कारखान्यातील सामग्री यामुळे जंगलातील प्राण्यांचे जीवन धोक्यात आले. जमिनीची मोठ्या प्रमाणावर धूप वाढली. कारखान्यातील तसेच घरगुती शहरी सांडपाण्यामुळे प्रदुषण खूप वाढले. वाहनातील धूर, कारखान्यातील धूर-राख, रस्त्याच्या विस्तारामुळे उडणारी धूळ यामध्ये हवाही प्रदूषित झाली. बेछुट मासेमारी, कारखान्यातील अनावश्यक निरूपयोगी सांडपाणी व जड विषारी घटक, कुजलेली अवशेष, हाडे, सागरात, नद्यात सोडल्यामुळे सागरसंपत्तीची व जलचर जैविक घटकांची प्रचंड हानी होताना दिसून येते. गेल्या दोन-तीन दशकापासून म्हणजे १९८५ पासून विविध वस्तू कपडे, खाद्यपदार्थासाठी मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिकचा वापर वाढला. आता तर त्याच्या कल्पनेच्या पुढे वापर सुरू झाला असून प्रत्येक वस्तू द्रव पदार्थ, औषधी प्लॅस्टिकमध्ये मिळायला लागल्याने तसेच कमी गेजच्या हलक्या पिशव्या युज आणि थ्रो केल्या जाताहेत. जेवण,

चहा, अन्न पदार्थाचे वेष्टन सगळे प्लॅस्टिकमय झाल्याने जिकडे-तिकडे रस्त्यात, नाली गटारात, विघटन न होणारे प्लॅस्टिक अडकलेले दिसते. ते वाहत जावून नद्या समुद्रात साठते. गुराढोरांच्या पोटात ऑपरेशनमुळे दहा-दहा किलोपर्यंत ते निघते आहे. जवळपास नव्वद टक्के व्यवसायात प्लॅस्टिकचा वापर वाढल्याने, धोका वाढलेला आहे. शहरी कचऱ्यात मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिकचाच भरणा आढळतो. जमिनीत शहरी कचऱ्याचा खत म्हणून टाकल्याने तिथेही न कुजलेले पदार्थ प्लॅस्टिक सर्वत्र आढळतात. त्यामुळे जमिनीत पाणी मुरत नाही तसेच नाल्या तुंबणे अशा प्रकारे मोठ्या प्रमाणावर प्रदूषणात भर पडत आहे. यापुढे ही सर्वात मोठी डोकेदुखी झाली म्हटल्यास वावगे होणार नाही. वेगवेगळ्या कार्यक्रमामुळे वाहनाच्या आवाजाने, हॉनमुळे, यंत्राच्या खडखडाटाने, वाहनांच्या दिवस-रात्र पळण्याने अद्ययावत डीजे सिस्टिम, गाणे, रेल्वे, विमाने, रणगाडे, युद्ध यामुळे ध्वनिप्रदूषणाचे प्रमाणही प्रचंड वाढले आहे. या वेगवेगळ्या प्रदूषणामुळे मानवाचे जीवन त्रस्त होत आहे. वाहनांची अमाप संख्या वाढल्याने, भेसळयुक्त इंधनातून बाहेर पडणाऱ्या कार्बन मोनॉक्साईड, सिसे, लेड अशा घातक वायुमुळे रहदारीतल्या मानवाच्या थेट श्वसनात गेल्याने अनेक दुर्धर आजारांना शहरी मानवाला सामोरे जावे लागत आहे. त्यातूनच विशिष्ट कालमर्यादा झाल्यानंतर बाद झालेली वाहने सर्रास रस्त्यावर येत असल्याने वायू व ध्वनिप्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

आज-काल मानव हा उत्सी प्राणी झाल्याने छोट्या-मोठ्या कारणांनी कार्यक्रमात कर्णकर्कश आवाजातील डीजे, स्पीकर, गाणे व शहरातील गर्दीमुळे रस्त्यालगतच्या भागात निवासी ठिकाणे, घरे वाढून त्यातील रहिवाशाना या समस्येला मोठ्या प्रमाणात बळी पडावे लागते, त्यामुळे त्यांच्यात चिडचिडेपणा, अस्वस्थपणा, अपघाताचे प्रमाण व मृत्यूचे प्रमाणही वाढले आहे. पुढची पिढी रोगट, अशक्त निपजते आहे. दाटीवाटीने प्रत्येकाला शहरातच राहायचे असल्याने, तिथले जागेचे, तयार घरांचे दर गरीब कुटुंबाला न परवडणारे असल्याने तिथे नाल्यावर, गटाराच्या कडेने जिथे दलदल आहे तिथे वस्त्या करून राहिल्याने अशी मंडळी वेगवेगळ्या प्रदूषणाचे शिकार झालेत. अशा वाढलेल्या वस्तीतील लोकांना कुठलीच मलनिस्सारणाची, शौचाची सोय नसल्याने परत घाण वाढून प्रदूषणात ही लोक भर घालताहेत. अशा बकाल वस्त्यातील लोकांना अनेक दुर्धर आजाराने, टीबी, मलेरिया, हगवणसारखी आजार होऊन अकाली मरण्याची संख्या वाढली. वाढत्या लोकसंख्येला स्वच्छ पाणी मिळणे कठीण व न परवडणारे असल्याने शहरातल्या, नदी-नाल्यातल्या प्रदूषित पाण्याचे अनेक जण शिकार होताना आपण पाहतो. प्रदूषणाच्या या अजस्त्र विळख्याने आपले जगणे असह्य होत आहे. यास आळा घालावाच लागेल.

***

# प्रदूषण रोखणारी फौज म्हणजे वृक्ष

✍कु. पुजा कलोडे बी.ए.

अनुशास्त्रात झालेली प्रगती जैविक असमतोल, जंगलतोड, पशुहत्या, वाढते शहरीकरण, उद्योगधंदा, जगातील सत्ता स्पर्धा, शस्त्रास्त्र स्पर्धा, दळणवळण, औद्योगिकरण, खते व रासायनिक औषधांचा बेसुमार वापर या सर्वांमुळे पृथ्वीच्या पर्यावरणावर किती भयंकर व खोलवर परिणाम होऊ शकतो याचे मानवाला भान आले आहे, म्हणून आता कुठे पर्यावरणाच्या अभ्यासाला गती आली असे म्हणता येईल.

भारतातील पर्यावरण समस्या या मुख्यत: आर्थिक गळचेपी व नियोजनाचा अभाव, याची अनेक उदाहरणे देता येतील. भारतासारख्या विकसनशिल देशात मध्यम आणि छोट्या धरणाची गरज असताना मोठमोठाले प्रकल्प हाती घेतले गेले. केवळ मोठ्या कारखानदारीवर भर देण्यात आला. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होऊन पर्यावरणाच्या ऱ्हासास आम्हीच कारणीभूत ठरलोत. आर्थिकदृष्ट्या खालच्या थरातील कमकुवत लोकांना या विकासाचा फायदा म्हणावा तसा झाला नाही. त्यांना विस्थापित होऊन शहरांच्या बकाल वस्त्यात आश्रय घ्यावा लागतो आहे, म्हणून त्यांची कुचंबणक्षा अधिकाधिक वाढतच राहिली.

१९९२ मध्ये ब्राझील मध्ये रिओ–डी–जनरिओंमध्ये 'वसुंधरा' शिखर परिषद भरली. त्यामध्ये १५३ राष्ट्रांनी भाग घेतला होता. त्यामध्ये पृथ्वीच्या हवामानावर होणारे बदल सचिवांच्या अस्तित्वाचा प्रश्न, प्रदूषण नियंत्रण, साधन सामग्रीचा उपयोग आदी बारा विषयांवर एकमत झाले. ते विषय किमान चर्चेला तरी आले एवढेच त्यावेळी झाले.

मानवी कृत्यामुळे पर्यावरणाचा समतोल इतका ढासळला, की संपूर्ण सजीव सृष्टीचे भवितव्य धोक्यात आले; म्हणून प्रदूषणाचे धोके टाळण्यासाठी शास्त्रीय अभ्यासाला महत्व आले. तेव्हाच खरे तर पृथ्वीभोवती पर्यावरणाचा अजस्त्र विळखा आवळायला सुरवात झालेली होती. पाण्याच्या स्त्रोताच्या जवळ असणाऱ्या विविध रासायनिक उद्योगामुळे त्यांचे प्रदूषित पाणी वाहत्या पाण्यात मिसळून तसेच शहरीनाल्यांचे पाणी त्यात मिसळून देशातील जवळपास सर्वच नद्या, खाड्या दूषित झाल्या. तेच पाणी पिण्यासाठी, वापरासाठी थोडीबहुत प्रक्रिया करून पुरवले जाते. अशा भागातील विहीरी, बोअर वेलना प्रदूषित पाणी येते. त्यामुळे बहुतांश रोग हे पाण्यातून पसरतात. पण कोणीही याबाबत जागरूक दिसत नाही, हीच तर सर्वात मोठी शोकांतिका आहे.

वाढत्या लोकसंख्येला लागणारे अन्नधान्य पुरावे म्हणून कीडनाशकांचा वापर वाढला. तृणनाशकाने,

रासायनिक खताने जमिनी प्रदूषित झाल्या. कीडनाशकातले विषारी घटक अन्नधान्यात मिसळल्याने व ते सेवन केल्याने कित्येक रोग असे होताहेत की त्याचे निदानही डॉक्टरांना लागत नाही. पाण्यामधील विषारी घटक मानवी शरीरात जाऊन नपुंसकत्व, कॅन्सर, वंधत्व, अकाली म्हातारे होणे, दमा पोटाचे विकार वाढून मोठ्या प्रमाणावर लोकांना विविध आजारांना सामोरे जावे लागते.

आज प्रत्येक पदार्थात भेसळ होत असल्याने त्याच्या सेवनाने मानवी आरोग्य धोक्यात आले आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार नव्वद टक्के आजार विविध प्रकारच्या प्रदूषण व भेसळीयुक्त अन्नामधून, पाण्यामधून होत असल्याचे नमूद केले आहे.

खरे तर पर्यावरणाच्या शास्त्रोक्त अभ्यासाला दुसऱ्या महायुद्धानंतर सुरवात झाली. युद्धांचे दूरगामी दुष्परिणाम दिसू लागल्याने तिथूनच खऱ्या अर्थाने पर्यावरणाच्या अभ्यासाला सुरवात झाली असे म्हणता येईल. औद्योगिक क्रांतीचे फायदे दिसतात. पण त्यांचे दुष्परिणाम पहिल्यांदा दिसू लागले. धूर, धूळ, ध्वनी, प्रदूषित पाणी, कीडनाशकांचा अन्नातील दुष्परिणाम यांचा त्रास महानगरीय माणसाला प्रथम जाणवू लागला आणि हिच खऱ्या अर्थाने पर्यावरणाच्या अभ्यासाची, जागरूकतेची वेळ होती. अन् येथूनच जग खडबडून जागे झाले आणि परिषदा, दिन पाळले जाऊ लागले.

विविध प्रदूषणाने मानवाला जीवनाच्या सर्व बाजूने एवढे घेरले आहे की, सध्यातरी कुठलीही बाब प्रदूषित व्हायची राहिलेली नाही. या चक्रव्यूहाची रचना मानवानेच केली असून तो स्वतच: त्यात फसला आहे. सध्यातरी सुटका होण्याचे कुठलेच मार्ग दृष्टिक्षेपात दिसत नाहीत. आम्ही दररोज प्रत्येक जण प्रत्येक सेकंदाला त्यात भरच टाकत आहोत. प्रदूषण रोखणारी नैसर्गिक फौज म्हणजे वृक्ष. आम्ही या न त्या कारणाने भूतलावरल्या बहुतांश वृक्षांची कत्तल करीत आहोत. पण नव्याने कोणी वृक्ष लावीत नसल्याने वनाचे क्षेत्र दहा टक्क्यांपर्यंत खाली आलेले आहे. त्यामुळे हवेचे, पाण्याचे, मातीचे, आवाजाचे प्रदूषण वाढले आहे.

या सर्व गोष्टीला आपले आधुनिक जीवनमान कारणीभूत आहे. या अशा जीवनाचा सोस सोडून पुन्हा सर्वांनी मागे मूळ स्वरूपात फिरणे अवघड बाब नक्की नाही. त्यासाठी दृढनिश्चय करून आधुनिकतेचा त्याग करावा लागेल. तरच शक्य आहे. तसं पाहिलं तर अशक्य असे काही नाही पण स्वत:च खोदलेल्या खड्ड्यात आम्ही अडकलो आहोत. अगोदर खड्ड्यातून वर यावे लागेल. जीवन कशासाठी आहे हे तपासावे लागेल. अंतर्मुख व्हावे लागेल तरच शक्य आहे. नाही तर हा विळखा आणखी आवळला गेल्यास विनाश अटळ आहे, ही काळ्या दगडावरची रेघ आहे, असे समजावे.

**

# शास्त्रीय पद्धतीने वनीकरण करा...

✍ **गणेश जयपूरकर** बी.ए. भाग–३

वृक्षारोपणासाठी प्रजातीची निवड करताना जागेची उपलब्धता, झाडांचे आकारमान, आवश्यक असलेली जमीन, पाणी, झाडांचे वय, उपयुक्तता इ. गोष्टींचा विचार करावा. वृक्षारोपणासाठी रस्ते, बागा, परिसर, माळराने, स्मशानभूमी, गावातील अंतर्गत रस्ते, पाण्याचे पाट, निवासी परिसर इ. विचार करावा.

झाडाची निवड :

१) शोभेची झाडे : कांचन, सीता, अशोक, आंबा, सोनचाफा, निलमोहोर, गुलमोहर, आपटा, कडुनिंब, ख्रिसमस ट्री.

२) इमारती लाकूड देणारी झाडे :साग, शिसम, हळद, शिसवी, महोगणी, फणस, जांभुळ, बाभुळ इत्यादी.

३) रस्त्याच्या दुतर्फा लावण्यायोग्य वृक्ष : चिंच, वड, आंबा, बकुळ, सुरंगी, कडुनिंब, करंज, मोह, सिमारूबा, गुलमोहर, पिचकारी कांचन इ.

४) रस्त्याच्या मध्यभागी लागवडीयोग्य झाडे : शिंदी, ताडगोळा, सप्तपर्णी, अशोक, करमळ, पुत्रंजिवा, समुद्रफळ, सुरू, स्कारेट, कार्डिया इत्यादी.

५) उष्णतामान कमी करणारी झाडे : कडुनिंब, करंज, आंबा, वड, उंबर, पिंपळ, कंदब, चिंच इत्यादी.

६) डोंगर माळरानावर कमी पाण्यावर येणारी झाडे : आवळा, चिंच, कडुनिंब, बाभऊ, रिठा, आसाणा, सीताफळ, बोर, वारस, मोह, पुनव इत्यादी.

७) जळणासाठी उपयुक्त झाडे : बाभूळ, सुबाभुळ, निलगीरी, सुरू, ऐन, किंजळ

८) पक्ष्यांसाठी उपयुक्त झाडे : आसाणा, चेरी, वड, उंबर, पिंपळ, बकुळ, सुरंगी, तोरण, करवंद, पेरू इ.

९) मंदिर परिसर, स्मशानभूमी या ठिकाणी लागवडीयोग्य वृक्ष : बेल, शमी, खैर, वड, उंबर, पिंपळ, अर्जुन, गोरखचिंच, आंबा, म्हाळुंग, चंदन, बकुळ, कडुनिंब, कळम कंदब, कृष्णवड, साल, कडूनिंब, मोह इत्यादी.

१०) औषधी वृक्ष : हिरडा, बेहडा, आवळा, शिवण, टेटू, गेळ, पाडळ, बेल, अग्निमंथ, लोध्र, वरूण, गोरखचिंच, मेढशिंगी, रिठा, मोह, काजरा, काळाकुडा, पांढराकुडा, बिवळा, शमी, जायफळ, लवंग, दालचिनी, हिंगणबेट, बिब्बा, कुंभा, धुप, तिरफळ इत्यादी.

११) डिंक देणारी झाडे : बाभुळ, खैर, धावडा, बिवळा, पांढरूळ, सळई, धुप, कवठ, गुग्गुळ, आंबा, काजू, आपटा, बेहडा, ऐन, शेवगा.

१२) नैसर्गिक रंग देणारी झाडे : पळस, बेल, कोकम, आवळा, हिरडा, बाभुळ इ.

१३) रोजगार हमी देणारी झाडे : मोह, तेंदूपत्ता, हिरडा,बांबू, खैर, शिकेकाई, तिरफळ, कडुनिंब, केन, पळस, कुडा, बेहडा, आवळा इ.

लागवडीसाठी खड्डे :

* खड्डे खोदण्याआधी लागवडीचे नियोजन, प्रजातीची निवड व आखणी करून खड्डे खोदावेत. खड्डे खोदतांना वरच्या थरातील चांगली माती बाजुला ठेवावी. खालच्या थरातील माती दुसऱ्या बाजुला ठेवावी. मातीतील दगडगोटे, केरकचरा वेचून घ्यावा. खड्डे खोदाई झाल्यानंतर पालापाचोळा, शेणखत

**

# माझी आई

✍कु. लिना दादाराव कुडमते
बी.ए.-१

‘आई!’ म्हणोनि कोणी । आईस हाक मारी ।
ती हाक येवू कानी । मज होई शोककारी ।।

‘आई’ या अक्षराची संधीच मुळी आ+ई अशी साधी जरी केली, तरी ‘आ’ म्हणजे आत्मा आणि ‘ई’ म्हणजे ईश्वर. म्हणजेच आई हा शब्द आत्मा+ईश्वर यांच्या आद्यक्षरांनी तयार झाला आहे.

माझी आई ही जगावेगळी आहे. प्रत्येक व्यक्तीला त्याची आई प्रिय असतेच. पण माझी आई खरोखरच सगळ्यांच्या आई पेक्षा वेगळी आहे. माझ्या आईने मला शिस्तीचे व स्वावलंबीपणाचे धडे अगदी लहानपणापासूनच दिले.

एकदा दिवाळीच्या दिवशी नरकचर्तुथीला पहाटेच स्नान करून आम्ही भावंडे दिवाळीचा फराळ करत अंगणात बसलो होतो, त्यावेळी कसे कुणास ठाऊक ! दोन लहान भिकाऱ्याची मुले एवढ्या सकाळी भिक मागायला आली. आम्ही स्नान करून थंडी असल्यामुळे गरम कपडे घालून फराळावर ताव मारीत असतांनाच ही दोन मुले आली. त्यांना बघून माझे डोळे पाणावले. मी धावतच आईकडे गेलो आणि आईला बिलगलो. आईने माझ्या भावना ओळखल्या आणि लागलीच तिने आणखी एक फराळाची प्लेट तयार करून दिली. मी ती घेऊन त्या मुलांना दिली. मी माझ्या अंगातील स्वेटर देखील काढून दिले. नुकत्याच माझ्या वाढदिवसाला मला बाबांनी नविन स्वेटर घेऊन दिले होते.

कुठलाही विचार न करता मी त्या मुलाला स्वेटर दिल. आई बाजूलाच उभी होती. पण तिने एकाही शब्दांनी मला रागवले नाही. उलट म्हणाली ‘मी तुला आणखी छान स्वेटर घेऊन देईल. असे म्हणून तिने मला जवळ घेतले.

खरंच, या प्रसंगाने आईने मला शिकविले की, ‘‘मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा’’.

आईची देखील स्वत:च्या आयुष्यात याच प्रकारची वर्तणूक असल्यामुळे तिला माझ्या वागण्याबद्दल वेगळं वाटल नाही.

अशा प्रकारच्या लहान लहान प्रसंगातूनच तीने माझ्या आयुष्याला वळण दिले. आणि तिच्या सारखेच पुढे मी पण जगावं असंच मी ठरवलं. म्हणूनच मी म्हणते की, माझी आई जगावेगळी आहे. आणि म्हणूनच ती मला फार प्रिय आहे.

ढगाआड गेलेला सुर्य पुन्हा दिसतो पण मातीआड गेलेली आई पुन्हा दिसत नाही.

आई ही जन्माची शिदोरी आहे.

****

# शासनाच्या शेतीकरीता विविध योजना

✍भाग्यश्री ढगे (बी.ए. ३)

केंद्र आणि राज्य सरकारतर्फे विविध योजना राबविल्या जातात पण त्या सर्वसामान्य नागरिकांपर्यंत शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नाहीत..........

१) गाई–म्हणी विकत घेणे :–

प्रकल्प खर्च ६ लाख–१० जनावरे

(शासकीय योजना – २५% ओपन कॅटेगरी साठी ३३.३३% एस.सी./एस.टी.साठी)

२) शेळीपालन :–

प्रकल्प खर्च ४.५ लाख–५0 शेळ्या

(शासकीय योजना – २५% ओपन कॅटेगरी साठी ३३.३३% एस.सी./एस.टी.साठी)

३) कुक्कुटपालन :–

प्रकल्प खर्च ८ लाख–५000 पक्षी

(शासकीय योजना – २५% ओपन कॅटेगरी साठी ३३.३३% एस.सी./एस.टी.साठी)

४) शेडनेट हाऊस :–

प्रकल्प खर्च ३.५ लाख – १0 गुंठे

(शासकीय योजना ५0%)

५) पॉलीहाऊस :–

प्रकल्प खर्च – ११ लाख – १0 गुंठे

(शासकीय योजना ५0%)

६) मिनी डाक मिल

प्रकल्प खर्च १.८८ लाख

(शासकीय योजना ५0%)

७) मिनी ऑईल मिल :–

प्रकल्प खर्च १.८८ लाख

(शासकीय योजना ५0%)

८) पॅकिंग व ग्रेडिंग रोटर :-

३५% सर्वसाधारण क्षेत्रासाठी अनुदान (१७.५० लाख प्रती आकार ९*८ मी)

९) ट्रॅक्टर व अवजारे :-

प्रकार १- (शासकीय योजना ८ ते २० PTOHP रूपये व लाख अनुदान/३५% अनु. जाती, अनु. जमाती, अल्प, अत्यल्प शेतकरी, महिला यासाठी

प्रकार-२ (शासकीय योजना २० ते ७० PTOHP रूपये ७५ हजार अनुदान/२५% इतर लाभ धारकांसाठी)

१०) पॉवर टिलर-९ बीएचपी च्या कमी :-

प्रकार-१ (शासकीय योजना ५००००/- अनुदान / ५०% अनु. जाती, अनु. जमाती, अल्प, अत्यल्प शेतकरी, महिला यांसाठी

प्रकार-२ (शासकीय योजना ४० हजार अनुदान /४०% इतर लाभ धारकांसाठी)

११) पॉवर टिलर-९ बीएचपी च्या जास्त :-

प्रकार-१ (शासकीय योजना ७५ हजार / अनुदान/५०% अनु. जाती, अनु. जमाती, अल्प, अत्यल्प, शेतकरी, महिला यांसाठी

प्रकार - २(शासकीय योजना ६० हजार अनुदान / ४०% इतर लाभ धारकांसाठी)

१२) काढणी व बांधणी यंत्र :-

शासकीय योजना रूपये १,२५ लाख (५०%)

१३) रोटाव्हेटर - २० बीएचपी खालील चलित

प्रकार-१ (शासकीय योजना ३५ हजार/अनुदान अनु. जाती, अनु. जमाती, अल्प, अत्यल्प, शेतकरी, महिला यांसाठी

प्रकार-२ (शासकीय योजना २८ हजार अनुदान इतर लाभ धारकांसाठी रोटाव्हेटर २० बीएचपी वरील चलित

प्रकार-१ (शासकीय योजना ४४ हजार / अनुदान अनु. जाती, अनु. जमाती, अल्प, अत्यल्प शेतकरी, महिला यासाठी

प्रकार - २ (शासकीय योजना ३५ हजार अनुदान इतर लाभ धारकांसाठी) इतर लाभधारकांसाठी

१४) कडबा कुट्टी यंत्र/पेरणी यंत्र :-

२० बीएचपी खालील चलित

प्रकार –१ (शासकीय योजना १५ हजार/– अनुदान अनु. जाती, अनु. जमाती, अल्प, अत्यल्प शेतकरी, महिला यांसाठी

प्रकार–२ (शासकीय योजना १२ हजार अनुदान इतर लाभ धारकांसाठी २० बी एच पी वरील चलित)

प्रकार –१ (शासकीय योजना १९ हजार अनुदान अनु. जाती, अनु. जमाती, अल्प, अत्यल्प शेतकरी,महिला यांसाठी

प्रकार–२ (शासकीय योजना १५ हजार अनुदान इतर लाभ धारकांसाठी)

१५) उच्च तंत्रज्ञानावर आधारित रोपवाटिका – (किमान २ ते ४ हेक्टर क्षेत्र युनिटसाठी) अनुदान ४०% भांडवलाच्या निगडीत २५ लाख प्रति हेक्टर)

१६) छोट्या रोपवाटिकासाठी (१ हेक्टर क्षेत्र युनिटसाठी) अनुदान ५० भांडवलाच्या निगडीत १५ लाख प्रति हेक्टर

१७) गोडावून (वेअर हाऊस)

प्रकल्प खर्च ३५ लाख १००० मे. टन (शासकीय योजना २५%)

१८) शीत गृह–५००० मेट्रिक टन साठी

(शासकीय योजना ३५% अनुदान सर्वसाधारण क्षेत्रासाठी ५०% आदिवासी आणि डोंगराळ भागासाठी)

२८०० प्रती मे. टन प्रकार १ साठी

३५०० प्रती मे. टन प्रकार २ साठी

१९) गांडुळ खत प्रकल्प

प्रकल्प खर्च ६०० घनफुट प्रेरित धरतीवरती (शासकीय योजना ५००००/– प्रति उत्पादन प्रकल्प

२०) उसाच गुऱ्हाळ – प्रकल्प खर्च १४ लाख (शासकीय योजना ५०%)

२१) फळ प्रक्रिया उद्योग :– प्रकल्प खर्च २४ लाख (शासकीय योजना ४०%)

# आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

✍पुनम रा. नौकरकार
बी.ए. २

१) तंत्रज्ञान : टेक्नॉलॉजी म्हणजे अवजारे यंत्रे, त्यापासून बनलेल्या प्रणाल्या यांचे संकल्पना, निर्मिती आणि उपयोजन अभ्यासणारी तसेच त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्यासंबंधीची विद्याशाखा होय. प्रागैतिहासीक काळापासून मानव तंत्रज्ञानाचा वापर व अभ्यास करत आहेत. अगदी प्राचीन काळी नियंत्रित पध्दतीने आग चेतवल्याचे तंत्र मानवानी शोधून काढले. त्यानंतर चाकाचा शोध लावल्यामुळे मानवांना अधिक पल्ल्याचे अंतर कापण्यासाठी उपयुक्त तंत्रज्ञान लाभले. तेथून पुढे अगदी आधुनिक काळात छपाईचे तंत्रज्ञान, टेलीफोन, इंटरनेट या तंत्रांपर्यंत मानवाने तंत्रज्ञान विकसित केले.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर जनसंपर्क क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर केला जातो. तंत्रज्ञान खूप महत्वाचे जगभर आणि विविध लोकांपर्यंत पोहचता येते. तंत्रज्ञानाच्या फायद्यासोबतच तोटे देखील आहे. वेबसाईटमधून प्रतिस्पर्ध्यांना आपली माहिती आणि डेटा सहज उपलब्ध होतो. कंत्राटवर त्याचा परिणाम होण्याची देखील शक्यता असते.

कम्युनिकेशनसाठी संगणकाचा आणि इंटरनेचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. इंटरनेटवर ई–मेल, छायाचित्रे (फोटो), चलचित्रे (विडीओ) या सर्व गोष्टी सहज आणि सोप्या पद्धतीने पाठवता येतात. १०–१५ वर्षांपूर्वी बरिचशी साधने नव्हती आणि जी साधने होती ती महागडी होती. मोबाईलद्वारे आपण सोप्या पद्धतीने लोकांना उपलब्ध झालेलो आहोत. एस.एम.एस. चा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. वर्तमानपत्रात लिखीत स्वरूपात बातमी द्यावी लागते. वेबसाईट आणि चॅनेल्सला लिखित आणि ऑडिओ विझ्युयल स्वरूपात बातमी द्यावी लागते. तंत्रज्ञानाने पेपरचे काम मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहे.

एका दिवसात पाच–सहा पत्रकार परिषदांचे आयोजन करून एस.एम.एस. द्वारे किंवा दूरध्वनी करून कळविले जाते. इंटरनेटद्वारे विडीओ हे आपल्य कार्यालयातून पाठवू शकतो. त्यासाठी प्रत्यक्ष वृत्तपत्र संस्थेत जाण्याची गरज भासत नाही आधुनिक तंत्रज्ञानाने कामाचा वेळ वाचतो आणि वेग वाढतो.

२) आधूनिक तंत्रज्ञानाच्या आहारी जावून त्यांचे दुष्परिणाम भोगणारी सध्याची पिढी :–

१ अ. फेसबुक, ट्विटर, व्हॉटस्अप यांच्या आहारी गेल्यामुळे वाचनास वेळ नसणारी आजची मुले : मागील पिढ्यांच्या मुलांवर सातत्याने वाचनाचे महत्व बिंबवले जात असे.

परिणामत: संत चरित्रे तसेच क्रांतीकारकाच्या आणि अन्य चांगल्या संस्कार करणाऱ्या गोष्टी वाचणात येऊन त्यांच्याच मुलांची पुढील प्रगती होण्यास हातभार लागत असे; परंतु आता फेसबुक, टविटर, व्हॉटसअप सारख्या विविध ॲप्समुळे मुलांना ग्रंथवाचन करण्यास उसंतच नाही असे झाले आहे.

१ आ. ज्ञानार्जन करण्यापेक्षा इकडची माहिती तिकडे घेणे आणि गुण मिळविणे असे घडत असल्याचे लक्षात येत आहेत.

१. इ. विविध ॲप्स वरील माहिती एकमेकांना पाठवतांना ती नीट वाचलेली नसल्याने मुलांना गंभीर प्रसंगांना सामोरे जावे लागणे. बहुतांश मुलांचे वाचन या विविध ॲप्स आणि संकेतस्थळे यावरचेच असते. व्हॉटस्‌अप आणि हाईक वर आलेली माहिती छायाचित्र किंवा चलचित्रे (विडीओ) इतर मित्रांना पाठवणे अन त्यांच्याकडून कौतुक करवून घेणे, यांतच ही मंडळी खुश राहतात. बऱ्याच वेळा या ॲप्सवरील माहिती निट पाहिली सुदधा जात नाही. त्यामुळे अनेक गंभीर प्रसांगाना सामोरे जावे लागते. हे सर्व नियतकालिकातून छापून येणाऱ्या वृत्तामध्ये आपण वाचतच आहोत.

१ ई. लहान मुले वर्तमानपत्र वाचत नसणे आणि संस्कार करणारे कार्यक्रम सध्याच्या पिढीला नसणे. प्रतिदिन सकाळी येणारे वर्तमानपत्र किती मुले वाचतात ? याचा अभ्यास केल्यासही आपणॉस कळू शकेल की ही संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकी आहे.

मध्यंतरी प्रवासात एक विदेशी छायाचित्रकार भेटला होता. त्याने विचारले, ''भारतात नियतकालिकांची स्थिती' काय आहे ? अमेरिका आणि फ्रान्स येथेही प्रिंट मिडीया आता डबघाईला आल्यासारखी झाली आहे. माझी मुलेही वृत्तपत्रे वाचत नाहीत. दूरचित्रवाणीवरील हिंसक कार्यक्रम पाहतात. प्रेमभावना आणि संस्कार असलेली कार्यक्रम सध्याच्या पिढीला आवडतच नाहीत. ही स्थिती केवळ विदेशातच नाही तर आपल्या देशातही आता पालकांना सतावू लागली आहे. भेद एवढाच की, तेथे वाचन आणि दूरचित्रवाणीवरील चांगले कार्यक्रम हा प्रकार गुंडाळून ठेवल्यासारखा झाला असेल, तर आपल्याकडे त्याचा आरंभ आहे असे आपण म्हणू शकतो.

१. उ : दिवसभर कानात 'इअर फोन' घालून आधुनिक गाणी ऐकल्याने होणाऱ्या दुष्परिणामापासून अनभिज्ञ असलेली आजची मुले : संगणक आणि भ्रमणभाषा यावरच सर्व सोयी उपलब्ध असल्याने मुलांना पेटी, तबला आणि तंबोरा इत्यादी वाद्यांची ओळख ही तोंड ओळखच असते. पुर्णवेळ कानात 'इअरफोन' घालून आधुनिक गाणी ऐकण्यातच त्यांचा वेळ जातो. या वाद्यांचा होणारा परिणाम आणि स्पंदनशास्त्रचा ते अभ्यास तरी कधी करणार ? बर, ते ऐकतात, ते संगीत तरी काय करते ? तर त्यांच्यातील आणि आसपासच्या वातावरणातील रज–तम वाढवते; परंतु याचेही शिक्षण नसल्याने मुलांना हे कळतच नाही.

२. ऊ : शाळा, अभ्यास आणि शिकवणी यातच मुलांचा अधिक वेळ जात असणे अन मैदानी खेळांची

जागा संगणकीय खेळांनी घेतलेली असणे : खेळाच्या संदर्भात म्हणावे, तर मैदानी खेळ मागे पडू लागल्यासारखी वाटतात आणि त्याला कदाचित असे कारणही दिले जावू शकेत की, झपाट्याने होणारे शहरीकरण आणि त्यामुळे वाढणारे क्रांक्रीटीकरण मुलांचे आजचे वेळापत्रक इतके व्यस्त असते की त्यांची स्थिती केवळ स्पर्धेतील घोडयांसारखी झाली आहे. शाळा, अभ्यास आणि शिकवणी यांतच अधिक वेळ जा असल्याने मिळणाऱ्या रिकाम्या वेळेत संगणकीय खेळांचत ते गुंतून राहतात. त्यामळे ही मैदानी खेळ मागे पडले आहेत.

आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करायला शिकवणारे मार्गदर्शक देणे ही काळाची आवश्यकता असणे

आज काळ पालटला आहे. आपली विचारसरणीसुद्धा पालटली पाहिजे.आधनिक उपकरणांचा चांगला उपयोग कसा करावा ? हे टीका करणाऱ्यांना ठाऊक नाही, असे काही तथाकथित समाजसुधारक म्हणतील; परंतु या पालटल्या काळातील पिढीसुद्धा तितकीच प्रगल्भ, बुद्धीमान आणि चाणाक्ष आहे याकडे आपण दुर्लक्ष करायला नको. मुलांना योग्य मार्गदर्शन करून या उपकररांचा योग्य उपयोग शिकवणारे मार्गदर्शक तसेच दिशादर्शक आज आपल्याला त्यांना द्यायला हवेत. केवळ विचारसरणी पालटून आपण समाज घडवता येऊ शकणार नाही.

३. मुलांच्या मनात राष्ट्र अन् धर्म प्रेमाची ज्योत सतत तेवत ठेवणे हे पालकांचे कर्तव्य असणे :–

लहान मुले ही ओल्या गोळ्यासारखी असतात. त्यांना घडवू तशी ती घडतात. त्यांना घडवण्यासाठी आधी स्वत:ला घडायला म्हणजे पालटायला हवे, हे पालकांनी जाणायला हवे. केवळ शाळा आणि महाविद्यालये यातील शिक्षकांवर अवलंबून न राहता प्रत्येक पालकानेच आपल्या मुलांसाठी झटले पाहिजे. त्याचा शिक्षक, मित्र आणि मार्गदर्शक बनले पाहिजे; परंतु त्याच्यामध्ये राष्ट्र आणि धर्म प्रेमाची ज्योत सतत तेवत ठेवायला त्याच्यातील गुणांचा विकास करून त्याचा उपयोग योग्य प्रकारे करवून घेण्यासाठी पालकच हवेत.

४. समाजात एकीकडे व्यावहारिक प्रगती करणारे पालक आणि दुसरीकडे मुलाला आज खायला काय देऊ ? या विवंचनेत असणारा पालक अशी दोन टोके पहावयास मिळणे.

तसे पाहता आज बहुतांश पालक हे चांगला शैक्षणिक दर्जा असलेले आहेत. शहरी भागातील आई–वडील दोघेही नोकरीनिमित्य घराबाहेर असतात, तसेच नोकरी नाही; परंतु काहीसे शहरातील पालकांप्रमाणे वागणारे गावाकडील पालक आपण पाहु शकतो. एकंदरीत समाजाचे राहणीमान चांगले झाले आहे. व्यय करणे असे स्वरूप पहायला मिळते, तर दुसऱ्या ठिकाणी शिक्षण अन् संस्कार यांपेक्षा मुलाला आज खायला काय देऊ ? या विवंचनेत असणारा पालकही दिसतो.

✡☪

# वृक्ष संवर्धन-काळाची गरज

✍कु. प्रिती रामभाऊ वांदिले
बी.ए. भाग २

'वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे'

असे तुकाराम महाराज सांगतात.

वृक्षांना तुकाराम महाराजांनी नातलग मानले याचा अर्थ त्या काळातही त्यांनी वृक्षांचे महत्व जाणले होते. आजच्या काळात वृक्षाला आपले म्हणून त्याचे जतन करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. कारण असे केले नाह तर प्रदुषणाचा हा भस्मासूर आपल्याला गिळकृंत केल्याशिवाय राहणार नाही.

हा नाश थांबवा भूमातेचे तनमन जळते आहे हि वसुंधरा जनसंख्येच्या भाराने रडते आहे.

जनसंख्येचा भार पृथ्वीला असह्य होत आहे. जनसंख्या वाढीमुळे अनेक समस्यांना मानवाला सामोरे जावे लागत आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी हजारो वृक्षांची कत्तल केली जात आहे. त्यामुळे जंगले ही ओसाड पडली आहे. भारतातील जंगलाचे प्रमाण हे निम्म्या प्रमाणात कमी झालेले आहे. त्याचे भयंकर दुष्परिणाम मानवाला भोगावे लागत आहे.

विकासाच्या नावावर मानवाने हजारो वृक्ष तोडले व तिथे सिमेंटची जंगले उभी केली. औद्योगिकरणामुळे प्रदुषणात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. झाडांमुळे प्रदुषण नियंत्रणात राहते. परंतु वृक्षतोडीमुळे प्रदुषणात वाढ होवून त्यांचे गंभीर परिणाम आज मानवाला भोगावे लागत आहे. त्वचेचे, छातीचे, मेंदुचे कॅन्सर, दमा, स्वसनाचे आजार असे अनेक आजार प्रदुषणामुळे होतात. झाडाची संख्या कमी झाल्यामुळे त्याचा परिणाम पर्जन्यावर झालेला आहे. गेल्या काही वर्षात पर्जन्यात कमालीची घट होवून त्याचा परिणाम सर्व सजिवांच्या जीवन मानावर झालेला आहे. गेल्या काही वर्षात अनेक भागाना दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या मराठवाड्यासारख्या दुष्काळी भागता भेडसावत आहे. आज शहरी भागात प्रदुषण इतके वाढले की श्वास घेणे सुद्धा कठीण झाले आहे. या सर्व समस्यावर एकच उपाय आणि तो म्हणजे वृक्षसंवर्धन.

वृक्षसंवर्धन केले तरच या पृथ्वीला प्रदुषणापासून आपण वाचवू. दुष्काळासारख्या भयंकर स्थितीवर मात करण्यासाठी वृक्षसंवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. या उजाड झालेल भुमीला

पुर्वीचे ते हिरवेगार वैभव प्राप्त करून देण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. तेव्हाच आपण या पृथ्वीला विनाशापासून वाचवू शकणार

'वृक्ष देई आरोग्यदाही हवा
सदासर्वदा मानवते जीवा ।
प्रसन्नता देई ऋतु ते धवा
सर्व प्राणी मात्रासि ।।

वृक्ष हे पर्यावरणाचे संतुलन राखण्यास अत्यंत उपयुक्त आहे. वृक्ष हे वातावरणातील कार्बनडायऑक्साईडचे प्रमाण संतुलित राखण्यास व सजिवांना आवश्यक ऑक्सीजन पुरविण्यास मदत करतात कारण वृक्ष हे हवेतील कार्बन डायऑक्साईड शोषून ऑक्सीजन हवेत सोडतात. त्यामुळे प्रदुषण नियंत्रण होण्यास मदत होते. वृक्ष हे पृथ्वीवरील सौंदर्याला कायम राखण्यास मदत करते. कारण वृक्षामुळे सृष्टी ही हिरवेगार दिसते. वृक्ष जर नसतील तर सर्व सृष्टी ही ओसाड वाळवंट होईल म्हणूनच म्हणतात,

' होता नष्ट वृक्ष, जीवन होईल रूक्ष'

वृक्षामुळे जमिनीची धुप थांबण्यास मदत होते. वृक्ष हे मातीला घट्ट धरून ठेवतात. त्यामुळे शेतकऱ्यासाठी वृक्ष हे वरदानच आहे. पर्जन्यमानाचे प्रमाण हे वृक्षावरच अवलंबून असते. वृक्ष हे ढगांना अडवून पाऊस पाडण्यास मदत करतात. अलीकडच्या काळात वृक्षतोडीमुळे पावसाचे प्रमाण अत्यंत कमी झाले आहे. त्यामुळे अनेक भागांना भीषण दुष्काळाचा व पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. जर जंगल तोडीवर वाळवंट होण्यास वेळ लागणार नाही. त्यामुळे जीवसृष्टीचे अस्तित्व धोक्यात येईल. त्यासाठी वृक्षसंवर्धन अत्यंत आवश्यक आहे.

वृक्षतोडीमुळे प्राणीमात्रांचा निवारा नष्ट झालेला आहे. त्यामुळे अनेक जंगली जीव गाव व शहराकडे पलायन करीत आहे. यास्तव अनेक प्राण्याची संख्या ही रोडावत चालली आहे. त्यातील काही प्रजाती ह्या नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे. जर पृथ्वीवरील जीवसृष्टीचे रक्षण करायचे असेल तर वृक्षसंवर्धन करणे ही आजच्या काळाची गरज बनलेली आहे.

*****

# भारतीय कृषीचे महत्व

✍कु. स्वाती वरूडकर, बी.ए. भाग-२

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीवर आधारित आहे. स्वातंत्र्यानंतर औद्योगिकरणावर भर दिला गेला मात्र कृषीमध्ये समाधानकारक परिवर्तन घडवून आणले गेले नाही. भारताचा ३२,६६ कोटी हेक्टर भुभागापैकी १४.१ कोटी हेक्टर क्षेत्र निव्वळ लागवडीखाली असून जवळपास ६० कोटी लोकसंख्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे उपजिवीकेसाठी कृषि क्षेत्रावर अवलंबून आहे. मात्र भारताच्या संकल घरगुती उत्पादनामध्ये १७.२ टक्के (२००८-०९) व निर्यातीमध्ये १२ टक्के इतके योगदान कृषीचे आहे. आजही दोन तृतीयांश लोक रोजगारासाठी कृषीवर अवलंबून आहे. तेव्हा जो पर्यंत कृषीचा विकास होत नाही तो पर्यंत देशाचाही समतोल विकास साधणे शक्य होणार नाही कारण भारतातल्या काही महत्वपूर्ण उद्योगामध्ये शेतीतील उत्पादन कच्चा माल म्हणून वापरल्या जातो आणि त्यात उद्योगातही तयार मालाची विक्री तेव्हाच होईल जेव्हा ही २/३ कृषीवर आधारित जनता समृद्ध बनेल. NSSO च्या सर्वेक्षणानुसार ४८.६ टक्के शेतकरी ऋणग्रस्त आहेत तर ४० टक्के शेतकरी पर्याय नसल्यामुळे शेतीमध्ये टिकून आहे. स्वत: शासनानेही संसदेमध्ये हे मान्य केले की, इ.स. १९९७ पासून लाखापेक्षाही अधिक शेतकऱ्यांना आत्महत्या केल्या.

इ.स. १९९१ पासून सुरू झालेल्या उदारीकरणाचा प्रक्रियेपासून दुरसंचार व्यवस्थापन माहिती तंत्रज्ञान परिवहन इ. क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक वाढत गेली. परंतु कृषिक्षेत्र सिंचन संशोधन व गुंतवणुकीबाबत वाढत गेली परंतु कृषिक्षेक्ष सिंचन संशोधन व गुंतवणूकीबाबतीत उपेक्षितच राहिले. इ.स. २००३-०४ च्या आकडेवारीनुसार केवळ ५२.६ टक्केच क्षेत्र सिंचनाखली आहे.

कृषीचा अर्थ :-

सर्वसाधारणपणे पिके भाजीपाला पिकविणे इतकेच कृषिक्षेत्रासंबंधी संकुचित दृष्टीकोन झाला. तर पिक बरोबर चारा उत्पादन व गुरे ढोरे पालन-पोषण याचाही कृषिमध्ये समावेश होता. दुध-दुभते मास शेळ्या-बकऱ्या पालन कुक्कुटपालन मासेमारी त्याचप्रमाणे महत्वपूर्ण आहे. ज्याप्रमाणे तांदुळ गहू तेलबिया, कापूस  ज्युट चहा बटाटे हे शेतातील महत्वाचे उत्पादन आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषिचे महत्व :-

भारतीय कृषी गेल्या खुप काळापासून भारतीय अर्थव्यवस्थेचा मुलाधार असून येणाऱ्या नजिकच्या भविष्यकाळातही भारतीय अर्थव्यवस्थेत कृषिचे महत्व कमी होण्याची शक्यता दिसत नाही. यावरून भारतीय शेतीचे महत्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) राष्ट्रीय उत्पन्नात मुख्य भाग :-

भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये कृषिक्षेत्राचा सहभाग हा नेहमीच महत्वपूर्ण भाग राहीला आहे. मात्र गेल्या काही वर्षामध्ये याचे प्रमाणे कमी होताना दिसते. इ.स. १९९९-२००० च्या मुल्यावर आधारित इ.स. १९९३-९४ मध्ये ५९.२ टक्के तर इ.स. २००४-०५ मध्ये २००८ मध्ये २३ टक्के हिस्सा कृषि क्षेत्राचा होता तर इ.स. मध्ये एकुण जीडीपी १७.२ टक्के प्रमाणे कृषि क्षेत्राचे होते. इतर औद्योगिक देशाच्या तुलनेत हे प्रमाण आजही जास्त आहे.

२) रोजगारीचे मुख्य साधन :-

कृषि प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा दोन्ही प्रकारे रोजगार निर्माण करते. शेतीतील रोजगाराव्यतिरिक्त पशुपालन कुक्कुटपालन, धनोत्पादन, कृषी पदार्थावरील प्रक्रिया, उद्योग, तेलघाणी, कॉटन, जिनिंग प्रेसिंग इ. इ.स. २००१ मध्ये ५८.४ टक्के वर इ.स. २००४-०८ या कालावधीत सरासरी ६० टक्के श्रमिकाचा उदरनिर्वाह कृषि क्षेत्रावरच अवलंबून होता.

३) खाद्यान्य पूर्ती :-

देशाच्या लोकसंख्येच्या वाढीबरोबर खाद्यान्नाचीही मागणी वाढत आहे. खाद्यान्नाच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण असणे आवश्यक आहे. त्याशिवाय आर्थिक विकास साधता येणार नाही. गेल्या काही वर्षामध्ये भारताने खाद्यान्नाच्या बाबतीत स्वयंपूर्णता प्राप्त केली व काही प्रमाणात खाद्यान्नाची निर्यातही केली.

४) औद्योगिक विकासात सहाय्यक :-

भारतीय कृषी व उद्योगामध्ये परस्परावलंबन असल्याचे दिसून येते. कृषि उत्पादीत माल उद्योगामध्ये कच्चा माल, उद्योगामध्ये कापूस, तेलबिया अस तंबाखू इत्यादी त्याचप्रमाणे उद्योगामध्ये तयार होणारे उत्पादन शेतीमध्ये वापरात आणल्या जाते. जसे खते मशिनी व अवजारे बिज इ.त्यामुळे कृषि क्षेत्राचा विकास हा औद्योगिक विकासासाठी उपयुक्त ठरते.

५) आंतरराष्ट्रीय व्यापार :-

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या बाबतीच्या कृषीक्षेत्र भारतामध्ये महत्वपूर्ण आहे. भारतातून चहा,

कॉफी, तांदुळ, कापूस, तंबाखू, काजू मसाले, फळे, भाजीपाला, साखर, मांस, मासे इ. चे निर्यात केल्या जाते. इ.स. १९८०–८१ मध्ये कृषि व सहाय्यक पदार्थाचा निर्यातीमध्ये हिस्सा ३५.५ टक्के इतका होता तर इ.स. २००३–०४ मध्ये १२.४१ टक्के तर इ.स. २००४–०५ मध्यो १०.५ टक्को इतका राहीला.

आवश्यकतेनुसार धान्य (गहू, तांदुळ) तसेच वनस्पती तुप साखर (आवश्यकतेनुसार) खाद्यतेल इ. ची आयाताची केल्या जाते.

६) कृषी व योजना संबंध :–

आपल्या योजनांची यशस्वीता ही शेतीच्या यशस्वीतेवर उत्पादनामध्ये जर घट झाल्यास खाद्यान्नाचाकिंमत वाढतात. ग्रामीण अर्थव्यवस्था व व्यवहार संकुचित होतात. तेव्हा कृषि विकास समतोलपणे घडून आल्यास किंमती स्थिर राहून योजना यशस्वी होण्याला मदत होईल.

७) कृषी व वाहतुक :–

कृषी क्षेत्राच्या विकासामुळे वाहतुक क्षेत्राला चालन मिळते. रेल्वे व रस्ते वाहतुकीमध्ये कृषी मालाचा हिस्सा महत्वाचा असतो. तसेच पंजाब व हरियाणा या भागातून लाखो टन धान्य देशांच्या विविध भागांमध्ये पाठविला जातो.

८) कृषीचे दारिद्रय निर्मुलनाबाबत योगदान :–

भारतामध्ये दारिद्र्याचा विचार उष्माकांच्या उपभोगाच्या आधारावर केल्या जातो. अन्नधान्यात वाढ होईल. त्याचप्रमाणे अन्नधान्याच्या किंमती मर्यादीत ठेवण्यात सरकारला यश मिळेल व त्यामुळे दारिद्रयाच्या प्रमाणात घट होईल.

९) मुद्रास्फितीवर नियंत्रण :–

भारतीय शेती ही अर्थव्यवस्थेच्या विकासाची गुरूकिल्ली आहे. शेती उत्पादनामध्ये वाढ घडवून सामान्य लोकांच्या जीवनस्तरामध्ये वाढ करता येतील. त्याचप्रमाणे उत्पादनाची विशेषत अन्नधान्य भाजीपाला व तेलबियांची वाढ अर्थव्यवस्थेत मुद्रास्फितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कृषि उत्पादनामध्ये वाढ करणे आवश्यक आहे.

✡☪

# बळीराजा

शेतकरी माय बाप
मातीसंग नित्य खेळी
दिस–रात बा राबुनी
तरि रिकामीच झोळी

काबाड कष्ट करूनीया
बा पिकवितो मोती
तरी झोपा लागे आम्हा
रोज उपाशीच पोटी

दर सुर्योदय होता
बा शेताकडे बळे
गार हवेतही घाम
पावसाची गळे

उसन वारीचा तुकडा
माय न्याहारीला नेई
गोडी गुलाबीन स्वाद
जेवणाचा राणी घेई

दिस डोईवर येता
उर भरूनिया येई
बाळ पाहतेस वाट
पान्हा कुटुनिया जाई
कधी शिकेन मी शाळा

पाळण्याची दोरी हाती
शिकण्याची माझी ओढ
कशी धरावी ती पाटी

आतु लगनाला आली
बापु काळजीत राहे
मन भरूनिया येती
पुर डोळ्यातून वाहे

उद्या होईन मी भोग
चिंता नका उरी पेरू
आम्हा सोडूनिया बाबा
आत्महत्या नका करू

कृषी प्रधान हा देश
माथी मायेच्या गा मोळी
हाड शिजवूनी बा रे
रोज पेटती का होळी
रोज पेटती का होळी .....

वृक्ष बचाओ, वृक्ष उगाओ
प्रदूषण भगाओ, पर्यावरण लाओ
संस्कृती संवारो, मानता जगाओ ।।

✍**कु. प्राजक्ता सुरेशराव कुरसंगे**
बी.ए. भाग २

# वेळेचे महत्व

✍ सुरज साटोने
बी.ए. भाग २

एका वर्षाचे महत्व काय असते
हे परिक्षेत नापास होणाऱ्या विद्यार्थ्याला विचारा

एका महिन्याचे महत्व काय असते हे
बाळाला अकाली जन्म देणाऱ्या आईला विचारा

एका दिवसाचे महत्व काय असते हे
साप्ताहिकाच्या संपादकाला विचारा

एका तासाचे महत्व काये असते हे
भेटीसाठी प्रतिक्षा करणाऱ्या प्रेमिकांना विचारा

एका मिनिटाचे महत्व काय असते हे
गाडी चुकलेल्या व्यक्तीला विचारा

एका सेकंदाचे महत्व काय असते हे
अपघातातून वाचलेल्या व्यक्तीला विचारा

एका मिली सेकंदाचे महत्व काय असते हे
ऑलिंपीकमध्ये दुसरा आलेल्या धावपटुला विचारा

# मुक्ता साळवेचा निबंध वाचा ऐका

✍ प्रणय खंदार
बी.ए. भाग २

मुक्ता साळवेचा निबंध वाचा ऐका । हो
देव नावाच्या वस्तू घराबाहेर फेका ।।धृ।।

गणुजी साळवे मातंगाची ती पोर।
मुक्ताबाई झाली इतिहासात अमर ।।
शिक्षित लोक तिच्या पुढे ठरले निरूत्तर।
त्या निबंधाचा अभ्यास करणारे आंबेडकर ।।
देव धर्माच्या नावाने होणारा धोका ।।१।।

चौदा वर्षाची बालिका, तिसरीत शिकणारी ।
अतुलनिय होती तिच्या बुद्धीत हुशारी ।।
लहु, ज्योती सावित्री फुले कडून घडली संस्कारी।
अंधश्रध्दा नाकारण्यास्तव देणारी ललकारी
भोंदु भट लबाड्यांना करणारी तात्काळ मुका ।

जगी सगळे मानव निर्माण एका देवाचे।
चतुर्वर्ण्यधिरे वागणे नको भेद भावाचे ।।
पोथी पुराणावर अधिकार का बरे ऐकाचे ।
हिंदु लोकांनीच द्वेष केले हिंदु मातंगाचे ।
संत म्हणतात देव असता तर घडल्या
नसत्या चुका ।।३।।

# माझी आई

'आईचे प्रेम सर्व प्रेमाची गंगोत्री आहे'
''आई तुझी माया, जसी पारिजातकाचा सडा
ओढ्याकाली कटकात, फुले सुगंधी केवडा!''

या काव्यपंक्ती आईची थोरवी दर्शवतात. आई खरोखरच महान दैवत आहे. ती सदा अदरणीय, वदनीय व पुजणीय आहे. आईची ममता, वात्सल्य प्रेम, जिव्हाळा सर्व अलौकिक आहे, भजनकारानी आई बद्दल असे कथन केले आहे की,

''दगडाचे देव सारे काय त्याच्यापाशी, आई हिच पंढरपुर, मथुरा आणि काशी''
आईच्या चरणाशी ततमस्तक होताच साऱ्या तिर्थक्षेत्राचे पुण्य लाभते.

आई हि मुलाची सर्वात प्रथम गुरु आहे. बाहेरिल जगात पहिले पाऊल टाकताना व नंतर बाहेरिल वातावरणाची जुळवुन घ्यायला तीच शिकवते चांगले विचार, संस्कार, सवयी यांची जडण-घडण आईच करते. आपला मुलगा /मुलगी सुसंस्कृत व्हावा यासाठी तिची धडपड असते. मुलाला काय हवं काय नको हे सारे तीच पहते. आई ही करूनेची मुर्ती आहे. मुली/ मुलाला बरं नसलं की आईच त्याची सेवासुभुषाकरते त्याला कुशित झोपवावे जीवनातील अडथळे पार करायला ती मदत करते व संकटाच्या वेळी ती मुलाच्या/मुलीच्या पाठिशी खंबीरपणे उभी राहते जोपर्यत बाळ आपल्या पायावर उभा राहुन वातावरनाशी समाजाशी जुळवुन घेत नाही तो पर्यत आई त्याला समर्थपणे साथ देत असते. हलाखीची परिस्थीती असली तरी ती तेवढ्याच स्वाभिमानाने मुलांना/ मुलींना जोपासते. मुलांच्या/मुलीच्या अभ्यासापासुन तर निटनेटकेपनापर्यत ती आपल्या मुलांवर नजर ठेवते. सुसंस्कृत आदर्श शिस्तप्रीय, स्वावलंबी घडविण्यात तिचा सिंहाचा वाटा असतो.

आई ही घरात सर्वाना उजेड देणारी असते घरातील प्रत्येक व्यक्तीची ती मनभावे सेवा करते. काळजी घेते तिची महती कोणाला कळत नाही ती या जगाला सोडुन गेली की मात्र ''आई नाही'' असे म्हणण्याचे सामर्थ्यही घेत नाही.

''प्रेमस्वरुप आई वात्सलसिधु आई तुज बोलवु कसा मी कोणत्या उपायी!''

आई आत्मा अणि ईश्वर यांचे मिलन आहे. देव स्वत: पृथ्वीवर वऊन प्रत्येकाकडे लक्ष देऊ शकत नसेल म्हणन त्याने आईची निर्मिती केली असावी असे वाटते म्हणुन परमेश्वर पहावचा असेल तर आईच्या रूपात पहावा. देवाला आई म्हणुन हाक मारावी.

'आई' या शब्दाहुन उच्च शब्दच नाही म्हणुन तर ठेच लागता आनंद होता, दु:ख होता 'आई' हा शब्द सहज उत्सफूर्तपने हदयातुन ओठावर येतो 'आई' ही लेकराची माय असते, वासराची गाय असते, दुधावरची साय असते, अनाथांची माय असते, लंगड्याचा पाय असते, खरच आई ही जन्मभराची शिदोरी आहे, जी संपतही नाही आणि उरतही नाही खरचं आई हि महान दैवतच आहे ''मातृदेवो भव''

''आईच्या प्रेमाची शिदोरी
कधी संपतही नाही
कधी उरतही नाही''

# भारतीय शेतकऱ्यांच्या विकासाच्या संदर्भात महात्मा फुले यांच्या विचारांची भुमिका

प्रा. पंकज वा. मून

क्रांतीसुर्य महात्मा फुले यांनी सर्वप्रथम भारतीय शेती आणि शेतकऱ्यांना सन्मान, प्रतिष्ठा मिळावी यासाठी भारतीय परंपरे विरूद्ध आवाज उठविला. कारण परंपरागत कृषी आणि कृषकांची दुराव्यस्था महात्मा फुलेंनी जवळुन पाहिल होती. कृषकांच्या समस्यांनी म. फुलेंचे चित्त व्यापुन टाकले होते. शेतकऱ्याप्रती असलेला कळवळा त्यांच्या संपुर्ण वाड:मयातुन दिसुन येते. विशेषत: ''शेतकऱ्यांचा आसुड'' व ''इशारा'' या ग्रंथातुन अनुभवायला येते.

प्राचीन काळापासुन भारत हा देश कृषीप्रधान आहे या देशाचा मुख्यत: शेती आहे. म्हणुनच म्हटले जायचे की, ''श्रेष्ठ शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ चाकरी'' परंतु कालचक्रानुसार, अर्थाजनानुसार संदर्भ बदललेले दिसुन येते. जगाचा पोशिंदा असलेला एकदाच असहाय, अगतिक व दुर्बल झाला. त्याच्या ह्या दुर्दैवाची कारणे कोणती ? ह्याचा शोध महात्मा फुलेंनी घेतला.

या देशाचा आर्थीक कणा असलेला शेतकरी पारंपारीक शेती व्यवसायामुळे, सावकारांच्या वाढत्या कर्जाच्या विळख्यामुळे, त्याच्या ठिकाणी असलेले अज्ञान, दारिद्रय व व्यसनाधिनता यांनी वेढलेल्या या विशाल कृषक समाजाची वैचारीक पातळी बदलविणे आवश्यक आहे, असे महात्मा फुलेंना प्रकर्षाने जाणवले.

शेती व शेतकऱ्यांचा विकास झाला पाहिजे, कृषी ही देशाच्या विकासाचा केंद्र बिंदु आहे. हे सुत्र मनाशी ठरवुन महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या सर्वांगिण विवेचनात्मक मांडणी ''शेतकऱ्यांचा आसुड'' या ग्रंथात केली आहे.

''शेतकऱ्यांचा आसुड'' या ग्रंथातुन महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचा असंतोष आणि आक्रोश प्रथमत: प्रकट केला. या ग्रंथातील पाचही प्रकारणातुन शेतकऱ्यांचा दु:स्थितीचे त्यांच्या केवलवाण्या जगण्याचे चित्रण केले आहे. शेतकऱ्यांच्या जीवनात समृध्दी कशी आणता येईल याचे मार्ग सुध्दा म. फुलेंनी सुचविले आहेत. खरे म्हणजे आज महाराष्ट्रात पुर्वीपेक्षाही शेतकऱ्यांची विषण्णास्था आहे. शेतकरी आत्महत्येचा पर्याय निवडत आहेत. शासनासाठी व कृषकासाठी या दोघांसाठी ''शेतकऱ्यांचा आसुड'' हा ग्रंथ दिशादर्शक ठरतो.

महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या दु:स्थितीचे, अवनतीचे प्रमुख कारण ''अज्ञान''हे सांगितले आहे. त्याला ''विद्या'' मिळत नाही असे सांगितले आहे. तसेच शेतीशी निगडीत असणाऱ्या वेगवेगळ्या जाती ह्या मुळात एकच आहेत असेही सुचविलेले आहे. शेतकऱ्यांचे चहू बाजुंनी होणारे शोषण म. फुलेंनी शेतकऱ्यांच्या ''आसुड'' या ग्रंथात नमुद केले आहे. शेतकऱ्यांवर विशेषत: लग्नप्रसंगी करीत असलेल्या खर्चावर व त्यातुन होणाऱ्या कर्जबाजारीपणावर आरोप व्हायचे. यावर महात्मा फुले आरोप करणाऱ्याला

विचारतात ''शेतकऱ्यांच्या जेवणात तुपाचा थेंब तरी असतो का? तो कष्ट करतो, त्याच्या कष्टाकडे कुणी पाहिले आहे का? तसेच इंग्रज सरकारला महात्मा फुले आवाहन करतात शासनाने शेतकऱ्याच्या मुलांना शिक्षणाची सोय केल्यास त्याला समृध्दीचा मार्ग दिसु लागतील'' असे महात्मा फुले पोटतिडकीने सांगतात. शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारावयाची असेल तर शेतीमध्ये सुधारणा केली पाहिजे, शेतकऱ्यांचे चहु बाजुंनी होणारे शोषण, पुरोहीत वर्गाकडुन होणारा छळ, ग्रंथाचा मतलबीपणा, यातुन सुटका होण्यासाठी त्याला विद्या दिली पाहिजे, यंत्राचा वापर करण्यास शिकविले पाहिजे, गोधनाचे रक्षण केले पाहिजे, बंधारे आणि नाल्या बांधल्या पाहिजेत, शेतकऱ्यांसाठी उत्तम डॉक्टर ठेवले पाहिजे, शेतकरी व्यसनाधिन आहेत, नाचगाण्यासारख्या चंगळवादाकडे कधी-कधी धावतात त्यांना त्या पासुन परावृत्त केले पाहिजे. कृषी व कृषकांसाठी, शेतकऱ्यांच्या उत्कर्षासाठी त्याला अर्थसहाय्य उपलब्ध असणे गरजेचे आहे असे महात्मा फुले सुचवितात. ''पगारदार वर्गाचे पगार आणि पेन्शन कमी केले पाहिजे, जे मुळीच श्रम करीत नाही ते अधिक पगार घेतात आणि जे श्रम करतात ते मात्र नागविले जातात. योग्य श्रमाचे मुल्य मिळाले पाहिजे'' दोन वर्गाची तुलना महात्मा फुले करतात. कृषी व कृषकांसाठी उपाय महात्मा फुले आपल्या शेतकऱ्यांचा आसुड या ग्रंथातुन सुचवितात.

शेतकऱ्याच्या विपण्णावस्थेचे स्वरूप हे आर्थीक होते या जाणीव महात्मा फुले यांना होती. भट ब्राम्हण शेतकऱ्यांचे शोषण करत होते. इंग्रजांच्या सत्तेत विविध अधिकार पदावर स्थिरावलेले येथील अधिकारी वर्ग, येथील सावकार, गावचा पोलीस, शेतकऱ्यांचा माल विकत घेणारा व्यापारी, दलाल इत्यादी शोषक शेतकऱ्याच्या विपण्णवस्थेला जबाबदार आहेत. त्याचबरोबर कधिकधि शेतकरी स्वत:च्या अहितास काही प्रमाणात जबाबदार आहेत. त्यांनी त्यावेळच्या काही प्रथांचा उल्लेख केला होता. उदा. बायका करणे, बालविवाह.

कृषी जीवनात अत्यंत उपयुक्त प्राणी म्हणजे गाय, बैल होत. त्यांचे संवर्धन झाले पाहिजे असे आवाहन करून महात्मा फुले म्हणतात की, ''इंग्रज मुसलमानांनी गाय, बैल मारून खाल्ल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीसाठी आवश्यक असणारी जनावरेही उरली नाहीत,'' ''गाईचे रक्षण झाले पाहिजे, गाय, बैल म्हणजे कृषीसंजीवनी आहे'' असे महात्मा फुले म्हणतात.

शेतकऱ्यांच्या जीवनाचा विकास शेती सुधारल्याशिवाय होणार नाही हे म. फुले वारंवार सांगतात. ''शासनाने बहुजनाच्या शिक्षणासाठी वेगवेगळ्या योजना आखाव्यात. बहुजन समाजातुन मानसे घ्यावीत. व्यापाऱ्याच्या कुजक्या मालावर नजर ठेवावी. पाटीलकीसाठी परिक्षा घ्याव्यात'' असा महात्मा फुले यांचा अट्टाहास होता. म. फुले यांच्या विचारातुन कृषकांचा विकास व्हावा, प्रगती व्हावी याचा प्रत्यय येतो. एकुणच भारतीय शेतकऱ्यांच्या विकासात म. फुले यांचे योगदान महत्वपुर्ण आहे. म. फुले यांचे ''शेतकऱ्याचा आसुड'' व ''ईशारा'' हे ग्रंथ शासनव्यवस्थेला व शेतकऱ्यासाठी आजही दिशादर्शक आहेत, हे मात्र निश्चित.

बर्फाचे तट पेटुनि उठले सदन शिवाचे कोसळते रक्त आपुल्या प्रिय आईचे शुभ्र हिमावर ओधळते ।
असुरांचे पद भ्रष्ट लागुनी आज सतीचे पुण्य मळे
अशा घडीला कोण करंटा तटस्थतेने दुर पळे
कृतांत ज्वाला त्वेषाची ना कोणाच्या हृदयात जाळे
साममंत्र तो सरे, रणांची नौबत धडधडते
रक्त आपुल्या प्रिय आईचे शुभ्र हिमावर आधळते ।
सह्यगिरीतील वनराजांनी या कहरातुन आज पुढे
रक्त हवे जर स्वतंत्र्यतेला रक्ताचे पडतील सडे
एक हिमाचल राखायास्तव करा हिमाचल लक्ष खडे
समरपुराचे वारकरी हो समरदेवता बोलविते
रक्त आपुल्या प्रिय आईचे शुभ्र हिमावर ओघळते !
खडक कापाळी घोटुनि तुमचे मनगट बाहु घडलेले
कडकपारीमधील वनवे उरांत तुमच्या दडलेले
काबुल - वृंदाहार पशावर डंके तुमचे झडलेले
शिवतेजाची दीपमाळ पाठीशी आपुल्या पाजळते
रक्त आपुल्या प्रिय आईचे शुभ्र हिमावर ओघळते
कोटी -कोटी असतील शरिरे मनावर अमुचे एक असे
कोटी - कोटी देहांत आपला एक मनीषा जागतसे
पिवळे जहरी सर्प ठैचणे अन्य मना अव्यधान नसे
एक प्रतिज्ञा: विजय ळितो राहिल रण हे धगधगते

## दुष्काळ...........

गरिब जनाला आधार ना कोणी
स्वत:चे पोटी पानी तेची करे
दुष्काळ हा जगाचा अंत ना राही खाया
भुकेने लहान बालक आतूर राही पाया
आईस प्रश्न येई ति अन्नास धाव घेई
आपल्या चिमुकल्यांना खायास ते देई

जाने हे सर्व काही नुरे जानन्यास काही नाही
गरिबांच्या वेदनांना बोल काही नाही
पाटील पांडे गरिबांकडुन काम घेई
कामाचे दाम त्यांना कवडीत देई
गरिब शेवटी गुलामच राही
गुलामच राही

✍कु. आरती काळे
बी.ए. ३

# इंग्रजी विभाग

मी साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय वडनेर ता. हिंगणघाट जि. वर्धा येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी इंग्रजी अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषा आणि इंग्रजी साहित्य विषयाची जाणीव वृद्धींगत व्हावी या हेतूने दरवर्षी इंग्रजी अभ्यास मंडळाची स्थापना केली जाते. अभ्यास मंडळाची कार्यकारिणी खालीलप्रमाणे आहेत.

अध्यक्ष : कु. लिखिता कुंभारे

उपाध्यक्ष : विजय हटवारे

सचिव : कुरूपम सुपारे

सदस्य : कु. मयुरी पोहणे, आशिष मेश्राम, कु. मयूरी देवतळे, कु. प्रिती वांदिले, लहु मोहीते, कु. आर्या बोकडे, मयुर भोयर, कु. माहेश्वरी मांगरूटकर, कु. पल्लवी ताल्लेवार

विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाची आवड निर्मान व्हावी, महत्व आणि गरज समजण्यासाठी अनेक उपक्रम इंग्रजी अभ्यास मंडळाच्या माध्यमातुन राबविले जातात.

※ कार्यक्रम तपशिल :

दिनांक २१ सप्टेंबर २०१७ ला प्राचार्य विनोद मुडे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रा. विकास बेले (रा. सु. बिडकर महाविद्यालय, हिंगणघाट) यांच्या प्रमुख उपस्थितीत इंग्रजी अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी ''वर्तमान काळात इंग्रजी भाषेचे महत्व'' या विषयावर प्रा. विकाव बेले यांनी मार्गदर्शन केले.

इंगजी अभ्यास मंडळाद्वारे सेमीनार वादविवाद स्पर्धा, चे आयोजन करण्यात येते, तसेच, रेमेडियल क्लास घेतले जातात.

इंग्रजी विभागाद्वारे ''स्पर्धा परिक्षेमध्ये इंग्रजी विषयाचे महत्व'' या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. तसेच, वस्तुनिष्ठ प्रश्नाची चाचनी घेण्यात आली.

सन २०१७–२०१८ या सत्राच्या शेवटी इंग्रजी विभागाद्वारे समारोपीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमामध्ये या सत्रात जे उपक्रम राबविले याची माहिती देवुन कार्यकारीणीचा समारोप करण्यात आला

✍ प्रा. नितेश तेलहांडे
(इंग्रजी विभाग प्रमुख)

✍ प्रा. संजय दिवेकर
(इंग्रजी विभाग)

# राज्यशास्त्र विभाग

दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा राज्यशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | कु. रूपम सुपारे |
| उपाध्यक्ष | : | कु. निशा कडवे |
| सचिव | : | श्री. लहु मोहीते |
| सदस्या | : | कु. काजल महाजन |
| सदस्य | : | श्री. राकेश भोयर |
| सदस्या | : | कु. जया दाते |
| सदस्या | : | कु. मनिषा ताकसांडे |
| सदस्या | : | कु. प्रणाली कुडमते |
| सदस्या | : | कु. अश्विनी गावंडे |

या सर्व पदाधिकाऱ्यांची एकमताने निवड करण्यात आली.

राज्यशास्त्र अभ्यासमंडळाद्वारे बदलती राजकिय परिस्थिती व विकास ह्या विषयावर प्रा. डॉ. संदिप काळे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, यशवंत महाविद्यालय, सेलु यांनी मार्गदर्शन केले. यावेळी चर्चासत्रात विद्यार्थ्यांनीही सहभाग घेतला.

तसेच राज्यशास्त्र ह्या विषयाच्या अनुषंगाने ''राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतींची निवडणूक पद्धत'' या विषयावर विद्यार्थ्यांकडून पेपरचे वाचन करून घेतल्या गेले आणि मार्गदर्शन करण्यात आले. तसेच राज्य विधीमंडळाच्या कामकाजाचे सादरीकरण करण्यात आले.

दिनांक २६ नोव्हेंबरला ''संविधान दिन'' साजरा करण्यात आला. मार्गदर्शक प्रा. पंकज मुन, इतिहास विभाग प्रमुख यांनी ''भारतीय संविधान'' या विषयावर प्रकाश टाकला.

✍प्रा. विनोद मुडे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख

# अर्थशास्त्र विभाग

श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर अर्थशास्त्र अभ्यास मंडळाची कार्यकारीनी अर्थशास्त्र प्रमुख व अर्थशासत्र अभ्यास मंडळ समन्वयक डॉ. विठ्ठल घिनमिने यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १२.०८.२०१७ रोजी गठीत करण्यात आली. ही कार्यकारीणी खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | – | सचिन सोगे |
| उपाध्यक्ष | – | कु. प्रांजली साखरकर |
| सचिव | – | कु. आर्या बोकडे |
| सहसचिव | – | कु. प्रिती बालपांडे |
| प्रसिध्दीप्रमुख | – | विजय हटवारे |
| सदस्य | – | कु. अश्विनी राखडे, सुरज साटोणे, मयुर भोयर, कु. राधिका वणकर |

कार्यक्रम तपशिल :

दिनांक ०२.०९.२०१७ ला प्राचार्य विनोद मुडे यांच्या अध्यक्षतेखाली अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी ''भारतातील वस्तु व सेवा करांची उपयुक्तता'' या विषयावर डॉ. शालीनी हटवार यांनी मार्गदर्शन केले.

दिनांक ०४.१०.२०१७ बी. ए. भाग १ व २ सेमिस्टर च्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमावर आधारित सेमिनार आयोजित करण्यात आले होते. यामध्ये परिक्षेचे स्वरूप, प्रश्नपत्रिकेचे प्रारूप तसेच योग्य पर्याय निवडा (Objective Test) या संदर्भात माहिती देण्यात आली.

दिनांक ०६.१०.२०१७ ला महाविद्यालयामध्ये अर्थशास्त्र विभागाच्या वतीने कर्करोग जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य विनोद मुडे मार्गर्दाक डॉ. श्येता वागदे, समुपदेशक कु. वर्षा दांडेकर, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विठ्ठल घिनमिने उपस्थित होते.

दिनांक २३.१२.२०१७ अर्थशास्त्र विभागाच्या वतीने ग्राहक व किसान दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य विनोद मुडे प्रमुख मार्गदर्शक डॉ. गणेश बहादे, समन्वयक डॉ. विठ्ठल घिनमिने आदि उपस्थित होते.

✍डॉ. विठ्ठल घिनमिने
अर्थशास्त्र विभाग प्रमुख

# समाजशास्त्र विभाग

श्री. साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर येथे अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. अभ्यास मंडळाची कार्यकारणी याप्रमाणे कु. आरती काळे, अमर दाते, कु. पायल गमे, कु. पल्लवी जवादे, दिक्षा लोहकरे, साक्षी जवादे, नितु गवारकर याप्रमाणे कार्यकारणी गठीत करून अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन प्रा. डॉ. अजय मेश्राम, महात्मा फुले समाजकार्य महाविद्यालय, उमरेड, जिल्हा नागपुर यांच्या हस्ते करण्यात आले व त्यांनी ''आदिवासी समाज आणि समस्या'' या विषयावर मार्गदर्शन केले. समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने अन्नुपामहे, ता. राळेगांव, जिल्हा यवतमाळ येथे प्राथमिक शाळेला भेट दिली आणि शिक्षक दिनाच्या दिवशी १ ते ५ वर्गातील संपुर्ण विद्यार्थ्यांना शालेय पुस्तके व साहित्याचे वाटप करण्यात आले. उपस्थित अन्नुपाडे शाळेतील सहा. शिक्षक श्री रमेश कुडमते व गावकरी होते.

प्रा. डॉ. गणेश बहादे

---

# गृहअर्थशास्त्र विभाग

श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर येथे गृहअर्थशास्त्र विभागामार्फत गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना समन्वयक प्रा. आरती देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १५.१२ २०१७ रोजी गठीत करण्यात आली. डॉ. शुभांगी डांगे, गृहअर्थशास्त्र अभ्यास परिषद विभाग प्रमुख आर. एस. बिडकर महाविद्यालय, हिंगणघाट यांच्या प्रमुख उपस्थितीत मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. ''गृहअर्थशास्त्रातुन स्वयंरोजगार'' या विषयावर त्यांनी विद्यार्थ्यीनींना मार्गदर्शन केले.

दिनांक ०१.०८.२०१७ रोजी ''जागतीक स्तनपान दिना'' निमित्य डॉ. निमा पाटिल याना स्तनपानाचे महत्व विद्यार्थिनींना पटवुन सांगितले.

या मंडळाच्या वतीने यावर्षी महाविद्यालयातील विद्यार्थिनींकरीता रांगोळी स्पर्धा, पुष्परचना व पुष्पगुच्छ स्पर्धा, डिश डेकोरेशन स्पर्धा घेण्यात आली. तसेच कृत्रीम फुलांची रचना, भरतकला, रंगयोजना, कार्यसरलीकरण व बालसंगोपन, आरोग्य विषयक सवयी यावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळाची कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | – | कु. प्रणाली दरोडे |
| उपाध्यक्ष | – | कु. शितल महाजन |
| सचिव | – | कु. कोमल महाजन |
| सदस्य | – | कु. रूपम सुपारे |
| सदस्य | – | कु. दिपाली पारिसे |
| सदस्य | – | कु. काजल महाजन |
| सदस्य | – | कु. स्नेहा सुरकार |

प्रा. आरती देशमुख

# इतिहास विभाग

श्री. साईबाबा लोक प्रबोधप कला महाविद्यालय, वडनेर, ता. हिंगणघाट, जिल्हा वर्धा येथील मागील ६ वर्षापासुन इतिहास अभ्यास मंडळाची स्थापना केली जाते. विद्यार्थ्यांमध्ये विषयाची गोडी निर्माण व्हावी व भारताच्या इतिहासाची जाणीव व्हावी या उद्देशाने उपक्रम इतिहास अभ्यास मंडळाच्या माध्यमातुन राबविले जातात.

शैक्षणिक सत्र २०१७–१८ या वर्षी मा. श्री. अनिल मानकर, (मार्गदर्शक स्पर्धा परिक्षा कोचिंग सेंटर, हिंगणघाट) यांच्या हस्ते इतिहास अभायास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. ''स्पर्धा परिक्षा व इतिहास'' या विषयावर श्री अनिल मानकर सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इतिहास अभ्यास मंडळाचे समन्वयक प्रा. पंकज मुन हे आहेत.

इतिहास अभ्यास मंडळ २०१७–१८

| | | |
|---|---|---|
| १) कु. मोनाली पोहाणे | – | अध्यक्षा |
| २) अक्षय कापसे | – | उपाध्यक्ष |
| ३) कु. मोनाली भगत | – | सचिव |
| ४) सचिन सोगे | – | सदस्य |
| ५) कु. पुजा कलोडे | – | सदस्य |
| ६) कु. प्रिती रा. वांदिले | – | सदस्य |
| ७) आकाश चौधरी | – | सदस्य |

* ०२ ऑक्टोबर २०१७ – ''लाल बहादुर शास्त्री व महात्मा गांधी जयंती'' चा कार्यक्रम रा. से. यो. व इतिहास अभ्यास मंडळाच्या वतीने घेण्यात आला.

* ०६ डिसेंबर २०१७ – डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनाचा कार्यक्रम इतिहास अभ्यास मंडळ व रा. से. यो. वतीने घेण्यात आला यावेळी विद्यार्थ्यांनी भाषणे दिली.

* दि. २० डिसेंबर २०१७ – संत गाडगे महाराज पुण्यतिथीजा कार्यक्रम इतिहास अभ्यास मंडळाच्या वतीने घेण्यात आला. यावेळी डॉ. गणेश बहादे सर यांनी संत गाडगेबाबांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

* १२ जानेवारी २०१८ – ''स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊ जयंती'' चा कार्यक्रम संयुक्तरित्या घेण्यात आला.

✍प्रा. पंकज भोयर

# शारिरीक शिक्षण विभाग अहवाल

श्री. साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर येथे महाविद्यालय सर्व खेळाचे मैदान उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सर्व खेळाचे साहित्य खेळाडु विद्यार्थ्यांना पुरविण्यात येते. महाविद्यालय ग्रामिण भागात असुन विद्यार्थ्यांचा ''खेळामुळे सर्वांगीन विकास'' ह्या संकल्पनेवर आधारीत खेळाकडे विशेष लक्ष देण्यात येते. प्रत्येक खेळाकरीता प्रशिक्षण वर्ग घेतल्या जातात. त्यामध्ये खेळाडुंना व्यायाम, खेळाचे कौशल्य व आहार या विषयी मार्गदर्शन दिल्या जाते.

महाविद्यालयात विद्यार्थीनींनी आतापर्यंत विविध खेळामध्ये राष्ट्रीय, राज्य व विद्यापीठ स्तरावर सहभाग नोंदविला आहे. महाविद्यालयात खेळामध्ये दिवसेंदिवस अग्रेसर आहे.

महाविद्यालयात रामविले जाणारे उपक्रम
*वैद्यकिय चाचणी
*शारिरीक क्षमता चाचणी
*सहल
*क्रिडा दिन
*प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन व महाराष्ट्र दिन ध्वजारोहन कार्यक्रम
*उन्हाळी शिबीर
*क्रिडा प्रशिक्षण व मार्गदर्शन शिबीर.

---

*''स्वच्छता असे जेथे आरोग्य वसे तेथे''*

*स्वच्छता म्हणजे आपले शरीर, मन आणि आपल्या आजुबाजुच्या परिसरातील सर्व गोष्टी स्वच्छ असणे ही एक चांगली सवय आहे. त्यांची सवय वयाच्या सुरूवातीपासून असायला हवी.*

*''स्वच्छता म्हणजेच आरोग्याची सुरक्षा''*

# सांस्कृतिक विभाग

विद्यार्थ्यांमध्ये आंतरीक अणि बाह्य कौशच्याचा विविध कला–गुणांचा विकास होण्यासाठी सांस्कृतिक विभागाची स्थापना करण्यात आली.

सांस्कृतिक विभागाची कार्यकारिणी खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| समन्वयक | : | प्रा. नितेश तेलहांडे |
| सह–समन्वयक | : | डॉ. गणेश बहादे, प्रा. आरती देशमुख |
| अध्यक्ष | : | विजय हटवारे |
| सचिव | : | कु. लिखिता कुंभारे |
| सदस्य | : | कु. मयुरी देवतळे, लहु मोहिते, कु. आर्या बोकडे, कु. रूपम सुपारे |

कार्यक्रम तपशिल :

सांस्कृतिक विभागातर्फे महाविद्यालयामध्ये विविध उपक्रम राबविले जातात ते खालीलप्रमाणे आहेत.

* दिनांक १५ ऑगस्ट २०१७ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्य ध्वजारोहण कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे संस्थापक सचिव प्रा. दिवाकर गमे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण झाले. याप्रसंगी उपस्थितीत श्री. अविनाश गमे, डॉ. प्रसाद गमे, महाविद्यालयाचे प्राचार्य विनोद मुडे, प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर विभाग आणि विद्यार्थ्यी उपस्थित होते.

* दिनांक ०५ सप्टेंबर २०१७ रोजी महाविद्यालयामध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीचे औचित्य साधुन शिक्षक दिन व स्वयंशासन दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष : प्राचार्य विनोद मुडे, प्रमुख मार्गदर्शन : डॉ. गणेश बहादे, संयोजक : प्रा. नितेश तेलहांडे, प्राध्यापक वृंद व प्राध्यापकांची भुमिका साकारणारे विद्यार्थ्यी उपस्थित होते.

* दिनांक ०२ ऑक्टोबर २०१७ रोजी महात्मा गांधी आणि लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. मंचावर उपस्थित प्राचार्य विनोद मुडे, प्रा. पंकज मुन व प्रा. नितेश तेलहांडे व प्राध्यापक वृंद होते.

* दिनांक १३ आक्टोबर २०१७ रोजी महाविद्यालयामध्ये भारतरत्न डॉ. ए.पि.जे. अब्दुलकलाम यांच्या जन्मदिनानिमित्य वाचन प्रेरणा दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांना डॉ. एपीजे अब्दुल कलाम, शिवाजी महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, महात्मा गांधी यासारख्या भारतातील व विदेशातील थोर महापुरूषांची, विचारवंताची पुस्तके वाचावयास देण्यात आली. वाचनकक्षामध्ये सुमारे चार तास शांततेने विविध पुस्तकांचे वाचन करून योग्य तो प्रतिसाद विद्यार्थ्यांनी दिला. यावेळी सर्व प्राध्यापक वृंद कार्यक्रमाला उपस्थित होते.

* दिनांक २६ नोव्हेंबर २०१७ रोजी संविधान दिनानिमित्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अध्यक्षस्थानी : प्राचार्य विनोद मुडे यांनी संविधान उद्देश पत्रिकेचे वाचन सामुहिकरित्या करून घेतले.

* दिनांक २८ नोव्हेंबर २०१७ रोजी महाविद्यालयामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांची १२६ वी पुण्यतिथी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. मंचावर उपस्थित प्राचार्य विनोद मुडे, डॉ. प्रविण कारंजकर, प्रा. नितेश तेलहांडे, डॉ. नरेश भोयर व इतर प्राध्यापकवृंद उपस्थित होते.

* दिनांक ०६ डिसेंबर २०१७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६१ व्या महापरिनिर्वाण दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. मंचावर डॉ. गणेश बहादे, डॉ. विठ्ठल घिनमिने, डॉ. नरेश भोयर, प्रा. पंकज मुन, प्रा. नितेश तेलहांडे, प्रा. संजय दियेकर, प्रा. आरती देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

* दिनांक ०३ जानेवारी २०१८ रोजी महाविद्यालयामध्ये क्रांतीजोती सावित्रीबाई फुले जयंती, ''वेशभुषा व प्रश्नमंजुषा'' कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य विनोद मुडे, प्रमुख अतिथी : प्रा. सारीका चौधरी, प्रमुख मार्गदर्शक : प्रा. रूणाली ठाकरे, प्रा. प्रियंका गुडधे, प्रा. तारकेश्वरी देवतळे, प्रा. छाया मोहिजे, प्रा. आरती देशमुख, प्रा. नितेश तेलहांडे उपस्थित होते. याप्रसंगी विविध विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुलेंची वेशभुषा धारण केलेली होती. त्यानंतर विद्यार्थ्यांना क्रातीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जिवनचरित्र व कार्यावर प्रश्न विचारण्यात आले. या स्पर्धेमध्ये कु. प्रिती वांदिले प्रथम, कु. मयुरी देवतळे द्वितीय, कु. योगिता दोडके तृतिय पारितोषिक मिळाले.

* १२ जानेवारी २०१८ रोजी महाविद्यालयामध्ये स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊ जयंती, राष्ट्रीय युवा दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रसंगी राजमाता मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य विनोद मुडे, डॉ. घिनमिने, प्रा. आरती देशमुख, डॉ. गणेश बहादे, प्रा. पंकज मुन प्राध्यापक वृंद उपस्थित होते. याप्रसंगी रक्तदान शिबिर व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

※ २६ जानेवारी २०१८ ला महाविद्यालयाचे संस्थापक सचिव प्रा. दिवाकर गमे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी प्रा. दिवाकर गमे विचार व्यक्त करतांना म्हणाले की, स्वातंत्र्य संग्रामाच्या लढाईमध्ये भारतातील राष्ट्रपिता महात्मा गांधी, पंडीत नेहरू, सुभाषचंद्र बोस, स्वातंत्र्यविर वि. दा. सावरकर, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव या सर्व माहात्यांनी व क्रांतीविरांनी वेगवेगळ्या पध्दतीने भारताच्या स्वातंत्र्यासाठी जिवाचे रान करून बलीदान केले.

※ श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय अंतर्गत सांस्कृतिक समिती विभागाच्या वतीने युवा स्फुर्ती महोत्सव समारंभ साजरा करण्यात आला. या महोत्सवामध्ये विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवाच्या उद्‌घाटनासाठी मा. श्री. दिनेश झांबरे ( साहाय्यक पोलीस निरिक्षक), प्रा. दिवाकरजी गमे, मा. श्री. अविनाश गमे, प्रा. विनोद मुडे, डॉ. नरेश भोयर, प्रा. सारीका चौधरी, प्रा. नितेश तेलहांडे, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर विभाग व विद्यार्थ्यी उपस्थित होते. गितगुंजन स्पर्धेमध्ये कु. लिखिता कुंभारे हिने पहिला, कु. प्रणाली मेंढे हिने दुसरा क्रमांक आणि कु. पल्लवी जवादे हिने तिसरा क्रमांक पटकाविला. पुष्पगुच्छ स्पर्धेमध्ये कु. भक्ती घरजोडे हिने पहिला, कु. निकिता ढगे हिने दुसरा क्रमांक पटकाविला. रांगोळी स्पर्धेमध्ये कु. शितल शिवणकर, तर कु. प्रांजली साखरकर दुसरा क्रमांक पटकाविला. भाषण स्पर्धेमध्ये कु. लिखिता कुंभारे प्रथम, कु. वैजयंती मांडेकर हिने द्वितीय पुरस्कार पटकाविला. स्वयंस्फुर्त भाषण स्पर्धेमध्ये विजय हटवारे याने प्रथम तर अजय ईटनकर याने द्वितीय पुरस्कार पटकाविला आणि काजल वाघाडे हिने तृतिय पुरस्कार पटकाविला. वेशभुषा स्पर्धेमध्ये रूपम सुपारे प्रथम, तर मयुरी देवतळे द्वितीय पारितोषीक पटकाविला. क्रातीज्योती सावित्रीबाई फुले वेशभुषा व प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये कु. प्रिती वांदिले प्रथम, कु. मयुरी देवतळे द्वितिय, कु. योगिता दोडके तृतिय यांनी पुरस्कार पटकाविला. क्रिया स्पर्धेमध्ये विविध विद्यार्थ्यांनी भाग घेतलेला होता. गोळा फेक, भाला फेक, थाळी फेक, उंच उडी, कबड्डी, व्हॉलीबॉल इत्यादी खेळामध्ये भाग घेतलेला होता. त्यापैकी विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक व मेडल देण्यात आले.

※ महाविद्यालयामध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्रा. सोभागमलजी डुंगरवाल यांच्या शुभहस्ते बक्षिस वितरण, प्रा. अरूण धनवटे, माजी सिनेट सदस्य, संत गाडगेबाबा विद्यापिठ अमरावती, प्रमुख अतिथी प्रा. माधवराव पिंपळखुटे, प्रा. दिवकरजीगमे संस्थापक सचिव सौ. हेमलता गमे, संस्था अध्यक्षा, डॉ. नरेश भोयर, सत्कार मुर्ती जात्स्ना सरोदे, सदस्या जिल्हा परिषद वर्धा, सौ. कविता वानखेडे सदस्या, पंचायत समिती हिंगणघाट, सौ. मंगला बागेश्वर, सौ. कुमुदिनीताई बोबडे, सौ. कविता मुंगले, प्रा. विनोद मुडे, डॉ. गणेश बहादे, डॉ. विठ्ठल घिनमिने, प्रा. सारिका चौधरी, प्रा. नितेश तेलहांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

महाविद्यालयाच्या विकासामध्ये विविध उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी संस्था सचिव प्रा. दिवाकर गमे यांचे नेहमीच आम्हाला सहकार्य लाभत असल्यामुळे विद्यार्थ्यी क्रिडा, सांस्कृतिक व शैक्षणिक स्पर्धामध्ये सतत प्राविण्य मिळविते. असे प्रास्ताविक भाषणामध्ये विचार डॉ. नरेश भोयर यांनी विचार मांडले. प्रा. अरूण धनवटे, प्रा. सोभागमलजी डुंगरवाल यांनी महाविद्यालयाच्या संबंधित विविध विषयावर आपले विचार व्यक्त करून विद्यार्थ्यांचे प्रोत्साहन वाढविले.

प्रा. दिवाकरजी गमे विचार व्यक्त करतांना म्हणाले की, महाविद्यालयामध्ये केवळ चार भिंतीच्या आतील शिक्षण म्हणजे परिपुर्ण शिक्षण नसुन विद्यार्थ्यांना स्वयंपुर्ण करण्यासाठी विविध उपक्रम रापवुन शेतीचे ज्ञान, फोटोग्राफी, नळफिटिंग इत्यादी उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या दिड शतकापुर्वीच्या कार्यामधुन प्रेरणा महिलांनी स्वकतृत्वाची भरारी घेतली असे विचार व्यक्त केले.

मान्यवरांच्या हस्ते जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये जे निवडुन आले त्यांचा सत्कार करण्यात आला. विविध स्पर्धेतील विजेता विद्यार्थ्यांना प्रथम, द्विितिय, तृतिय पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना प्रथम व द्विितिय अनुक्रमे ५०१ व ३०१ रूपये व सन्मान चिन्ह देण्यात आले. कार्यक्रमाचे संचालक कु. वैजयंती मांडवेकर, तसेच सन्मानसत्कार सोहळ्याचे संचालक प्रा. विनोद मुडे यांनी तर क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धेच्या बक्षिस वितरण समारंभाचे संचालक डॉ. गणेश बहादे व डॉ. विठ्ठल घिनमिने यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा. नितेश तेलहांडे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने करण्यात आली.

⁕ महाविद्यालयामध्ये क्रांतीसुर्य महात्मा फुले जयंती साजरी केली जाते या कार्यक्रमात कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयातील प्राचार्य व प्राध्यापकवृंद कार्यक्रमाला उपस्थित असतात.

⁕ महाविद्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात येते या प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचा आढावा विद्यार्थ्यांना सांगितला जातो व महापुरूषांचे कार्ये स्मरणात ठेऊन, त्याप्रमाणे कार्य करत राहावे असे आव्हाहन केले जाते.

⁕ महाविद्यालयामध्ये क्रांतीसुर्य महात्मा फुले जयंती साजरी केली जाते कारण नागपुर विद्यापिठाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापिठ, नागपुर ह्या नावाचा नामविस्तार करण्यात आला. याप्रसंगी मान्यवर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनकार्याचा आढावा सांगितला जातो व विद्यार्थ्यांना त्याप्रमाणे कार्य करून आपले नाव अलौकीक करावे असे प्रोत्साहन केले जाते.

✍प्रा. नितेश तेलहांडे

# राष्ट्रीय सेवा योजना अहवाल

⁕ दि. ११ जुलै २०१७ ला ''जागतिक लोकसंख्या दिन'' चा कार्यक्रम झाला यावेळी डॉ. गणेश बहादे यांनी मार्गदर्शन केले.

⁕ दि. १३ जुलै २०१७ ला ''महाविद्याचयिन परिसर स्वच्छ व प्लॉस्टीकमुक्त'' करण्यात आला. हा उपक्रम ''निसर्ग मित्र समिती व राष्ट्रीय सेवा योजना'' च्या माध्यमातुन राबविण्यात आला.

⁕ दि. ०८ ऑगष्ट २०१७ ते १४ ऑगष्ट २०१७ या काळात ''वनमहोत्सव सप्ताह''राबविण्यात आला. या वनमहोत्सवात वृक्षारोपण, बगीचा व परिसर स्वच्छता, वृक्ष दत्तक, तसेच वृक्षांना राखी बांधण्याचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

⁕ दि. ०५ सप्टेंबर २०१७ ला राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ''शिक्षक दिन स्वयंशासनाचा दिन'' साजरा करण्यात आला यावेळी विद्यार्थ्यांनी भाषणे दिली.

⁕ दि. ०८ सप्टेंबर २०१७ ला जागतिक साक्षरता दिन'' साजरा करण्यात आला यावेळी डॉ. विठ्ठल घिनमिने यांनी मार्गदर्शन केले.

⁕ दि. ०२ ऑक्टोबर २०१७ ला ''जागतिक अहिंसा दिन'' रा. से. योजनेच्या वतीने साजरा करण्यात आला यावेळी महाविद्याचयिन परिसर स्वच्छ करण्यात आला.

⁕ दि. ०२ डिसेंबर २०१७ ला ''जागतिक एड्स दिन'' निमित्य आरोग्य विषय कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी कु. वर्षा दांडेकर, समुपदेशक ग्रामिण रूग्णालय वडनेर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

⁕ दि. ०६ डिसेंबर २०१७ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ''महापरिनिर्वाण'' दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. विठ्ठल घिनमिने यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अर्थशास्त्र या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

⁕ दि. २० डिसेंबर २०१७ ला संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी डॉ. गणेश बहादे यांनी मार्गदर्शन केले.

⁕ दि. २६ डिसेंबर ते ०२ जानेवारी २०१८ या कालावधीत ''विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिर'' बार्मडा, ता. हिंगणघाट जि. वर्धा येथे घेण्यात आला.

⁕ दिनांक १२ जानेवारी २०१८ ला स्वामी विवेकानंद जयंती निमित्य ''रक्तगट तपासणी व रक्तदान शिबीराचे''आयोजन करण्यात आले.

✍प्रा. पंकज मुन

# मराठी अभ्यास मंडळ कार्यवृत्तांत

(सत्र २०१७-२०१८ प्रथम सत्र पर्यंत)

श्री. साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर, ता. हिंगणघाट जिल्हा वर्धा येथे गेल्या ११ वर्षापासुन नियमित मराठी अभ्यास मंडळाची स्थापना केली जाते. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषा आणि मराठी साहित्याविषयीची जाणीव वृध्दींगत व्हावी या हेतुने दरवर्षी मराठी अभ्यास मंडळाची स्थापना केली जाते.

मराठी अभ्यास मंडळाचे उपक्रम :

१) काव्यवाचन : या उपक्रमाअंतर्गत अभ्यासाला नेमलेल्या कवितांपैकी विद्यार्थ्यांना आवडणाऱ्या कवितांचे वाचन विद्यार्थ्यांकडून करून घेतले जाते. त्यातुन कवितेचे गेय स्वरूप व कविता वाचन कसे करावे याचे आकलन विद्यार्थ्यांना करून दिले जाते.

२) निबंधस्पर्धा मराठी अभ्यास मंडळाकडुन यावर्षी ''व्यक्तीकत्व विकास'' या विषयावर निबंध आयोजित करण्यात आली यात बी.ए. भाग २ आणि भाग ३ च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत एकुण तेविस विद्यर्थी बक्षीसास पात्र ठरली.

३) स्वामी विवेकानंद जीवन परिचय परीक्षा : बी.ए. भाग१ च्या विद्यार्थ्यांसाठी स्वामी विवेकानंदाचे जीवन व कार्य यांचा परिचय व्हावा म्हणुन मराठी अभ्यास मंडळाकडून ही परिक्षा गेल्या सात वर्षापासुन आयोजित केली जाते, या परिक्षेत एकुण बारा विद्यार्थी बक्षिसास पात्र ठरली आहेत. निबंध स्पर्धा आणि स्वामी विवेकानंद जीवन परिचय परीक्षांचे बक्षीस वितरण दिवाळीच्या सुट्ट्या संपल्यावर केले जाईल.

✍प्रा. डॉ. प्रवीण कारंजकर

## स्पर्धा परिक्षा व स्वयरोजगार मार्गदर्शन विभाग स्पर्धा

स्पर्धा परिक्षा व स्वयंरोजगार मार्गदर्शन समि ती (विभाग) स्पर्धा परिक्षा विभागातर्फे महाविद्यालयामध्ये स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यक्रम दिनांक ०८.०८.२०१७ ला आयोजित करण्यात आला. त्यामध्ये प्रमुख मार्गदर्शक सन्माननिय श्री. अनिल मानकर सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

स्पर्धा परिक्षा विभागातर्फे महाविद्यालयामध्ये दिनांक १०.०१.२०१८ रोजी स्पर्धा परिक्षा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. त्या अनुषंगाने सन्माननिय श्री. नितेश कराळे, फिनिक्स करीअर ॲकाडमीचे संचालक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

✍प्रा. संजय दिवेकर

# अल्पकालीन स्वयंनिर्वाही अभ्यासक्रम अहवाल

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर आजिवन अध्ययन व विस्तार विभाग अंतर्गत महाविद्यालयामध्ये अल्पकालीन स्वयंनिर्वाही अभ्यासक्रम सत्र २०१५–१६ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात आले. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून एकुण ११० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून २०१७–१८ या शैक्षणिक वर्षामध्ये कृषी सेवा (Agro Services) अभ्यासक्रमाला ४५ विद्यार्थी, छायाचित्रण (Photography) या अभ्यासक्रमाला २० विद्यार्थी, तर सौंदर्यशास्त्र (Beautician) या अभ्यासक्रमाला २० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे.

**अभ्यास भेटी :-**

कृषी सेवा (Agro Services) या उपक्रमाची अभ्यास भेट डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे देण्यात आली. यामध्ये ४७ विद्यार्थी सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती केंद्राचे प्रमुख डॉ. देवपुजारी, तसेच कृषी तंत्रज्ञान माहीती केंद्राचे प्रमुख डॉ. ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. यावेळेस कार्यक्रम समन्वयक प्रा. विठ्ठल घिनमिने, प्रा. पंकज मुन, प्रा. नितेश तेलहांडे, कु. प्रिती सायंकार हे उपस्थित होते.

कृषी सेवा (Agro Services) या उपक्रमाची अभ्यास भेट डॉ. पंजाबराव देशमुख कृषी संशोधन केंद्र, कुटकी येथे ४० विद्यार्थ्यांनी अभ्यास भेट देण्यात आली. यावेळेस या संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. रंधे, श्री. संघरत्न सुटे, प्रा. डॉ. विठ्ठल घिनमिने, प्रा. नितेश तेलहांडे हे उपस्थित होते.

**कार्यक्रम समन्वयक**

✍प्रा.डॉ. विठ्ठल घिनमिने

*प्रत्येक शेतकऱ्याने शेतातील मातीची तपासणी*
*करावी आणि तपासणी अहवालानुसार*
*पिकांना रासायनिक खतांची मात्रा द्यावी.*